म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
स. नं. ९१७३

धर्मवीर

# अंताजी रघुनाथ कावळे

## याचें अल्प चरित्र

वसईच्या धर्मसंग्रामांतील एक सुप्रसिद्ध कर्तबगार पुरुष

ठाणें

संपादक
केशव आप्पा पाध्ये,
B. A., LL. B.,
ॲडव्होकेट, मुंबई हायकोर्ट

REFBK-0006383

किंमत १॥ रुपया

धर्मवीर

# अंताजी रघुनाथ कावळे

## याचें अल्प चरित्र

वसईच्या धर्मसंग्रामांतील एक सुप्रसिद्ध कर्तबगार पुरुष

ग्रंथालय ठाणे

—संपादक—

**केशव आप्पा पाध्ये**, B. A., LL. B.,
ॲडव्होकेट, मुंबई हायकोर्ट

‘हेमाद्रि’ ऊर्फ हेमाडपंत ह्यांचें चरित्र, ‘कालिदाससूक्तमंजूषा’
वगैरे ग्रंथांचे कर्ते, ‘बुद्धप्रभा’ या इंग्रजी त्रैमासिकाचे संपादक

RFFBK-0006383

ग्रंथ संग्रहालय

किंमत १॥ रुपया

प्रकाशक :

पुरुषोत्तम केशव पाध्ये, B. A., LL. B.,
ॲडव्होकेट, मुंबई हायकोर्ट

मुद्रक :

ग. का. तटणीस.
श्रीलक्ष्मी नारायण प्रेस, ३६४ ठाकुरद्वार

# प्रस्तावना

थोरले बाजीराव पेशवे यांनीं आपल्या कारकीर्दींत मोंगलांच्या मुलुखावर स्वाऱ्या करून गुजराथ, माळवा, बुंदेलखंड वगैरे प्रांत मोठ्या शौर्यानें जिंकून मराठ्यांच्या राज्याची सीमा यमुना नदीपर्यंत भिडविली. औरंगजेबाच्या मृत्युनंतर त्याच्या वारसांत दुही माजून दिल्लीच्या कारभारांतील जोम व जूट संपुष्टांत आली, त्याचा फायदा घेऊन हिंदुपद बादशाहीचा झेंडा खुद्द दिल्लीवर फडकला जावा अशी महत्त्वाकांक्षा बाजीरावानें धरिली असल्यास नवल नाहीं. पण त्याच वेळीं हिंदुस्थानच्या उत्तरेकडील अफगाणिस्थान व इराण या देशांतील मुसलमान राज्यकर्ते दिल्लीचें तक्त हस्तगत करावयास टपून बसले होते. त्याप्रमाणें नादिरशहानें मोठ्या सैन्यासह दिल्लीवर स्वारी करून तेथील मोठें मौल्यवान सिंहासन फोडून इराणांत नेलें व त्या वेळीं दिल्लीच्या सिंहासनावर असलेल्या बादशहास नामोहरम केलें, परंतु मोंगलांचें राज्य कायमचें जिंकून घेण्याचा त्याचा इरादा नव्हता, बाजीराव पेशवे आणखी कांहीं वर्षे जगले असते, तर दिल्लीच्या बादशहास मराठ्यांचा अंकित करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली असती.

थोरले बाजीरावांचें लक्ष उत्तरेकडील राजकारणांत गुंतलें असतां खुद्द कोंकणांत दोन महत्त्वाचीं राजकारणें उपस्थित झालीं होती, आणि मराठी राज्याची इभ्रत राखण्याकरितां व हिंदुधर्माचें संरक्षण करण्याकरितां सदरील राजकारणांत लक्ष घालणें त्यांस अत्यावश्यक होतें. मुंबई बेटापासून सुमारें २६ मैलांवर जंजिरा ( दंडा राजपुरी )

हें ठिकाण असून सदरील बेटापासून उत्तरेकडे ३० मैलांवर वसई हें ठिकाण आहे. जंजिऱ्याचें छोटेखानी मुसलमानी संस्थान श्रीशिवाजी महाराजांच्या जन्माच्या पूर्वीपासून अस्तित्वांत होतें व त्याचा नबाब मोंगलांच्या अंकित होता. वसई हें ठिकाण पोर्तुगीझ लोकांच्या अंमलाखालीं होतें. वास्को डी गामा यानें इ. स. १४९८ सालीं कोंकणच्या समुद्र किनाऱ्यावर पाय ठेविल्यानंतर त्यानें त्या वेळच्या हिंदुराजाकडून व्यापार करण्याच्या सवलती मिळविल्या आणि त्यानंतर थोडक्याच कालांत पोर्तुगीझ लोकांनीं आरमाराच्या बळावर गोव्यापासून उत्तरेस थेट दमणपर्यंत समुद्रकिनाऱ्यावरील गोवें, चौल, मुंबई, ठाणें, वसई, दमण वगैरे व्यापारी दळणवळणाचीं मोठमोठीं बंदरें आपल्या ताब्यांत घेऊन त्या ठिकाणीं आपला अम्मल वसविला. पण त्यानंतर श्रीशिवाजीमहाराजांच्या कारकीर्दींत-त्यांच्या अतुल परक्रमापुढें पोर्तुगीझांनीं आपली राज्यतृष्णा वाढविली नाहीं व हिंदु-धर्मामध्यें फारशी ढवळाढवळ केली नाहीं. पण संभाजी महाराजांच्या वधानंतर मराठी राज्याची घडी विसकटलेली पाहून त्यांनीं आपलें डोकें वर काढलें व आपल्या अंमलाखालीं असलेल्या हिंदु प्रजेला जुलमानें बाटविण्याचा उपक्रम सुरू केला. खुद्द गोंवें येथें व त्या भोंवतालच्या प्रदेशांत पोर्तुगीझ लोकांनीं हिंदुधर्माचा उच्छेद करण्याचा दीर्घोद्योग चालविला, यामुळें त्यांच्या अंमलाखालील प्रदेशांतून हजारों हिंदु लोक परागंदा झाले. थोरल्या बाजीरावांची कारकीर्द सुरू होतांच पोर्तुगीझ लोकांनीं साष्टी व वसई प्रांतांत हिंदुधर्मावर आक्रमण करण्यास सुरुवात करून शेंकडों लोकांना जुलमानें खिस्ती बनविलें त्या वेळीं साष्टी प्रांतातील मालाड गांवचे सरदेसाई व सरदेशपांडेपणाचें वतन **अन्ताजी रघुनाथ कावळे** याजकडे प्राचीन कालापासून होतें. व साष्टी-वसई प्रांतांतील अखिल हिंदूंचें पौरोहित्यहि त्याच्याकडेच

होतें. पोर्तुगीझांनीं हिंदुधर्मावर चालविलेल्या आक्रमणास अन्ताजी रघुनाथनें तीव्र विरोध केला, त्यामुळें त्याचें सरदेसाई व सरदेशपांडेपणाचें वतन पोर्तुगीझांनीं जप्त केलें व त्यास गोंवें येथें इन्किझीशन कोर्टापुढें खेंचण्याचा हुकूम फर्माविला. या हुकूमान्वयें आपणांवर ओढवणाऱ्या भीषण भवितव्याची पूर्ण कल्पना अन्ताजीस होती त्यामुळें त्यानें गुप्त रीतीनें मुंबईचा आश्रय धरिला.

मुंबई बेट मूळचें पोर्तुगीझ लोकांचें होतें, परंतु इ. स. १६६१ सालीं पोर्तुगालच्या राजकन्येचा विवाह इंग्लंडचा राजा पहिला चार्लस यांजबरोबर झाला. त्या वेळीं तें बेट तिला आंदाण दिलें होतें. त्यामुळें मुंबई बेटावर इंग्लंडच्या राजाची सत्ता होती आणि कोणाच्याहि धर्मांत ढवळाढवळ न करण्याचें त्याचें धोरण असल्यामुळें त्या वेळीं मुंबईबेटांत धर्मच्छलाची कोणासहि भीति नव्हती. अन्ताजी रघुनाथ कावळे याजप्रमाणें त्याचे क्षत्रिय मित्र अंजूरकर **गंगाजी नाईक** प्रभृति पांच बन्धु यांच्यावरहि पोर्तुगीझांची वक्रदृष्टि होऊन धर्मच्छलाचा दुर्धर प्रसंग त्यांच्यावरहि ओढवला व त्यांचेंहि वतन पोर्तुगीझांनीं जप्त केलें. त्यामुळें स्वधर्म संरक्षणाकरितां त्यासहि मराठी राज्याच्या अंमलाखालीं असलेल्या कल्याण शहराचा आश्रय करणें भाग पडलें.

अन्ताजी रघुनाथ व गंगाजी नाईक बन्धु यांच्या ठिकाणीं असलेल्या जाज्वल्य धर्माभिमानामुळें वसई--साष्टी प्रांतांत फिरंग्यांनीं चालविलेल्या धर्मच्छळाच्या मोहिमेबद्दल त्यांस अत्यंत वाईट वाटत होतें. हिंदुधर्मावरील परकीय लोकांच्या या अक्रमणास प्रतिकार करण्याचें त्यांनीं ठरवून हिंदुसमाजाचें संघटन केलें व वसई--साष्टी प्रांतांत फिरंगी लोकांनीं चालविलेल्या धर्मच्छळाच्या मोहिमेची वार्ता खुद्द शाहूमहाराज व पेशवे सरकार यांच्याकडे जाऊन पोंहोंचविली. आणि फिरंग्यांच्या मोहिमेचा उच्छेद करण्याबद्दल त्यांना अत्याग्रहाची

विनंति केली. अन्ताजी रघुनाथ व गंगाजी नाईक यांनीं वसई-साष्टी प्रांतांतील फिरंगी लोकांच्या जुलुमामुळें हिंदुप्रजेवर ओढवलेल्या प्रसंगाचें यथार्थ चित्र पेशव्यांपुढें ठेवल्यामुळें त्यांस स्वाभाविक त्वेष येऊन त्यांनीं श्रीशाहूमहाराजांच्या आज्ञेनें फिरंग्यांची सत्ता नष्ट करण्याचा संकल्प केला. इतकेंच नव्हे, तर या मोहिमेचे नेतृत्त्व अन्ताजी रघुनाथ व गंगाजी नाईक या पुढाऱ्यांना देऊन त्यांना या कामीं लागणारी सर्व प्रकारची मदत देण्याची व्यवस्था केली. पेशव्यांस इतर महत्त्वाच्या राजकारणामुळें प्रस्तुत मोहिम तांतडीनें सुरू करतां आली नाहीं. पण इ. स. १७२८-२९ पासून वसईच्या मोहिमेस सुरुवात केली. पेशव्यांनीं सुरू केलेल्या चढाईंत त्यांस यशहि आलें असतें. पण फिरंग्यांनीं तहाचें बोलणें लावल्यामुळें कांहीं दिवस लढाई तहकूब करावी लागली. पोर्तुगीझांनीं तहाचें बोलणें लावण्यांत त्यांचा हेतु असा कीं, दरम्यान शामल-जंजिरा व इंग्रज यांच्याकडून मदत घेऊन मराठ्यांवर हल्ला करावा. मराठ्यांपाशीं आरमार नव्हतें आणि आंग्रे सरदारांत फूट पडल्यामुळें त्यांच्याकडून आरमाराचें सहाय्य मराठ्यांस मिळेना या गोष्टीचा फायदा फिरंग्यांस मिळून त्यांनीं कांहीं वर्षें मराठी सैन्यास दाद दिली नाहीं. अखेर चिमणाजी आप्पा यांनीं मराठयांची फौज एकत्र करून वसईस वेढा दिला. प्रस्तुत वसईच्या रणसंग्रामांत मराठे प्राण-पणास लावून लढले, हिंदुधर्मावरील निस्सीम प्रेमाची साक्ष पटविण्याची ती वेळ होती आणि मराठी सैन्यानें त्या वेळीं पराक्रम करून वसई जिंकली आणि त्यामुळें फिरंग्यांची जुलमी सत्ता नष्ट झाली. या समरभूमीवर मराठी सैन्याची अपरिमित हानि झाली, त्यांत अंजूरच्या नाईकबंधूंपैकीं मुरारजी हा शौर्यानें लढत असतां मरण पावला.

वसईच्या मोहिमेचा उपक्रम व ती हातीं घेण्यास पेशव्यांस प्रवृत्त करण्याचें खरें श्रेय अन्ताजी रघुनाथ व गंगाजी नाईक यांना मिळालें पाहिजे असें कोणीहि निःपक्षपाती इतिहासज्ञ म्हणेल. कारण या

युद्धाची पूर्वतयारी अन्ताजी रघुनाथ यानें व त्याच्या सहकारी मित्रानें स्वार्थत्यागपूर्वक अविश्रांत श्रम करून केली होती. पण या मोहिमेचा साद्यंत इतिहास उपलब्ध नसल्यामुळें त्यांच्या कामगिरीची यथार्थ कल्पना होणें शक्य नाहीं. खुद्द वसईसारख्या मोहिमेचा सविस्तर इतिहास उपलब्ध नसावा ही दिलगिरीची गोष्ट आहे. कै. महादेव गोविंद रानडे यांनीं काव्येतिहास संग्रहाच्या मासिकांत साष्टीची बखर इ. स. १८८२ सालीं छापण्याकरितां पाठविली, त्यांतील हकीकती-वरून या घनघोर युद्धाची सामान्यतः कल्पना करितां येते. वास्तविक प्रस्तुत बखरीचा प्रसार मर्यादित झाल्यामुळें तिची आठवण बुजत चालली होती. परंतु थोड्या वर्षांपूर्वीं अंजूरच्या शूर व पराक्रमी वंशां-तील आमचे मित्र श्रीयुत **गजानन गोविंद नाईक** यांनीं साष्टीची बखर प्रसिद्ध करून वसईच्या रणसंग्रामाबद्दल हिंदुसमाजांत कुतूहल उत्पन्न केलें याबद्दल इतिहासप्रेमी वाचकच नव्हे, तर अखिल हिंदुसमाज त्यांच्याबद्दल कृतज्ञ राहील. चिटणीस व सभासदांनीं लिहिलेल्या श्रीशिवाजीमहाराजांच्या बखरीप्रमाणें साष्टीची मोहीम लिहिली गेली नाहीं त्यामुळें त्या मोहिमेंतील निरनिराळ्या कार्यकर्त्यांच्या व पराक्रमी सरदारांच्या वैयक्तिक कामगिरीची योग्य कल्पना होऊं शकत नाहीं. सबब महाराष्ट्रांतील इतिहासज्ञांनीं या बाबतींतील साधन—सामुग्री मिळवून वसईच्या मोहिमेचा साग्र इतिहास निर्माण करावा अशी प्रस्तुत लेखकाची आग्रहपूर्वक विनंति आहे.

उपलब्ध असलेल्या ग्रंथांत **अन्ताजी रघुनाथ कावळे** याच्या कामगिरीचे उल्लेख जागोजाग विखुरलेलें आढळतात. परंतु त्यानें अव्वलपासून अखेरपर्यंत वसईच्या मोहिमेच्या कामीं पेशव्यांस स्वार्थ-त्यागपूर्वक जी मदत केली व जें साहस केलें त्याचा सांगोपांग वृत्तांत कोठेंहि लिहिलेला आढळत नाहीं. रा. ब. **गो. स. सरदेसाई** यांनीं संशोधिलेल्या पेशवे दप्तरांतून—वसईच्या मोहिमेवर प्रकाश पाडणारा

जो पत्रव्यवहार प्रसिद्ध केला आहे त्यावरून, तसेंच थोरले बाजीराव व चिमणाजी आप्पा यांचा ब्रह्मेंद्रस्वामींबरोबर झालेला पत्रव्यवहार, साष्टीची बखर व इतरत्र मिळालेल्या माहितीवरून कावळे यांचें त्रोटक चरित्र लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांत पुष्कळ माहितीची उणीव असेलहि पण साधन–सामुग्रीच्या अभावीं इतिहासप्रेमी वाचकांनीं एवढयावरच समाधान मानून घेतलें पाहिजे. इ. स. १८व्या शतकाच्या आरंभीं हिंदुधर्मावर व पर्यायानें स्वराज्यावर विदेशी लोकांनीं जें आक्रमण केलें होतें त्याचें उच्चाटन करावयास साष्टी-वसई प्रांतांतील पुढारी अन्ताजी रघुनाथ व गंगाजी नाईक व त्या प्रांतांतील हिंदुप्रजा यांचे संघटित प्रयत्न कारणीभूत झाले, आणि त्यामुळें अन्ताजी रघुनाथ व गंगाजी नाईक यांच्या ठिकाणच्या दूरदर्शित्वाची, मुत्सद्देगिरीची व निर्मळ राष्ट्राभिमानाची कसोटी लागली, या त्यांच्या गुणांचें अनुकरण तरुण पिढीनें केलें तर तें राष्ट्रीय गुणविकासाला पोषकच होईल. संघशक्ति व राष्ट्राभिमान या दोन गोष्टी नेहमीच कोणत्याहि राष्ट्राच्या उत्कर्षाला कारणीभूत होत असतात. इ. स. १७ व्या शतकांत श्रीशिवाजी महाराजांनीं याचेंच बीजारोपण महाराष्ट्रांत केल्यामुळें औरंजेबासारख्या प्रबळ शत्रूलाहि त्या देशाचें स्वातंत्र्य हिराऊन घेतां आलें नाहीं. ही गोष्ट संताजी घोरपडे, प्रल्हाद निराजी, धनाजी जाधव, मोरोपंत पिंगळे वगैरे पराक्रमी मराठे सरदारांनीं इ. स. १६८७ पासून इ. स. १७०७ पर्यंतच्या वीस वर्षांच्या काळांत आपल्या गनिमी काव्यानें सिद्ध करून दाखविली.व तोच कित्ता पेशव्यांच्या कारकीर्दींत––बाळाजी विश्वनाथ, थोरले बाजीराव व चिमणाजी आप्पा यांनीं गिरविला. याच परंपरागत चालत आलेल्या गुणांचा परिपोष प्रस्तुत चरित्रनायकाच्या रोमरोमांत झालेला त्याच्या पत्रव्यवहारावरून वाचकांस दिसून येईल.

प्रस्तुत चरित्र लिहितांना आमचे मित्र रा. **बलराम जनार्दन आचार्य**, माजी संपादक 'नवा मनु' मासिक यांनीं वेळोवेळीं योग्य सूचना केल्या व हें चरित्र उद्बोधक होण्याच्या दृष्टीनें जी मदत केली त्याबद्दल प्रस्तुत लेखक त्यांचा आभारी आहे. त्याचप्रमाणें आमचें सन्माननीय मित्र रा. **अ. का. प्रियोळकर**, बी. ए. यांनीं पोर्तुगीझ लोकांनीं इन्क्विझिशन कोर्टामार्फत हिंदूंचा कसा छळ केला याबद्दलची गोवें सरकारच्या दप्तरांतून प्रसिद्ध झालेली माहिती आम्हांस मोठ्या उत्साहानें पुरविली त्याबद्दल त्यांचेहि आभार मानणें जरूर आहे.

मुंबई ता. १-१२-४३ संपादक

# अन्ताजी रघुनाथ कावळे ह्याच्यासंबंधानें थोर गृहस्थांनीं काढलेले प्रशंसोद्गार

वीरोत्तंस चिमणाजी आप्पा अन्ताजी संबंधानें एका पत्रांत लिहितात.

" तुम्हीं फिरंगीयांचे परम शत्रू आहां. हें फिरंगी यांस फारच असह्य. यास्तव तुम्हीं फिरंगीयांचे सरहद्दीपासून चहूं कोसावर राहावें."

S S S

थोरले बाजीराव अन्ताजीसंबंधानें लिहितात:—

तुम्हीं साहस करितां कमी न केली. मग सिद्ध करणें तें केलेत. परंतु चारी गोष्टी एका पच्छेंदे करीत म्हटल्या परिणाम कैसा लागे.

S S S

" अवघा प्रसंग तुम्हीं प्रत्ययास आणून दिला आहे. त्यास अनंत काय निमित्त आहे. तुम्हीं चित्तांत संशय आणावा असें नाहीं. "

" तुमचेहि उर्जित करूं गंगाजी नाईक यांचेविषयीं लिहिलें त्यांस तिकडे आल्यावर त्याचेहि उर्जित करूं. तुम्हीं त्यांचे समाधान करणें. "

S S S

खण्डोजी माणकर वसईच्या मोहीमेतील सुप्रसिद्ध सरदार आपल्या पत्रांत थोरले बाजीरावास लिहितातः–

" अन्ताजी रघुनाथ यांहि पूर्वीपासून सेवा चाकरी केली. फिरंगणचा मनसुब्यामुळें हैरान (ण) फैरोशानं जाहले. ठाणें घ्यावें म्हणोन सेवकास रवाना केलें. तेव्हां अन्ताजी रघुनाथ व अणजूरकर व उतेकर बरोबर दिल्हे. त्यांत तिघांनीं आव म्हणावा तैसा धरिला. सेवकांनें

तिघांस हातीं धरून, यद्यपि एकाचे हातून जाहलें तर एकाचे हातून कार्य सिद्धता करावी. त्याप्रमाणें तिघांनीं आंव धरून कार्यसिद्धता स्वामींचे पुण्यप्रतापें करून जाहली. "

ऽ ऽ ऽ

स्वातंत्र्यवीर श्री. विनायकराव सावरकर आपल्या "गोमां-तक" काव्यांत लिहितात:—

" कारस्थाना उभारी या अन्ताजीच नितांत कीं
देसाई जो स्वदेशाचा, धर्माचा ध्वज आणखी,
जो हिंदूच्या स्वपक्षांचा सत्यपक्ष म्हणूनियां
अग्रणी होऊनी पाडी पाखंडार्थ म्हणूनिया,
हिंदू स्वधर्मकर्मातें निषिद्धं रिपू जैं निघे,
एक पंत वदे हा मी स्वधर्म करितोचि घे !!
स्वधर्म प्रेम हेंही तद्वीरताच ठरूनिया
महापराध जैं धावें पुर्तुगीज धरूं तया:
' यज्ञप्रिया ! तुझी तीची हौस पूर्ण करावया
धर्मसाशन यज्ञीं ये जाळितो तुजलाचि या ! '
गृह, वैभव, वंशीया अधिकार पदांपती
तदीय लुटुनी नेतां धर्मशासक बोलतां,
मायाबळें महाराष्ट्रीं खड्ग तो उपसूनिया
अन्ताजी कांपवी आजी अंतकासमची तयां
त्या तत्सैन्यामध्यें आम्हीं तिघे गुप्तपणें तरी,
मागती अंतुनीयाच्या सदा टेहळणीवरी. "

ऽ ऽ ऽ

" अन्ताजी रघुनाथ कावळे हे शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण वसई वगैरे प्रांतांतील सरदेसाई व सरदेशपांडे इनामदार होते. ते व त्यांचे

बंधु रामचंद्रपंत यांनीं स्वधर्मरक्षणाचें महत्कार्य सिद्धीला नेण्याबद्दल इ. स. १७३० च्या पूर्वीपासून पेशव्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न चालविला होता. अंताजीपंत हे मोठे शूर, धर्मशील व हिंदुधर्माचें कट्टे अभिमानी होते, साष्टी प्रांतांत हिंदूनीं आपलीं धर्मकृत्यें प्रसिद्धपणें करूं नये असा फिरंग्यांनीं हुकूम काढला होता; तो अन्ताजीपंतानीं धाब्यावर बसवून स्वतः उघडपणें धर्मकृत्यें केलीं व इतरांकडूनही करविलीं. त्यावरून फिरंग्यांनीं अंताजीपंताची इनामत जप्त केली व त्यांना पकडून गोव्याच्या धर्मशासनमंडळासमोर नेण्याचा हुकूम केला.

—हडप

ऽ ऽ ऽ

याखेरीज रा. ब. गो. स. सरदेसाई, दि. बा. पु. बा. जोशी, श्रीयुत बेहेरे, वगैरे बऱ्याच इतिहासज्ञांचे अंताजी रघुनाथ संबंधानें प्रशंसोद्गार पूर्वी प्रसिद्ध झाले आहेत ते विस्तारभयास्तव येथें देतां येत नाहींत.

संपादक—

# —अर्पण पत्रिका—

मुंबईतील सुप्रसिद्ध स्त्रीरोगचिकित्सक डॉक्टर **नीलकंठ अनंत पुरंदरे**, M. D., F. C. P. S., F. R. C. S., O. G.

यांस त्यांच्या ऐतिहासिक—वाङ्मयव्यासंगाबद्दल

प्रस्तुत ग्रंथकर्त्यास जो आदर वाटत आहे,

त्याचें अल्प निदर्शक म्हणून हें

पुस्तक सप्रेम अर्पण

केलें आहे.

—ग्रंथकर्ता

# विषयानुक्रम


प्रस्तावना

अन्ताजी रघुनाथ कावळे ह्याच्यासंबंधानें थोर लोकांचे प्रशंसोद्गार

अर्पणपत्रिका

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण | १ लें | विषयप्रवेश ... ... ... | १ |
| ,, | २ रें | कुलवृत्तांत ... ... .. | ५ |
| ,, | ३ रें | फिरंग्यांकडून हिंदूंचा छळ ... ... | ९ |
| ,, | ४ थें | वसई मोहिमेंतली अन्ताजीची कामगिरी ... | १७ |
| ,, | ५ वें | अन्ताजी विरुद्ध कल्याणचा सुभेदार वासुदेवराव जोशी याचें कारस्थान ... ... | २७ |
| ,, | ६ वें | श्री ब्रह्मेंद्रस्वामी आणि वसईची मोहीम ... | ३५ |
| ,, | ७ वें | अन्ताजीचा अन्त... ... ... | ४० |
| ,, | ८ वें | गोव्यांतील Iqnuisition कोर्टाची त्रोटक माहिती | ४३ |
| ,, | ९ वें | शुद्धिकार्य अगर पतितपरावर्तन ... | ४९ |
| ,, | १० वें | पर्यालोचन ... ... ... | ५३ |

परिशिष्ट अ १—श्रीमन्त थोरले बाजीराव पेशवे व चिमणाजी आप्पा यांनीं अन्ताजी रघुनाथ यास लिहिलेलीं पत्रें. ... ६१

,, अ २—अन्ताजी रघुनाथ कावळे यानें पेशव्यांस लिहिलेलीं पत्रें ६६

,, अ ३—अंताजीसंबंधानें पेशव्यांस इतर लोकांनीं लिहिलेलीं पत्रें ७५

,, ब—पत्रें २५ ते २६ ... ... ... ८१

,, क—बाजीराव पेशव्यांनीं अंताजी रघुनाथचें वतन चालविण्याबद्दल त्यास दिलेला कौल ... ... ८३

,, ड—वासुदेवराव जोशी ह्यानें अंताजी रघुनाथ विरुद्ध रचलेल्या कारस्थानाबद्दलचीं पत्रें ... ... ८६

,, ई—वीरोत्तंस चिमणाजी आप्पा ह्यानें श्रीब्रह्मेंद्रस्वामी व बाजीराव ह्यांना वसईच्या विजयानंतर लिहिलेलीं पत्रें ८९

,, फ—वसईच्या मोहिमेंत ज्या किल्ल्याचें प्रामुख्यानें वर्णन केलेलें आढळतें तें. ... ... ९३

,, ग—अंताजी रघुनाथ कावळे याची वंशावळ ... ९७

धर्मवीर

# अन्ताजी रघुनाथ कावळे

## याचें अल्प चरित्र

### प्रकरण १

### विषय-प्रवेश

ऐतिहासिक काळांत भरतखंडावर सम्राट अशोकाखेरीज दुसऱ्या कोण-त्याहि राजानें एकछत्री राज्य केल्याचें आढळून येत नाहीं. सम्राट अशोकाच्या मृत्यूनंतर त्याच्या साम्राज्याची अनेक शकलें झालीं व त्यांजवर वेगवेगळ्या वंशांतील राजांची सत्ता प्रस्थापित झाली. अशोका-नंतर संग वंशांतील पुष्पमित्र राजानें राज्य केलें. परंतु त्याचें राज्य त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या वंशजाकडे फार दिवस टिकलें नाहीं. खुद्द भरतखंडाच्या दक्षिण भागांत इ. सनाच्या आरंभापासून सुमारें तेराशें वर्षे आंध्र, चालुक्य पल्लव, शिलाहार, राष्टकूट, देवगिरीचे यादव व होयसळ यादव वगैरे घराण्यांतील राजांची सत्ता क्रमाक्रमानें चालू होती. पृथ्वीराज चव्हाण याच्या गृहकलहामुळें भरतखंडांत परकीय देशांतील म्लेंच्छ लोकांचा शिरकाव झाला. क्रमाक्रमानें मुसल-मान, पोर्तुगीझ, फ्रेंच व इंग्रज यांनीं निरनिराळ्या कारणानें भरत-खंडांतील बराच भाग आक्रमिला. भरतखंडाची व्याप्ति दक्षिणोत्तर आसेतुहिमालय व पूर्व-पश्चिम-द्वारकेपासून ब्रह्मदेशापर्यंत होती. परंतु

भारतीयांना आपली प्राचीन संस्कृति व सत्ता एकवटून एकराष्ट्रीयत्त्व कसें राखावें याची कल्पनाहि शिवली नाहीं. भरतखंडांतील एका भागांतील सत्ताधीशानें दुसऱ्या भागांतील सत्ताधीश निर्बल आहे असें पाहतांच त्याजवर हल्ला करावा व त्याचें राज्य गिळंकृत करावें असा क्रम चालू होता. या शोचनीय परिस्थितीमुळें भरतखंडाची आधिभौतिक व औद्योगिक उन्नति सर्वतोपरी खुंटली. भारतीय लोकां-मध्यें संघटनेचा पूर्ण अभाव आहे, हें जाणून परकीय देशांतील लोकांनीं या गोष्टीचा फायदा घेतला.

देवगिरीच्या यादव वंशांतील 'अखेरचा राजा रामदेवराव यादव याच्या नेभळटपणामुळें अल्लाउद्दीन खिलजीनें यादवांचें साम्राज्य संपु-ष्टांत आणिलें व दक्षिणेंतील बलिष्ट हिंदु राजास शह दिला. विजया-नगरचें साम्राज्य याच राष्ट्रीय भावनेच्या अभावामुळें विलयास गेलें. नाहीं म्हणावयास श्रीछत्रपती शिवाजीमहाराज यांस एकंदर हिंदु-समाज सुसंघटित करून त्याजमध्यें राष्ट्रीय भावनेची ज्योत निर्माण केल्यावांचून हिंदु लोकांस म्लेंच्छाविरुद्ध टक्कर देतां येणार नाहीं याची बरोबर कल्पना होती. त्यामुळें विसकळीत असलेला हिंदु-समाज एकत्र करून मोंगलाच्या प्रचंड सत्तेला झुगारून देणें त्यास शक्य झालें.

इ. स. १६ व्या शतकांत दर्यावर्दीपणांत कुशल असलेल्या पोर्तु-गीझ लोकांनीं कोंकणच्या पश्चिम किनाऱ्यावरील चौल ( चेमुल्य ), सोपारें ( वसई ), श्रीस्थानक ( ठाणें ), गोपकग्राम ( गोवें ) वगैरे मह-त्त्वाचीं व्यापारी बंदरें आरमाराच्या जोरावर आपल्या ताब्यांत घेतलीं व त्या ठिकाणीं मजबूत किल्ले बांधून आपला अम्मल बसविला. पर-देशचा माल सदरील बंदरांतून हिंदुस्थानांत येत असे, त्यामुळें व्यापारी दृष्टीनें हीं बंदरें फार महत्त्वाचीं होतीं, तीं त्यांच्या ताब्यांत

गेल्यामुळें हिंदुस्थानच्या व्यापाराची त्यांना सहजच नाकेबंदी करतां आली.

जिंकलेल्या प्रांतांत पोर्तुगीझ लोकांची सत्ता प्रस्थापित झाल्याबरोबर त्यांनीं त्या प्रांतांतील हिंदु लोकांत खिस्तीधर्माचा प्रसार करण्यास सुरुवात केली. पोर्तुगीझ, स्पॅनिश व डच यांनां खिस्तीधर्म सर्व धर्मापेक्षां श्रेष्ठ आहे व त्या धर्माचा प्रसार करणें हें आपलें पवित्र कर्तव्यकर्म आहे असें वाटत असे. या धर्मवेडामुळें धर्मप्रसाराच्या कामीं ते लोकांवर अत्यंत जुलूम करीत. सार्वजनिक विहिरींत अभक्ष्याभक्ष पदार्थ टाकून देवभोळ्या लोकांत खिस्तीधर्माचा प्रसार करणें त्यांना सुलभ पडे. हिंदु लोकांनां आपला धर्म प्राणापेक्षांहि प्रिय असल्यामुळें ते खिस्ती धर्म स्वीकारण्यास बिलकूल कबूल नसत. त्यामुळें पोर्तुगीझ लोकांकडून त्यांचा फार छळ होऊं लागला. या धर्मछलास कंटाळून हजारों हिंदु लोक फिरंग्यांच्या प्रांतांतून आपलीं घरेंदारें, जमीनजुमला सोडून परागंदा झाले.

ठाणें शहरापासून सुमारें ५-६ मैलांवर कान्हेरी येथील डोंगरावर बुद्धांच्या गुहा होत्या, त्यांत बौद्धभिक्षूंचें वसतिस्थान असून बौद्ध धर्माचें शिक्षण त्या ठिकाणीं देण्यांत येत असे. तेथील बुद्ध भिक्षूंचा फिरंग्यांनीं भयंकर छळ करून खिस्ती धर्माची दीक्षा घेण्यास त्यांना भाग पाडलें. सदरील गुहांनजिक कांहीं अंतरावर असलेल्या मंडपेश्वर गांवीं बुद्धविहार होते; त्याचा विध्वंस करून त्या जागीं त्यांनीं खिस्ती देवालय बांधलें. तसेंच सिलोन ( सिंहलद्वीप ) बेटामध्यें पोर्तुगीझ लोकांचा अम्मल सुरू होतांच तेथील बौद्धधर्मीय व इतर लोकांस त्यांनीं खिस्तीधर्म स्वीकारण्यास भाग पाडलें, व त्यांच्या विहारांतील स्तुपांचा व मूर्तींचा भंग केला. त्याचप्रमाणें त्यांस खिस्ती नांवें धारण करण्यास भाग पाडलें. धर्मच्छळाच्या कामीं खिस्ती धर्म प्रसारकांनीं मुसलमानी धर्मप्रचारकांना मागें टाकलें, असेंच कोणीहि म्हणेल.

त्यांतल्या त्यांत हिंदूंचे धर्मगुरु जे ब्राह्मण त्यांना धर्मांतर करण्यास भाग पाडलें असतां इतर जातींचे हिंदु सहजच ख्रिस्तीधर्मांत येतील, अशी फिरंगी लोकांची खात्री होती. अन्ताजी रघुनाथ कावळे हा पोर्तुगीझ अमलाखालील वसई गांवचा रहिवाशी होता. शिवाय त्याच्याकडे साष्टी प्रांतांतील मालाड व इतर गांवचे सरदेसाई व सरदेशपांडेपण फार वर्षांपासून होतें. इ. स. १३ व्या शतकापासून साष्टी व वसई प्रांतांतील यच्चयावत् हिंदु लोकांचे पौरोहित्य त्याजकडे होतें. इ. स. १३ व्या शतकांत देवगिरी येथें यादव घराण्यांतील राजा रामदेवराव यादव राज्य करीत होता. त्यानें उत्तर कोंकणांतील ठाणें येथें शिलाहार वंशांतील अखेरचा राजा सोमेश्वर राज्य करीत होता, त्याचा पराभव करून यादवांची सत्ता प्रस्थापित केली, व हिंदुधर्मीयांची नित्य-नैमित्तिक धर्मकृत्यें योग्य रीतीनें चालावीं म्हणून तेथील पौरोहित्य अन्ताजी रघुनाथ कावळे याचे पूर्वज पुरुषोत्तमपंत नाईक-कावळे यास वंशपरंपरेनें दान दिलें व तें तेव्हांपासून म्हणजे शके १२२१ पासून आजवर आमच्या चरित्रनायकाच्या वंशजांकडे अव्याहत चालू आहे. अन्ताजी रघुनाथ कावळे यानें परधर्मीय लोकांपासून हिंदु धर्मावर होत असलेला जुलूम बंद करून त्यांची सत्ता संपुष्टांत आणण्याच्या कामीं मुत्सद्दीपणाचें प्रयत्न कसे केले याची माहिती पुढील प्रकरणांवरून वाचकांना होईल.

# प्रकरण २

# कुल–वृत्तांत

अन्ताजी रघुनाथ कावळे याचा जन्म केव्हां कोठें व कोणत्या वर्षी झाला याबद्दल विश्वसनीय माहिती उपलब्ध नाहीं ! अन्ताजी रघुनाथ कावळे हा शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन वाजसनेय शाखेचा ब्राह्मण होता. याचें गोत्र भारद्वाज व कुलदेवता यमाई मातापुर-निवासी होती. या घराण्याचा मूळ पुरुष पुरुषोत्तमराव नाईक कावळे. याच्या वडिलांचें नांव श्रीधरपंत व आजाचें नांव रघुनाथपंत असें होतें. देवगिरीच्या सुप्रसिद्ध यादव राजघराण्याचें बहुमानाचें राज-गुरुत्व पुरुपोत्तमराव नाईक–कावळे याजकडे होतें. यास विश्वनाथपंत नांवाचा एक बंधु होता. पुरुषोत्तमराव याचा मुलगा नायकराव याचा उल्लेख इ. स. १४१६ मध्यें बेदरच्या बादशहानें त्याचेतर्फे दिलेल्या एका महजरांत केलेला आढळतो. अन्ताजी रघुनाथ यास रामचंद्र व गणेश या नांवाचे दोन बंधु होते. नायकराव कावळे व अन्ताजीपंताचे वडील रघुनाथपंत यांच्या दरम्यान सुमारें दोनशें वर्षांचा काल निघून गेला. त्या अवधींत सदरील कावळे घराण्यांत कोणकोणते पुरुष निर्माण झाले त्यांचीं नांवें परिशिष्ट "फ" मध्यें देण्यांत आलीं आहेत.

देवगिरीच्या यादव घराण्यांतील अखेरचे राजे महादेवराव व राम-चंद्रराव जाधव हे होते. महादेवराव जाधव याची कारकीर्द इ. स. १२६० पासून इ. स. १२७१ पर्यंत होती व रामदेवराव जाधव याच्या कारकीर्दीस इ. स. १२७१ मध्यें आरंभ होऊन–देवगिरीचें राज्य इ. स. १३०९ मध्यें संपुष्टांत आलें, आणि १३३१ सालीं तें कायमचे विलयास गेलें. महादेवरावानें आपल्या कारकीर्दींत गुजराथ,

लाट, कर्नाटक व उत्तरकोंकण हे प्रांत मोठ्या पराक्रमानें जिंकून आपल्या राज्यांत सामील केले. इ. स. १२६६ च्या सुमारास उत्तर कोंकणची राजधानी श्रीस्थानक (हल्लींचें ठाणें शहर) होती. येथें शिला हार वंशांतील अखेरचा राजा सोमेश्वर हा राज्य करीत होता. यादव राजानें उत्तर कोंकणचें राज्य खालसा करून या प्रांताचा कारभार आपला प्रतिनिधि भारद्वाज गोत्रीं कृष्णदेव यांजकडे सोंपविला व त्यास सुभेदारीच्या कामावर नेमिलें. खजिनदाराचें काम चांगदेव नांवाच्या गृहस्थाकडे देऊन मुख्य अमात्याच्या जागेवर एकदेव पंडिताची योजना केली. पंढपूरच्या चौऱ्यांयशींच्या शिलालेखांत श्रीविठ्ठलमंदिराच्या जीर्णोद्धारासाठीं ज्यांनीं देणग्या दिल्या, त्यांचीं नांवें नमूद केलेलीं आहेत; त्यामध्यें महादेवराव प्रौढ प्रताप, रामचंद्रराव, हेमाद्री व कोकणा केशव देव म्हणजे कृष्णदेव व पुरुषोत्तम नाईक कावळे यांचा उल्लेख केलेला आहे. अल्लाउद्दीन खिलजीनें रामदेवराव जाधव याचा पराभव करून त्यास दिल्लीच्या बादशहाचें मांडलिक बनविल्यानंतर त्याचा मुलगा बिंबदेव हा उत्तर कोंकणांत आला व त्या प्रांताचा कारभार स्वतः पाहूं लागला. त्यांनीं आपल्याबरोबर देवगिरी व पैठण येथून बरीच निवडक सरदार मंडळी आणिली होती, त्या मंडळींत देवगिरीच्या यादव राजघराण्याचे राजगुरु पुरुषोत्तमराव नाईक-कावळे हेहि एक होते. त्याच सुमारास ठाणें प्रांतांतील मालाड, वसई, अंजूर वगैरे गांवचा वतनदार सरदेशमुख व सरदेशपांडे गोविंद मिटकरी याचा मृत्यु झाला होता; तो निपुत्रिक असल्यामुळें त्याचें वतन व जोशी-उपाध्यायपणाची वृत्ति त्याची विधवा चांगुणाबाई हिजकडून बिंबदेवानें विकत घेतली आणि शके १२२१ प्लवनाम सवंत्सरीं वैशाख व ॥ ३० सूर्यग्रहणाचा योग साधून सदरील वृत्ति पुरुषोत्तमराव कावळे यास दान दिली व त्याबद्दलचें लेखी दानपत्र त्यास करून दिलें. शिवाय तें दानपत्र शिलांवर कोरवून त्या शिला आपल्या राज्यांत ठिकठिकाणीं बसविण्याचा हुकूम केला. याप्रमाणें

पुरुषोत्तमराव कावळे याजकडे ठाणें जिल्ह्यांतील मालाड, अंजूर, वसई, सोपारा, तारापूर व कुलाबा जिल्ह्यांतील उरण येथील सरदेशमुखी व सरदेशपांडेपण आले. पुरुषोत्तमरावाचे पश्चात् त्याचा मुलगा नायकराव व मालाडचा रहिवासी सोमदेसल्याचा मुलगा देवदेसला ठाकूर यांचें दरम्यान सदरील वतनासंबंधानें लढा उत्पन्न झाला व तो बेदरचे बादशाह यांजकडे अखेरच्या निर्णयासाठीं गेला. इ. स. १४१५मध्यें सदरील बाहशहानें पंचासमक्ष पुरावा घेऊन नायकरावातर्फे निवाडा दिला; व सदरील वतन त्याजकडे कायम केलें. तेंव्हांपासून सदरील वतन अन्ताजी रघुनाथ कावळे याजकडे अव्याहत चालू होते. साष्टी बेटांतील मालाडचे खोत यांजकडून सदरील वतनाबद्दल वार्षिक वेतन अन्ताजी कावळे याच्या वारसास अजूनहि मिळत आहे. मालाडचे खोत व कावळे यांच्या दरम्यान या बाबतींत वाद उत्पन्न झाल्यावर कावळे यांनें आपला हक्क नामदार हायकोर्टातून प्रस्थापित करून घेतला. अन्ताजी रघुनाथ कावळे यास पोर्तुगीझ भाषा चांगली येत होती. त्यामुळें आँग्ल वैद्यकीय संबंधींचें त्या भाषेंतील ग्रंथावलोकनामुळें आधींच आर्यवैद्यकींत निष्णात असलेल्या अन्ताजीनें आपल्या ज्ञानांत भर घातली. वसई प्रांतांत त्याची नामांकित वैद्यांत गणना होती. शिवाय मालाड व वसई येथें जोशी–उपाध्येपणाची वृत्ति त्याजकडे असल्यामुळें त्या प्रांतांतील हिंदु समाजांत त्याचा दर्जा फार मोठा होता. साष्टी व वसई प्रांतांत पोर्तुगीझांचा अम्मल सुरू झाल्यापासून तरवारीच्या जोरावर त्यांनीं हिंदु लोकांनां जबरीनें बाटविण्याचा उपक्रम केला. हिंदु समाज जात्याच धर्मभीरू व देवभोळा त्याचप्रमाणें, शुद्धाशुद्धतेच्या वेडगळ कल्पना त्यांच्यांत कैक वर्षे रूढ झाल्या असल्यामुळें, सार्वजनिक विहिरींत गोमांस अगर पाव-बिस्किटें टाकलेल्या विहिरींतील पाणी प्याल्यानें आपण धर्मभ्रष्ट होतों किंवा बाटतो अशी त्यांची समजूत असे. हिंदु देवालयें भ्रष्ट करणें, त्यांच्या स्त्रियांना बाटवून त्यांजबरोबर लग्न

करणें वगैरे धर्मच्छलांचे अनन्वित प्रकार सतत पोर्तुगीझ लोकांकडून चालू असत.

साष्टी व वसई प्रांतांत पोर्तुगीझांचा अम्मल सुरू झाल्यापासून शें-सव्वाशें वर्षांत तरवारीच्या जोरावर व अडाणी लोकांच्या देवभोळे-पणाचा फायदा घेऊन त्यांनीं जबरदस्तीनें शेंकडों लोकांनां ख्रिस्तीधर्म स्वीकारावयास लाविलें. अन्ताजी रघुनाथ कावळे हा धर्मदृष्ट्या हिंदु-समाजाचा लोकप्रिय पुढारी असल्यामुळें ख्रिस्ती धर्म प्रचारकांनां त्याची साहिजकच मोठी अडचण भासत असे; त्यामुळें कोणत्या तरी उपायानें आपल्या मार्गांतील हा कांटा दूर करण्याचा त्यांचा विचार होता. अखे-रीस त्याजवर तोहमत ठेऊन गोंवे येथील इन्क्विझिशन-धर्मशासन समी-क्षण न्यायमंदीर-(स्पेशल कोर्ट) पुढें त्यास उभें राहण्याचा हुकूम कर-ण्यांत आला. प्रस्तुत हुकमाचा पुढें काय परिणाम होणार व त्यामुळें आपणांवर कोणता भयंकर प्रसंग गुदरेल याची पूर्ण कल्पना अन्ताजी रघुनाथ कावळे यास होतीच. अशा आणीबाणीच्या प्रसंगांतून युक्तीनें स्वतःचा बचाव करून आपल्या हिंदुबांधवांनां परधर्मीयांच्या छळांतून मुक्त होण्याचा मार्ग दाखविणें त्यास आवश्यक होतें. आणि त्या दृष्टीनें त्यानें पोर्तुगीझ राज्याची हद्द सोडून मुंबई येथें वास्तव्य केलें. पोर्तु-गीझ सरकारनीं गोवें येथें इन्क्विझिशन कोर्ट इ. स. १५५६ सालीं स्थापिलें असा कांहीं ग्रंथांत उल्लेख केलेला आढळतो. ख्रिस्तीधर्म स्वीकारण्यास जे लोक विरोध करीत होते, त्यांना या कोर्टापुढें आणून त्यांची चौकशी केली जात असे व त्यानें ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याचें नाकारल्यास त्यास भयंकर शिक्षा फर्माविण्यांत येत असत. याबद्दलची सविस्तर माहिती पुढें दिली आहे.

# प्रकरण ३

# फिरंग्यांकडून हिंदूंचा छळ

साष्टी व वसई प्रांतांत हिंदूंचा धर्मच्छळ कशा रीतीनें चालला होता याचें हुबेहुब चित्र साष्टीच्या बखरकारानें रेखाटलें आहे, त्यावरून वाचकांस त्याची यथार्थ कल्पना येईल, यास्तव तो मजकूर आम्हीं जशाचा तसा येथें उद्धृत करितों.

"ठाणें, कोंकण व बिंबस्थान हें राज्य फिरंगी याणें घेतलें. घेऊन कुबुद्ध धरीली जमिनदारांचि वतनें बुडविली ॥ गावाचा गाव धरून बाटविला किरिस्ताव केले. सासष्ट गाव व आगर वसईचा बहुतेक लोक धरून बाटविले. बाप मेला म्हणजे घरांत प्रेत असतां त्याची पोरें जी असतील ती नेऊन बाटवावीं ॥ ऐसा उपद्रव महाराष्ट्रासि मांडिला. मग लोक कष्टि जाहाले. पलोन कोण्हि कोण्हि दक्षण प्रांति जाऊन राहिले क्रिया कर्मे लोप जाहला देवधर्म बुडाला प्रान्ताची तीर्थें क्षत्रें लोपलि देव देवालयें फोड तोड केली आपलि देवळे फिरंगीयाणे बांधलि फिरंगी धर्म चालवावयास लागले ॥ मुलकांत ब्राह्मण फिरता कामा नये ॥ कोण्हि ग्रहस्तानें काहि कार्य होम उद्यापनें आरंभिली म्हणजे ग्रहस्ताचे घर अवघे धरावे सेजारी पाझारी त्या घरांत सांपडले त्यासहि धरून न्यावे बंदिकष्टी करावे ॥ बंदिखानियांत कुजवावे असा अनर्थ मांडिला त्या मुलकाचे ब्राह्मण पैद (१) होऊन फिरावयास लागले माराष्ट्रधर्माचे कर्म अवघेच राहिले मुलकांत कोणे एक गांवावर सेंदराचा धोंडा सुपारी एवढा सापडला म्हणजे तो गांव धरून नेऊन बाटवावा हर कोण्हि दुस्मानगिरीनें चार साहिदि उभे करावे ॥ दुसमान पाद्रिजवळ जाऊन येकाध्याने बाळ (ट) घ्यावें

आणि ते शाइदि नेऊन शाइदि देवावी ॥ म्हणजे त्या ग्रहस्ताचे घर नेऊन बाटवावे ॥ न्याय अन्याय पाहावयाचा दर्कार नाहि ॥ या जातिचा उपद्रव महाराष्ट्रास मांडिला महाराष्ट्रास अभय देता कोण्हि नाहीं ॥ त्यामध्यें पाठारे ज्ञातिचे मराठे लोक त्याची पाठ हात धुवून घेतलि त्या ज्ञातिचे लोक बहुत बाटविले वरकड शेणवी व प्रभु व वाणि उदमी यास उपद्रव थोडा पाठारे ज्ञातिस उपद्रव फार केला तो श्रीदेवास न सोसे मग पूर्वी वांदरे गांव अवघेच धरून बाटविले त्यामधून साळोके या रायापैकी बालनाईक देश नारगोडे व त्याचे भाव दोघेजण मधिल भिव नाईक व धाकटा तान नाईक ते समई आपल्या बायका व हातरें सांभाळून निघाले ते कळव्यास आले तेथून अनजुरास आले. ”

साष्टीच्या बखरकरांनीं फिरंग्यांच्या धर्मच्छलाची जी वर हृदयद्रावक हकीकत दिली आहे ती वाचून कोणाहि सहृदय माणसाचे अंत:करण कळवळल्यावांचून राहणार नाहीं. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीं पोर्तुगीझ सरकारनें गोमंतकांत हिंदूंनां जबरीनें ख्रिस्ति करण्याच्या कामीं जे अमानुष अत्याचार केले, त्यांचें हृदयस्पर्शी वर्णन आपल्या गोमंतक काव्यांत केलें आहे. तें त्यांनीं ऐतिहासिक ग्रंथाच्या आधारावर लिहिलें आहे. सदरील वर्णन वर लिहिलेल्या बखरकराच्या वर्णनाशीं तंतोतंत जुळतें. ख्रिस्ताच्या कळपांत येण्यास जो नाकारील त्यास पुढील शिक्षा करण्यांत येत असत. चावडीवर नेऊन रक्तबंबाळ होईपर्यंत त्यांस चाबकानें मारणें, उलटे टांगून मारणें, जिवंतपणीं जाळणें, हात तोडून तें गळयांत बांधून त्यास गोमांतकाबाहेर हद्दपार करणें वगैरे नाना तऱ्हेच्या अनन्वित शिक्षा धर्मशासन समीक्षण कोर्टाकडून विरोधकांस देण्यांत येत असतां गोव्याच्या एका थोर मनाच्या व्हाइसरॉयानें सदरील अमानुष शिक्षांविषयीं आपली नापसंती पोर्तुगालच्या राजाकडे पत्रानें कळविली हती. खुद्द पोर्तुगीज ग्रंथकारांनीं या शिक्षांचें सचित्र वर्णन आपल्या

ग्रंथांत नमूद केलें आहे त्यावरून वरील मजकूराच्या खरेपणाबद्दल वाचकांची खात्री होईल.

इ. स. १३०९ सालीं अल्लाउद्दिन खिलजी व देवगिरीचे रामदेवराव जाधव यांचे दरम्यान घनघोर युद्ध झालें. त्यांत रामदेवरावाचा शूर–पराक्रमी मुलगा शंकरदेव हा मारला गेला. रामदेवरावाचा दुसरा मुलगा बिंबदेव हा उत्तरकोंकणांत आला त्यावेळीं जी निवडक सरदार मंडळी त्यानें आपल्याबरोबर आणिली होती, त्यांत प्रामुख्यानें नाईक घराण्याचे पूर्वज होते. सदरील नाईक नांवाच्या क्षत्रिय कुलानें कल्याण व भिवंडी याच्यादरम्यान असलेल्या अंजूर गांवीं वास्तव्य केलें. अंताजी रघुनाथ कावळे याच्या वेळीं नाईक घराण्यांत पांच कर्ते पुरुष होते, त्यांचीं नांवें १ गंगाजी २ भिकाजी ३ मुरारजी ४ शिवाजी आणि ५ नारायण. साष्टी प्रांतांतील इतर हिंदु लोकांबरोबर नाईक घराण्यावरहि धर्मांतर करण्याचा दुर्धर प्रसंग येण्याची चिन्हें दिसूं लागलीं होतीं. प्रस्तुत नाईक घराणें मूळचेंच क्षात्रतेजसंपन्न होतें आणि मध्यंतरीं तीन-चारशें वर्षें जरी प्रत्यक्ष युद्धांत त्यांनीं भाग घेतला नव्हता तरी त्यांच्या अंगचें क्षात्रतेज किंचितहि लुप्त झालेलें नव्हतें! ख्रिस्तीधर्म स्वीकारण्याचें नाकारल्यामुळें त्यांचेहि वतन व जमीन जुमला फिरंगी सरकारनें इ. स. १७१८ सालीं सरकारजमा केला. त्यामुळें या घराण्यांतील सर्व मंडळीस मराठ्यांच्या अमलाखालीं असलेल्या कल्याणच्या सुभेदाराचा आश्रय करावा लागला.

नाईकबंधु फिरंग्यांच्या धर्मच्छलास त्रासून आपलें जप्त झालेलें वतन परत मिळावें म्हणून आपलें कुलदैवत चिंचवडचे श्रीगणपतीस अनन्य भावानें शरण गेलें. या त्यांच्या अनन्य भक्तीमुळें श्री प्रसन्न होऊन त्यांस संकट निवारण्याचें अभय दिलें. गोब्राह्मण प्रतिपालक व हिंदुधर्माचे संरक्षक श्रीशिवाजी महाराज यांचेनंतर श्रीशाहूछत्रपति हे त्यावेळीं गादीवर अधिष्ठित होते. गंगाजी नाईक यानें आपणांवर

फिरंगी लोकांनीं आणलेल्या दुर्धर प्रसंगाची करुण कहाणी श्रीछत्रपती-पुढें निवेदन केली. वरील हकीकत साष्टीच्या बखरींत दिलेली आहे. पण गंगाजी नाईक याच्या या वैयक्तिक गाऱ्हाण्याकडे श्रीशाहूछत्रपति व त्यांचे प्रतिनिधि श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांना कांहीं वर्षे लक्ष देण्यास सवड झाली नाहीं.

पोर्तुगीझ लोकांनीं अन्ताजी रघुनाथ कावळे याचेंहि मालाड येथील देशपांडे वतन जप्त केलें होतें ही हकीकत पूर्वीं आली आहे. गंगाजी नाईक व अन्ताजी रघुनाथ कावळे या उभयतांवर सारखाच प्रसंग गुदरल्यामुळें दोघेहि समदु:खी होते. अन्ताजी रघुनाथ कावळे यानेंहि आपलें वतन परत मिळविण्याकरितां बरीच खटपट केली; पण अखेरीस त्यास यश आलें नाहीं. शेवटीं त्यानें पुण्यास श्रीमंत बाजीराव पेशवे यांस मध्यस्थी घालून मुंबई येथील इंग्रज सरकार मार्फत पोर्तुगीझ सरकार-कडे दाद लावून घेण्याचा प्रयत्न केला. पेशवे सरकारनें मुंबई येथील गव्हर्नर व ईस्ट इंडिया कंपनीचे प्रेसिडेंट जोहन हॉर्न यांस अन्ताजी रघुनाथ कावळे यास देशपांडे वतन कसे मिळालें वगैरे हकीकतीची पूर्वपीठिका देऊन कावळे यांचे वतन परत देवविण्याविषयींचें शिफा-रसपत्र लिहिलें. (हें पत्र परिशिष्ट अ यांत दिलें आहे) पण अशा प्रकारची शिफारस आपणास पोर्तुगीझ सरकारकडे करतां येत नाहीं असा जबाब ता. ६ मार्च १७३४ रोजीं इंग्रज सरकारकडून मिळाला. 'जो दुसऱ्यावरी विश्वासला। त्याचा कार्यभाग बुडाला' या उक्तीनुरूप स्वावलंबनाच्या मार्गानें हिंदुसमाजानें संघटित होऊन पोर्तुगीझ लोकांची सत्ता हिंदुस्थानांतून नष्ट केल्याखेरीज हिंदू लोकांवर होत असलेला जुलूम नष्ट करण्याचा दुसरा मार्ग नाहीं असा विचार अन्ताजी रघुनाथ कावळे यानें केला, आणि त्या बाबतींत आपले यजमान व स्नेही अंजु-रचे नाईकबन्धु यांजबरोबर विचारविनिमय केला; आणि उभय पुढाऱ्यांच्या मतानें पोर्तुगीझ लोकांना प्रतिकार करण्याकरितां अखिल

हिंदूंचें संघटन करण्याचें त्यांनीं ठरविले. अन्ताजीचे वेळीं ब्राह्मण ब्राह्मणेतर असे पक्षोपक्ष अस्तित्त्वांत नव्हते त्यामुळें ब्राह्मणांबद्दल सर्व हिंदूंना अत्यंत आदर वाटत असे. अंगच्या सात्त्विक व स्वाभिमानी गुणामुळें ब्राह्मण कोणत्याहि लोकोपयोगी कार्यांत अग्रभागीं असत. व लोकहि त्यास योग्य ती मदत निःस्वार्थ बुद्धीनें करीत. अन्ताजी रघुनाथ कावळे हा साष्टी व वसई प्रांतांतील वतनदार शिवाय जोशी—उपाध्येपणामुळें हिंदुधर्मीयांबरोबर त्याचा जिव्हाळ्याचा संबंध येत होता. पोर्तुगीझांच्या धर्मच्छळामुळें हिंदूंचें जीवित—इभ्रत व धर्म यांजवर घाला पडलेला पाहून अन्ताजी कावळे याचें मन विपण्ण होत असलें पाहिजे. इतर कोणांपेक्षां ब्राह्मणांवर धर्मसंरक्षणाची खरी जबाबदारी असते ही गोष्ट अन्ताजी रघुनाथ कावळे यास पूर्णपणें ठाऊक होती; म्हणून त्यानें पुढाकार घेऊन हिंदु लोकांवर ओढवलेल्या दुर्धर प्रसंगाचें निवारण करण्याकरितां अंजूरचे आपले यजमान व सहाय्यक गंगाजी नाईक व त्याचे बंधु यांच्याशीं सल्लामसलत केली. गंगाजी नाईक व त्यांचे इतर क्षत्रिय बंधु यांनीं या बाबतींत सहकार्य करण्याची प्रतिज्ञा केली. अंजूरचे नाईक घराणे मूळचेंच क्षात्रतेज संपन्न–पराक्रमी, तसेंच स्वाभिमानी असल्यामुळें पोर्तुगीझांच्या धर्मछळाच्या प्रकारा मुळें त्यांच्या ठिकाणीं क्षात्रतेजाची स्फूर्ति उद्दीपित झाली व हिंदूंच्या संघटनेमुळें आपण फिरंग्यांची सत्ता सहज उलथून पाडूं असा आत्मविश्वास त्यांना वाटूं लागला; आणि त्याप्रमाणें अन्ताजी रघुनाथ कावळे व गंगाजी नाईकप्रभृति पुढारी कार्याला लागले. यावेळीं कल्याणपर्यंत मराठ्यांची सत्ता होती व तेथील अधिकारी हिंदु धर्माभिमानी होते; तेव्हां त्यांचें सहाय्य घेण्याचें वरील पुढाऱ्यांनीं ठरविलें. श्रीशिवाजी महाराज यांनीं मुसलमानी राज्याचा छळ बंद पाडून हिंदुपद पादशाही संस्थापिली व त्यांचे पश्चात औरंगजेब बादशहानें मराठ्यांचें राज्य कायमचे नष्ट करण्याच्या कामीं अटोकाट

प्रयत्न केलें असतांहि मराठ्यांच्या चिकाटीमुळें व शौर्यामुळें त्यास यश आले नाहीं ही गोष्ट अगदीं ताजी होती. त्यामुळें मराठ्यांच्या सहाय्यानें फिरंगी लोकांचें उच्चाटन करावें असें एकमतानें ठरलें. ठाणें जिल्ह्यांतील ठिकठिकाणच्या लोकांच्या भेटी घेऊन अन्ताजी रघुनाथ कावळे व गंगाजी नाईक यांनीं हा विषय लोकांपुढें मांडला. अखिल हिंदुलोक स्वधर्माभिमानाच्या रज्जूंनीं एकत्र बांधले गेले असल्यामुळें त्यांनीं फिरंग्याची सत्ता नष्ट करण्याच्या कामीं सर्व प्रकारचे सहाय्य करण्याचें कबूल केलें. अशा प्रकारची सर्व योजना झाल्यानंतर पेशवे सरकारची मदत मागण्याकरितां अंताजी रघुनाथ कावळे व गंगाजी यांस नेतृत्व देण्यांत आलें. उभयतांनीं पुण्यास जाऊन श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांची गांठ घेतली. अंजूरच्या गंगाजी नाईक प्रभृतींकडून फिरंग्याच्या जुलुमाची हकीकत पेशवे सरकारास पूर्वीं कळली होतीच; पण त्यावेळीं त्यांनीं चालढकल करून इतर महत्त्वाच्या कार्याकडे लक्ष दिलें; पण प्रस्तुत उभय शिष्टांच्या शिष्टाईचा परिणाम थोरले बाजीराव व त्यांचें बंधु चिमणाजीआप्पा यांच्या मनावर होऊन पोर्तुगीझ लोकांचा वेळींच बंदोबस्त करण्याचें अभिवचन आलेल्या पुढाऱ्यांस त्यांनीं दिलें व त्या बाबतींत वसईचें सर्व राजकारण त्यांजवर सोपविलें.

दरम्यान पेशव्यांनीं पोर्तुगीझ अधिकाऱ्यांबरोबर सलोखा करण्याचा प्रयत्न केला; पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. पेशव्यांपाशीं आरमार नसून आंगरे यांजपाशीं उत्कृष्ट आरमार असलें तरी त्यांच्याशीं पेशवे सरकारचें वैमनस्य होतें ही गोष्ट पोर्तुगीझ लोकांस माहित होती. आपल्या आरमारी सामर्थ्यापुढें पेशवे यांचें कांहीं चालावयाचें नाहीं अशी पोर्तुगीझ सरकारची खात्री असल्यामुळें पेशव्यांनीं समेटाचा टाकलेला डाव हुकला. पण त्यामुळें पेशवे निराश न होतां उलट पोर्तुगीझांची सत्ता नष्ट करण्याचा थोरले बाजीराव व चिमणाजी आप्पा यांनीं

निश्चय केला; तरी पण पेशव्यांचें लक्ष उत्तरेकडील राजकारणांत गुंतल्यामुळें पोर्तुगीझांचा ताबडतोब समाचार घेण्यास योग्य ती व जरूर तेवढी तयारी करण्यास त्यास सवड झाली नाहीं.त्यामुळें साष्टी प्रांतांतील राजकारणाची जबाबदारी अंगावर घेणारे अन्ताजी रघुनाथ कावळे व त्याच्या खाद्यांसखांदा लावून सर्वप्रकारें सहकार्य करणारे अंजूरकर गंगाजी व त्याचे बन्धु यांची पराकाष्टेची निराशा झालीं. पोर्तुगीझ लोकांच्या धर्मच्छलाचें कार्य अव्याहत सुरू असल्यामुळें साष्टी प्रांतांतील हिंदूंची परिस्थिति अत्यंत गंमीर स्वरूपाची झाली होती. स्वतःच्या अब्रूचें–शीलाचें संरक्षण करण्याकरितां हिंदुलोक आपापलीं घरेंदारें, जमीनजुमला सोडून परागंदा झाले होते. निर्वाहाचें साधन नष्ट झाल्यामुळें अनेकांची उपासमार होत होती. मुंबई बेटावर इंग्रजांचा अम्मल होता व तेथील सरकार कोणाच्याहि धर्मात ढवळा ढवळ करीत नसल्यामुळें पोर्तुगीझांच्या धर्मच्छळास त्रासलेले लोक त्या बेटांत येऊन राहिले. पोर्तुगीझांच्या अम्मलाखालीं असलेली हिंदु प्रजा अशा रीतीनें गांजली होती ही गोष्ट पेशव्यांस माहित असूनहि त्यांजकडून पोर्तुगीझांचे पारिपात्य होत नाहीं हें पाहून सर्व हिंदु प्रजा अत्यंत उद्विग्न झाली होती,आणि ही परिस्थिति आणखी कांहीं काळ राहिली तर वसई साष्टी प्रांतांतून हिंदु धर्माचें उच्चाटन झाल्यावांचून रहाणार नाहीं असें त्यांस वाटूं लागलें. याच सुमारास थोरले बाजीराव व त्रिंबकराव दाभाडे यांच्या दरम्यान लढा उत्पन्न होऊन डभोय येथें त्यांचें युद्ध झालें. या युद्धांत त्रिंबकराव दाभाडे मारला गेला व त्याची पत्नी उमाबाई पुण्यानजीक असलेल्या तळेगांव येथें राहावयास गेली. तिला आपल्या शूर पतिप्रमाणेंच मराठी राज्याचा उत्कर्ष व्हावा व हिंदुधर्माचें संरक्षण व्हावें अशी फार इच्छा होती. अन्ताजी रघुनाथ कावळे व गंगाजी नाईक या पुढाऱ्यांस उमाबाईचा देशाभिमान व धर्माभिमान माहीत असल्यामुळें वसई साष्टी प्रांतांत पोर्तुगीझ लोकांनीं चालविलेल्या हिंदुधर्मीयांच्या

छळाची हकीकत त्यांनीं उमाबाईची भेट घेऊन सांगितली. पण अन्ताजी व गंगाजी यांनीं उमाबाईची भेट घेतली ही गोष्ट पेशव्यांचा नातेवाइक कल्याणचा सुभेदार वासुदेवराव जोशी यास रुचली नाहीं आणि त्यामुळें अन्ताजीचें उच्चाटन कसें करावें याचा तो विचार करूं लागला व नंतर अन्ताजीचा सूड यानें कसा उगवला ही हकीतत पुढील प्रकरणांत येईलच. थोरले बाजीराव यांनीं वसईचें राजकारण अन्ताजी रघुनाथ व गंगाजी नाईक यांजवर सोंपविलें ही गोष्ट वासुदेवराव जोशी यास आवडत नव्हती. बाजीराव पेशवे व उमाबाई यांचें वैमनस्य होतें आणि अन्ताजी व गंगाजी यांनीं जर उमाबाईचें सहाय्य घेतलें तर अर्थात ही गोष्ट पेशव्यांस खपणार नाहीं व त्यामुळें त्यांचें मन अन्ताजी विरुद्ध आपोआपच कलुषित होईल या संधीचा फायदा वासुदेवराव जोशी यानें घेतला व अन्ताजीविरुद्ध पेशव्यांचें मन बिघडविण्याचें त्यानें कारस्थान कसें रचिलें हें पुढील प्रकरणांत स्पष्ट होईल.

# प्रकरण ४

## वसईच्या मोहिमेंतील अन्ताजीची कामगिरी

अन्ताजी रघुनाथ कावळे याच्या एकंदर कर्तबगारीची साग्र व संगतवार माहिती संकलीत केलेली आढळत नाहीं; परंतु खालीं लिहिलेल्या साधनांवरून त्याच्या चरित्रावर बराच प्रकाश पडतो. १ लें साधन काव्येतिहाससंग्रहांत कै. न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या सूचनेवरून कै. काशीनाथपंत साने यांनीं प्रसिद्ध केलेली साष्टीची बखर. २ पेशवे दप्तरांतील रा. ब. सरदेसाई यांनीं प्रसिद्ध केलेली वसई मोहिमेसंबंधींचीं निवडक पत्रें. ३ कै. नारायण विठ्ठल पुरंदरे-कृत उत्तरकोंकणांतील वृत्यंशी माध्यंदिन ब्राह्मणांचा इतिहास. ४ पोर्तुगीझ दप्तरांतून रा. पिसुर्लेकर यांनीं पोर्तुगीझ भाषेंत प्रसिद्ध केलेली माहिती.

अन्ताजी रघुनाथ कावळे यानें वसईच्या रणसंग्रामावर हातांत शस्त्र धरून मर्दुमकी गाजविल्याबद्दल कांहींच पुरावा उपलब्ध नाहीं, पण ठाणें शहरानजीक असलेल्या पारसिकच्या चकमकींत त्याचे शिपाई होते व त्या ठिकाणीं झालेल्या लढाईत त्याचे लोक ठार झाले. त्यांत महंमदू जेजालदार नांवाचा एक मातबर शिपाई होता असा उल्लेख केळकरकृत 'वसईची मोहीम' या पुस्तकांत पृ. ३१ वर केलेला आढळतो. •अन्ताजी वसई साष्टी प्रांताचा मूळचा रहिवासी असल्यामुळें त्या प्रांतांतील सर्व मर्मस्थलांची त्याला पूर्ण माहिती होती. युद्धाला प्रत्यक्ष तोंड लागल्यानंतर रणांगणावर लढणाऱ्या आपल्या सैन्याला शत्रूचीं मर्मस्थानें दाखविणें, शत्रूच्या गुप्त हालचालींवर लक्ष ठेवणें, गुप्त वाटा व माऱ्याचीं ठिकाणें दाखविणें, शत्रुपक्षांतील लोकांना वश करून आपल्या पक्षांत

ओढणें, सैनिक जमविणें व प्रसंगोपात पेशव्यांकडून पैशाची मदत वेळेवर न आल्यास स्वतःच्या हिंमतीवर कर्ज घेऊन सैनिकांना वेतन देणें इत्यादि अनेक महत्त्वाच्या गोष्टी अन्ताजी कावळे करीत होता, असें उपलब्ध असलेल्या माहितीवरून दिसून येतें.

वांद्रें हें ठिकाण वसई व ठाणें यांच्या मध्यावर असल्यामुळें पोर्तुगीझ लोकांनीं तेथें मजबूत किल्ला वांधला होता. इ. स. १७३७ मध्यें वांद्र्यास मराठ्यांनीं वेढा दिला त्या वेळीं ठाण्याचा गव्हर्नर लुइ बतेलो यानें मुंबईस जाऊन इंग्रजांशीं मसलत करून त्यांच्याकडून माणसांची व दारूगोळ्यांची मदत मिळविली. या वेढ्यांत खंडोजी माणकर,मुरारजी अंजूरकर व अन्ताजीपंत कावळे यांनीं प्रत्यक्ष भाग घेतला होता. पोर्तुगीझ व इंग्रज यांच्या माऱ्यापुढें मराठ्यांचा ठिकाव न लागल्यामुळें त्यांस हा वेढा उठविणें भाग पडलें. पेशवे दप्तर १६ The Bassein Campaign यांत पृ. ४६ वर अन्ताजीपंताचें ता. २२-४-१७३७ चें पेशव्यास लिहिलेलें पत्र प्रसिद्ध झालें आहे; त्यांत अन्ताजी म्हणतो:- 'आज्ञेप्रमाणें सेभर वोझे गवत झावळ्या घेऊन वानरयास आलो. रा॥ सूर्याजी नाईक नाखते व आमची दोन मानसे देऊन नेमल्या जाग्यास पाठविले, तंव तेथें बुधवारीं रात्रउं ताडाचा मेढा (मेढा म्हणजे तट) घातला' याच पत्रांत अन्ताजीनें फिरंग्यांनीं केलेल्या बंदोबस्ताची माहिती देऊन मराठ्यांनीं निकरानें लढाई करावी अशी सूचना केली आहे.

पोर्तुगीझ लोकांनीं ठाणें येथील किल्ल्याची मजबूत तटबंदी करून तो बळकट केला होता. या किल्ल्यावर मारा करून तो हस्तगत करण्याचें मराठ्यांनीं ठरविलें. त्या कामीं ज्या वाटाघाटी झाल्या; त्यांत अन्ताजीपंत यानें प्रामुख्यानें भाग घेतला होता. अन्ताजीची या वेळची मसलत बुवाजी नाईक खेरीज इतर सर्वांना पसंत पडली. या बाबतींत जीं पत्रें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांवरून कळव्याच्या पाटलानें

बेइमानी करून मराठ्यांच्या छाप्याची बातमी ठाण्याच्या फिरंगी किल्लेदारास आगाऊ दिली. त्यामुळें ठाण्याचा किल्ला मराठ्यांना ताबडतोब सर करतां आला नाहीं. परंतु पुढें ता. १७-३-३७ रोजीं मराठ्यांनीं निकराचा हल्ला करून तो सर केला.

वसईच्या किल्ल्याला अचूक शह देण्याकरितां अर्नाळा येथें नवीन माऱ्याचें ठिकाण निर्माण करण्याचें मराठ्यांनीं योजिलें व त्या ठिकाणीं एक मजबूत किल्ला बांधण्याचें त्यांनीं ठरविलें.अर्नाळा येथें किल्ला बांधला असतां त्याचा वसईच्या किल्ल्यावर आक्रमण करावयास फार उपयोग होईल,याबद्दल झालेल्या वाटाघाटीच्या वेळीं अन्ताजीनें भाग घेतला होता. अर्नाळा किल्ला थोड्या वेळांत बांधला व वसईच्या रणसंग्रामाचें तो किल्ला एक केंद्र बनलें. पोर्तुगीझ लोकांची सत्ता नष्ट करण्याचें कामीं मराठे सरदारांच्या गुप्त वाटाघाटी अर्नाळ्याच्या किल्ल्यांत होत. त्यावेळीं खुद्द बाजीराव व चिमणाजी आप्पा हजर असत. वसईच्या मोहिमेच्या बाबतींत पेशवे सरकारनें फार दिरंगाई केली व त्यामुळें फिरंग्यास धर्मच्छलाच्या कामीं अधिक प्रोत्साहन मिळालें, या गोष्टीची त्या प्रांतांतील लोकांनां फार चीड आली.याचें चित्र सदरील वाटाघाटीचेवेळीं अन्ताजी रघुनाथ कावळे यानें निर्भीडपणें रेखाटलें. आणि लोकांचा चित्तक्षोभ पेशव्यांच्या निदर्शनाला आणून दिला. अन्ताजी कावळे यानें जहाल शब्दांत लोकांची बाजू मांडली याचें कारण त्याचा स्वभावच तसा असल्याबद्दल त्याचा बोलबाला होता; पण असें असलें तरी त्याच्या भाषणांतील मर्म पेशव्यांनीं ओळखून वसईच्या मोहिमेचें कार्य ताबडतोब हातीं घेण्याचें ठरविलें.

पेशवे दप्तरांत प्रसिद्ध झालेल्या पत्रांवरून असें दिसतें कीं, भिवंडीपासून दोन मैलांवर कांबे या ठिकाणीं फिरंग्यांचें मजबूत ठाणें होतें. त्यावर मराठ्यांनीं हल्ला केला, या लढाईंत अंताजी व गंगाजी नाईक यांनीं चांगला पुढाकार घेतला होता. (सन १७३०) कांबे येथील

लढाईंत मराठ्यांनीं पोर्तुगीझांचा एवढा पराभव केला कीं, बहुतेक साष्टी प्रांत---वसईसुद्धां याच वेळीं मराठ्यांच्या कबज्यांत जाणार, तों पोर्तुगीझांनीं इंग्रजांचे आर्जव करून त्यांचें सहाय्य मागितलें. त्यांनीं ७०० सैनिक मराठ्यांवर पाठवून पोर्तुगीझांचा बचाव केला. तेव्हां कृष्णराव महादेव व अंताजी रघुनाथ यांनीं पोर्तुगीझांकडे तहाचें बोलणें करून युद्ध थांबविलें (वसईचा दिग्विजय पृ. ३४४)

वसईच्या किल्ल्याला वेढा दिल्यावर पोर्तुगीझ लोकांना जंजिरेकर व इंग्रज लोक यांजकडून गुप्त रीतीनें मदत मिळूं नये म्हणून चिमणाजी-आप्पांनीं फार खबरदारी घेतली. हिंदु लोकांपैकीं शत्रूला फितुर झालेल्या लोकांवर व मुंबई येथील इंग्रज सरकारच्या मदतीनें फिरंग्यांस मदत करणाऱ्या लोकांवर करडी नजर ठेवणें आवश्यक होतें; आणि असें महत्त्वाचें काम तशाच विश्वासु माणसा खेरीज इतरांवर सोंपविणें शक्य नव्हतें. हें महत्त्वाचें काम अन्ताजी रघुनाथ कावळे यांजकडे सोंपविलें व ते त्यानें इतकें चोख रीतीनें बजाविलें कीं, त्यामुळें फिरंगी लोकांना रशीद मिळण्याचें बंद पडून त्यांची उपासमार होऊं लागली व पुढें त्यांना तहाचें बोलणें करावें लागलें.

खंडोजी माणकर यानें अन्ताजी रघुनाथ याच्या कामगिरीबद्दल छ २ रबिलाखर श्रीमंत बाजीराव पेशवे यांस पत्र लिहिलें आहे, त्यांत तो म्हणतो ‘ ठाणें काबीज करण्याचें कामी माझी नेमणूक झाली होती त्या प्रसंगीं अन्ताजी रघुनाथ कावळे, अंजूरकर व उतेकर यांनीं अतोनात मेहनत घेतली. अन्ताजी रघुनाथ याचा मनसबा कोणी मनावर घेत नसल्यामुळें ते श्रमी होउन घरीं बसले आहेत. त्यांचे तोंड अफाट असल्यामुळें दरबारांत त्यांचे पदरीं खटाई पडलीं आहे. स्वामीच्या पुण्यप्रतापे फिरंगण नष्ट होऊन आपलें वतन सुटावें एवढीच त्यांची इच्छा आहे. चिमणाजीआप्पा याप्रमाणें त्यांजकडून काम---काज करून घेत जाणें.’

नारायण जोशी यानें चेवूलाहून श्रीमंत बाजीराव पेशवे यांस पत्र लिहिलें आहे त्यांत अन्ताजीविषयीं तो म्हणतो 'फिरंगी सल्ला करीत नाहीं व करील अशी आशा नाहीं. सबब अन्ताजी रघुनाथ यांस व अंजूरकर यांस त्यांचे लोक जमा करण्यास सांगितले आहे. अंजूर-कराचे कर्जदारांना अंजूरकरांस उपद्रव देऊं नये अशी ताकीद केली आहे.' या पत्रारून अन्ताजीकडे सैन्याची जमवाजमव करण्याचें काम सोंपविण्यांत आलें होतें ही गोष्ट सिद्ध होते.

पोर्तुगीझ सरकारला नामोहरम करण्याच्या निरनिराळ्या योजना तयार करून थोरले बाजीराव यांच्यापुढें ठेवण्याचें कार्य अन्ताजी रघुनाथ कावळे करीत होता. खडें सैन्य सज्ज ठेवण्याकरितां द्रव्यबलाचीं फार जरूर आहे वगैरे गोष्टी पेशवे सरकारांस त्यानें लिहून कळविल्या आहेत. वेतनाच्या अभावीं सैनिक सोडून जातात व फिरंग्यांकडून द्रव्याची लालुच मिळतांच फितुर होतात अशी त्याची नेहमी तक्रार असे. या गोष्टी अन्ताजी पत्रानें अगर लिंगोजी बाबूजी मेघशाम व दत्ताजी तुर्क यांच्यासारख्या विश्वासु माणसांमार्फत पेशवे सरकारांस कळवी. या पत्रांचा श्रीमंत बाजीराव पेशवे फार सहानुभूतीनें विचार करून अन्ताजीस द्रव्यबल व मनुष्यबल पुरविण्याचें आश्वासन देत. अन्ताजीनें थोरले बाजीरावास फिरग्यांच्या आरमाराच्या हालचालीची सविस्तर हकीकत दिली आहे त्यांत तो म्हणतो कीं, कोंकणच्या किनाऱ्यावर गोव्यापासून चेऊलापर्यंत फिरंग्यांचे आरमार पसरलें आहे. खुद्द साष्टी प्रांतांत भंडारी, कासार, पाचकळशे वगैरे हिंदुजातींपैकीं कांहीं लोक त्यांनीं हेर म्हणून ठेविले आहेत त्यांना मी फोडले असून ते श्रीमंतांची सेवा करण्यास तयार आहेत. दोन हजार लोक व पन्नास जेजाला आपल्या हातीं आल्यास आपले सैनिक सर्व साष्टी प्रांत व त्यांतील मजबूत किल्ले हस्तगत करण्याची ग्वाही देतील. परिशिष्ट

अ २ मध्यें अन्ताजीनें बाजीरावास कळविलें आहे कीं, " पिलाजी जाधवराव •वाघोलीस गेले त्या वेळीं सैनिकास रोज मजुरा मिळत नाहीं म्हणून नोकरी सोडून जाऊं लागले. श्रीमंत बाळाजीपंत आठ वले यांजबरोबर लौकरच शिपाई लोक हातघाईवर आले, त्यामुळें पावणे चवदाशें रुपये त्रिहोत्र्या व्याजानें काढून त्यांची गरज भागविली. सावकारास खतें लिहून दिलीं आहेत त्याबरोबर बाळाजी पंताच्या चिठ्ठया तारण म्हणून दिल्या आहेत. पिलाजी जाधवराव घाटावर गेल्यामुळें आम्हांस कृष्णराव याचे स्वाधीन केले आणि पुणें येथें आठ महिने·लढाऊ लोक व सरदार घेऊन राहिलो. बाळोजी करळा व गोविंद ब्राह्मण यांस पाठवून महत्त्वांचे मार्ग व खाडीच्या वाटा दाखविल्या स्वामींची खात्री करून दिली. आपण आपल्या शब्दांतून मोकळे झालों असें माझ्या मनानें घेतलें. वसईच्या किल्ल्याचा भेद घेतला आहे. शत्रूचे पुष्कळ लोक फोडले आहेत. आपल्या शिपायास श्रीमंतांनीं कांहीं गांवचे कौल देण्याचें आश्वासन दिलें होतें त्याप्रमाणें घडून आलें नाहीं. येथें दुष्काळ इतका पडला आहे कीं १ रुपयास चार पायली धान्य मिळते त्यामुळें लोक हवालदील झालें आहेत. श्रीमंतानीं प्रत्यक्ष येऊन अजमावून घ्यावें. आमचें दुर्दैव कीं, आम्हीं केलेल्या योग्य सूचना आमचें हितशत्रू हाणून पाडतात. झाडाचे मूळ तुटल्यावर फांद्यांचा काय उपयोग? आतां कोणी कर्ज देण्यास धजत नाहीं यामुळें मृत्यु येईल तर बरें असें वाटूं लागले आहे. पुरेशा पैशाचा पुरवठा झाल्याबरोबर वैशाख शु ॥ ११ ला आरंभ केल्यास एका रात्रींत साष्टींतील चार किल्ले व १५७ गांव हस्तगत करून देतों असें आमचे लोक म्हणत आहेत. तरी श्रीमंतांच्या कानावर ही गोष्ट घालावी. ही गोष्ट खोटी ठरल्यास आमचे पारिपत्य करावे. आमचे वैरी ही योजना हाणून पाडण्याचा प्रयत्न करतील त्याची सावधगिरी ठेवावी."

परिशिष्ट अ १ पत्रांक नं. ३ चिमणाजी आप्पा अन्ताजीस लिहितात 'तुमचे विषयीं कृष्णराव यांस लिहिलें आहे. तुमच्या खर्चाची बेगमी व गांवची सनद व हुजऱ्या तुमचेकडे पाठवून दिले जातील. तुम्हीं फिरंग्यांचे परम शत्रू आहां ही गोष्ट त्यांस असह्य. तरी फिरंग्यांचे सरहद्दीपासून चहूं पांच कोसावर राहावे. बेलापुरचा मजकूर लिहिला तेही राजकारण राखून ठेवावे ती ॥ आल्यानंतर त्याचा विचार करूं." परिशिष्ट अ पत्रांक नं. ३ मध्यें थोरले बाजीराव अंताजीस लिहितात कीं "कृष्णराव महादेव येतांच तुम्हाला गांव नेमून देऊं व लोकांची बेगमी करून देऊं. सखोजी आंग्रे यांजकडून वेठ बिगारीचा उपसर्ग होतो अशी तक्रार केली आहे. त्यावरून त्यास तसें न करण्याबद्दल ताकीद दिली आहे. चित्तीं समाधान ठेवावे. वरच्यावर वर्तमान कळवावे.' परिशिष्ट अ पत्रांकामध्यें थोरले बाजीराव अन्ताजीस लिहितात. 'तुम्ही पत्रांत साष्टींतील कोट वगैरे घेतो व अमित द्रव्यलाभ करून देतो वगैरे लिहिले. तुम्हीं साहस करून सिद्धता केली आहे. परंतु च्यारी गोष्टी एकदम हातीं घेता येत नाहीं. फकीरुद्दीन पाटेल व सैयद अली यांच्या सनदा पाठविल्या आहेत. याच पत्रांत श्रीमंत थोरले बाजीराव यांनीं अंताजी रघुनाथ व त्याचे बंधु रामचंद्र व गणेश यांच्या नांवानें ( शके १६५२ इ. स. १७३० ) सनद देऊन त्यांचे पुरातन वतन त्यांच्याकडे कायम केलें व त्यांस तीं सनद पाठवून दिली.' परिशिष्ट अ पत्रांक नं. १ मध्यें थोरले बाजीराव अन्ताजीस लिहितात ' लष्करांतील लोकांस रोजमुरा न मिळल्यामुळें ते नोकरी सोडून जात आहेत; तरी त्यांच्या निर्वाहाची बेगमी करण्याबद्दल कृष्णराव महादेव यांस लिहिलें आहे. तरी त्यांजकडे लोकांस पाठवावे.' परिशिष्ट पत्रांकमध्यें चिमणाजी आप्पा यांनीं अन्ताजीस लिहिलें आहे कीं, इंग्रज, शामल ( जंजिरेकर ) व पोर्तुगीझ एकत्र होऊन आपल्याविरुद्ध

झुंझतील व त्यामुळें आपणांस भारी जाईल' परिशिष्ट अ नं. ३ मध्यें वासुदेवराव जोशी हे थोरले बाजीराव यास लिहितात कीं ' आज्ञेप्रमाणें कल्याणास जाऊन अन्ताजीपंत व गंगाजी नाईक व भिकाजी नाईक या त्रिवर्गांची भेट घेऊन राजकारण करावे. त्याप्रमाणें दहीवली येथें भिकाजी नाईक भेटले. नेरळ येथें अन्ताजीपंत भेटले. गंगाजी नाईक कल्याणास होते. त्या सर्वांना भेटून मसलत केली पैकीं अन्ताजीपंत व भिकाजी नाईक यांस स्वामीकडे पाठविले आहे. गंगाजी नाईक यांस दो चौदा दिवसानी पाठवितो. '

वर लिहिलेल्या ऐतिहासिक विवेचनावरून वसईच्या मोहिमेंत अन्ताजी रघुनाथ कावळे यानें पेशव्यांस केवळ सल्ला--मसलत देण्याचें येवढेंच काम केलें नसून ठाणें येथील किल्ला, मराठ्यांनीं वांद्रे येथील किल्ल्यास दिलेला वेढा, कांबे येथील लढाई यांत प्रामुख्यानें भाग घेतला होता ही गोष्ट स्पष्टपणें दिसून येतें. वसई प्रांतांतून फिरंग्यांचें उच्चाटन कांबे येथील लढाईचें वेळीच इंग्रजांनीं ऐन वेळीं फिरंग्यांस मदत दिली नसती तर झालें असतें व त्याचें श्रेय अन्ताजी रघुनाथ व त्याचे सहकारी यांस लाभले असते. फिरंग्यांनीं पेशव्यां-बरोबर जो तात्पुरता तह केला, त्यावेळीं पेशव्यांनीं आपल्यातर्फे अन्ताजीची योजना केली होती ही गोष्ट त्याच्या मुत्सद्दीपणाची साक्ष देणारी आहे. सैनिक जमविणें, शत्रूच्या हालचालींवर लक्ष ठेवणें, सैनिकांस माऱ्याच्या व खुष्कीच्या वाटा दाखविणें, पेशव्यांकडून सैनिकांचा मुशाहिरा वेळेवर न आल्यास सैन्यांत बेदिली व त्यांची उपासमार होऊं नये म्हणून स्वतःच्या जबाबदारीवर कर्जाऊ रकमा घेऊन सैनिकांस वेतन देणें, शत्रूकडील पक्षांत भेद पाडून त्यांना वश करणें इत्यादि गोष्टी अन्ताजी रघुनाथ करीत होता याबद्दल पेशवे दप्तरांत भरपूर पुरावा सांपडतो. इतक्या गोष्टी स्पष्ट असतां वसईच्या

मोहिमेंत अन्ताजी रघुनाथास गौणत्व देण्याचा कांहीं लोकांनीं जो अश्लाघ्य प्रयत्न केला आहे तो ऐतिहासिक सत्याला धरून नाहीं हे उघड दिसून येईल.

वसई व साष्टी प्रांतांत फिरंग्यांनीं धर्मच्छलाचें जे अनन्वित प्रकार केले, त्यामुळें अन्ताजीस अतिशय दुःख होऊन आपल्या देशाला परधर्मी लोकांच्या सत्तेपासून मुक्त करण्याकरितां त्यानें किती अविश्रांत श्रम केले ही गोष्ट कोणीहि नाकबूल करणार नाहीं. अन्ताजीच्या ठिकाणचा जाज्वल्य धर्माभिमान, उत्कट देश-भक्ति व शत्रूला नामोहरम करण्याचें अतुल धैर्य या गोष्टींचा उल्लेख "गोमांतक" या नांवाच्या "महाराष्ट्रभाट" या टोपण नांवानें लिहिलेल्या पुस्तकांत पृ. ५०-५१ वर केलेला आहे. सदरील काव्य मार्मिक असल्यामुळें वाचकांच्या सोयीकरितां या ठिकाणीं उद्धृत केलें आहे.

कारस्थाना उभारी या अन्ताजीच नितांत कीं
देसाई जो स्वदेशाचा, धर्मांचा ध्वज आणखी,
जो हिंदूच्या स्वपक्षांचा सत्यपक्ष म्हणूनियां
अग्रणी होऊनी पाडी पाखंडार्थ म्हणूनियां,
हिंदू स्वधर्म कर्मातें निषिद्धुं रिपू जै निघे,
एक पंत वेद हा मी स्वधर्म करितोचि घे!!
स्वधर्म प्रेम हें ही तद्वीरताच ठरूनिया
महापराध जै धावें पुर्तुगीझ धरूं तया;
'यज्ञप्रिया! तुझी तीची हौस पूर्ण करावया
धर्मशासन यज्ञीं ये जाळितो तुलाचिया!'
गृह, वैभव वंशीया अधिकार पदांप्रती
तदीय लुटुनि नेतां धर्मशासक बोलती;

मायाबळें महाराष्ट्रीं खड्ग तो उपसोनिया
अन्ताजी कांपवी आजी अन्तकासमची तयां
त्या तत्सैन्यामधें आम्हीं तिघे गुप्तपणें तरी,
मागती अन्तुनीयाच्या सदा टेहळणीवरी.
कैवार भार्गव क्षेत्राचा जो भार्गव भक्त घे.
ब्रह्मेंद्र कोंकणीं ब्राह्मण्यांचा पक्ष धरूं निघे.
गोमांतकीं स्वधर्माचें धुरीणत्व तुम्हीं तसे
घ्याल हे हिंदूमात्राची आशा उत्कट विश्वसे ?

## प्रकरण ५

# अन्ताजी विरुद्ध कल्याणचा सुभेदार वासुदेवराव जोशी याचें कारस्थान

वसई व साष्टी प्रांतांतील यच्चयावत् हिंदु लोकांनां जुलमानें वाटविण्याचा फिरंगीं लोकांनीं दीर्घोद्योग चालविला होता. हिंदूंचे पुढारी पकडून, त्यांना हाणमार करून हिंदु रयतेला धर्मांतर करण्यास भाग पाडणें या गोष्टी फिरंगी ख्रिस्तीधर्माप्रमाणें आपलें पवित्र कर्तव्य आहे असें समजत असत. अन्ताजी रघुनाथ कावळे हा हिंदूंचा पुरोहित. शिवाय मालाडचें देशपांडेपण हा अधिकार त्याजकडे असल्यामुळें त्या प्रांतांतील लोकादरास तो पात्र होता.अशा वजनदार पुढाऱ्यास धर्मांतर करावयास भाग पाडलें म्हणजे बाकीचा हिंदुसमाज ख्रिस्ती बनण्यास वेळ लागणार नाहीं अशी फिरंग्यांची दृढ समजूत होती. पण फिरंग्यांचा हा डाव ओळखून त्यांचा प्रतिकार केल्यामुळें गोवें सरकारला घुस्सा येऊन त्यानें अन्ताजीचें वतन जप्त केलें. पण स्वधर्म प्राणापेक्षांहि प्रिय असणाऱ्या अन्ताजीस फिरंगी सरकारच्या या कृत्यामुळें अधिकच चीड आली. पोर्तुगीझ लोकांच्या छळास न जुमानतां देशाच्या व धर्माच्या संरक्षणाकरितां अन्ताजीनें निःस्वार्थ बुद्धीनें आपल्या छातीचा कोट केला. फिरंगीलोकांच्या जुलमापासून हिंदु लोकांस मुक्त करण्याची जबाबदारी मराठी राज्याकडे होती. यास्तव अन्ताजी रघुनाथ व त्याचे सहकारी मित्र अंजुरचे नाईक बन्धु यांनीं पेशव्यांकडे जाऊन वसई-साष्टी प्रांतांतील फिरंग्यांची पुंडाई व धर्मच्छलाचे प्रकार कळविले व फिरंगीलोकांचे उच्चाटन करण्याच्या कामीं सरकारला पाहिजे ती मदत देण्याचें आश्वासन दिलें.

हिंदुधर्मसंरक्षणाची कळकळ, स्वत:च्या देशाबद्दल जाज्वल्य अभिमान, निर्लोभ व नि:स्वार्थ बुद्धि, या गुणांमुळें अन्ताजी रघुनाथ व अंजूरचे गंगाजी नाईक यांजवर पेशव्यांनीं वसईच्या राजकारणाची जबाबदारी सोंपविली. ही गोष्ट करण्यांत पेशव्यांनीं फार मुत्सद्देगिरी दाखविली. पण त्या वेळीं कल्याणच्या सुभेदारीच्या जागेवर थोरले बाजीरावाचा नजीकचा आप्त वासुदेवराव जोशी हा होता. पेशव्यांनीं वासुदेवराव जोशास कळविलें कीं, वसईचें राजकारण अन्ताजी प्रभृति लोकांवर सोंपविले आहे व त्यास त्या कामीं तुम्हीं सहाय्य करावें. (प. अ २) कल्याणच्या सुभेदारीच्या हुद्दयावर असणाऱ्या वासुदेवराव जोश्यास पेशव्यांची ही आज्ञा मनांतून रुचली नाहीं. याचे कारण असें कीं, कल्याण, वसई व ठाणें हीं गावें जलमार्गानें जवळ आहेत आणि त्यामुळें वसईचें राजकारण लढविण्याचा खरा मान आपला अशी त्याच्या मनाची समजूत होती. अशा स्थितींत पेशवे यांनीं अन्ताजी रघुनाथ व गंगाजी नाईक यांना वसईच्या राजकारणाचें पुढारीपण दिलेलें त्यास नापसंत होते. अन्ताजी रघुनाथ व गंगाजी नाईक यांनीं या राजकारणाच्या कामीं केलेल्या सूचना बाजीराव व चिमणाजी आप्पा यांना पसंत पडून त्याप्रमाणें ते वागतात ही गोष्ट वासुदेवराव जोश्यास असह्य वाटूं लागली आणि त्यामुळें अन्ताजी व त्याचे अनुयायी यांना लागेल ती मदत देण्याविषयीं पेशव्यांकडून लिहून आलें तरी तो त्याकडे दुर्लक्ष करी. अन्ताजी द्रव्याची मदत व युद्धसामुग्री पुरविण्याबद्दल पेशव्यांस परभारें लिहितो ही गोष्ट वासुदेवराव जोश्यास खपली नाहीं. खंडोजी माणकर याच्यासारख्या कसलेल्या अम्मलदारानें अन्ताजीच्या उत्तम कामगिरीबद्दल पेशव्यांस लिहिलें, यामुळें वासुदेवराव जोशी याचा द्वेषाग्नि अधिकच भडकला, व अन्ताजीचा कांटा सरळ मार्गानें काढून टाकण्याचें कारस्थान निष्फल झालें हें पाहून त्यानें अन्ताजीविषयीं पेशव्यांचें मन कलुषित करण्यासाठीं नवीन कारस्थान

सुरू केलें. अन्ताजी रघुनाथ पेशव्यांकडील बातम्या फिरंग्यास गुप्त रीतीनें देऊन त्यांस मदत करितो असा आरोप त्याच्याविरुद्ध करून वासुदेवराव जोशी यानें त्याप्रमाणें पेशव्यांस पत्र लिहिलें व त्यांत अन्ताजीस मुंबईस न ठेवतां कल्याणास पाठवावें अगर अन्य रीतीनें त्याचा बंदोबस्त करावा असें सदरील पत्रांत सुचविलें आहे. ( परिशिष्ट 'ड' पहा ) वासुदेवराव जोशी यानें चिमणाजीआप्पास पत्र लिहून कळविलें कीं, 'अन्ताजीच्या हातून कांहीं एक व्हावयाचें नाहीं; उलट नाश होईल. या बाबतींत व्यंकाजीपंत खुलासा करतील आपण या आशयाचें पत्र बाजीराव प्रधानसाहेब यांजकडे पाठविलें आहे असें सदरील पत्रांत लिहिलें आहे.'

अन्ताजी रघुनाथ कावळे भीमाशंकर येथें यात्रेस गेला असतां त्यानें यात्रेकरूंस लुटलें व त्यांस बेजार केलें असा एक आरोप त्याचे विरुद्ध करून त्याप्रमाणें वासुदेवराव जोश्यानें पेशव्यांस पत्र लिहिलें' ही गोष्ट अन्ताजीस कळतांच त्यानें पेशव्यास सणसणित पत्र लिहून वासुदेवराव जोशी हा आपलेवर कुभांडें रचितो व कारस्थानें करितो याचें दिग्दर्शन केलें आहे; सदरील पत्र पुढें देण्यांत आलें आहे.

वसई व साष्टी प्रांतांतील हिंदूंस फिरंग्यांच्या धर्मच्छलांतून मुक्त करण्याकरितां पेशव्यांकडे अन्ताजीप्रभृति पुढारी सतत एक तप दाद मागत असतांहि कांहींना कांहीं सबबीवर पेशव्यांकडून योग्य ती मदत होत नाहीं त्यामुळें सर्व हिंदूरयतेंत असंतोष उत्पन्न झाला. धर्माचें संरक्षण करण्याच्या कामीं हिंदु राजाकडून अशी दिरंगाई व्हावी याबद्दल वसई व साष्टी प्रांतांतील हिंदूंना नवल वाटलें. सबब अन्ताजी व त्याचे सहकारी यांनीं आपला इष्ट हेतु कोणत्या रीतीनें साध्य करून घेतां येईल याबद्दल आपसांत मसलत केली. याच वेळीं तळेगांव येथें त्रिंबकराव दाभाडे याची पत्नी उमाबाई ही रहात होती. त्रिंबकराव दाभाडे यास डभोय येथें थोरल्या बाजीरावांनीं ठार मारल्याची हकीकत इतिहास

वाचकांस माहित असेलच. उमाबाई जात्या स्त्री असली, तरी मराठ्यांचे क्षात्रतेज तिच्या ठिकाणीं जाज्वल्य होतें. श्रीछत्रपति शिवाजी महाराज यांनीं मुसलमानांच्या धर्मच्छलास महाराष्ट्रांत व इतर प्रांतांत जसा कायमचा आळा घातला त्याप्रमाणें कोंकण प्रांतांतील फिरंग्यांच्या धर्मच्छलाचा व जुलुमाचा प्रतिकार करून त्यांचें राज्य कोंकण प्रांतांतून समूळ नष्ट करावें असें तिला नेहमीं वाटत असे. ही गोष्ट अन्ताजी व त्याचे सहकारी यांस पूर्णपणें माहित होती. सबब तिजकडे जाऊन तिच्या कानावर वसईचें राजकारण घालावें असा त्यांनीं विचार केला व त्याप्रमाणें अन्ताजी तळेगांव येथें जाऊन उमाबाई दाभाडे हिला भेटला व तिजबरोबर वसई-साष्टी प्रांतांतील राजकारणाबद्दल मसलत केली. उमाबाई दाभाडे हीजकडे अन्ताजी गेला तेव्हां त्या वेळच्या दरबारच्या वहिवाटीप्रमाणें तिनें त्याचा गौरव केला व त्यास देणगी म्हणून मोत्यांचा तुरा व कांहीं मौल्यवान वस्तु दिल्या. ही गोष्ट वासुदेवराव जोशी यास समजतांच अन्ताजीविषयीं बाजीरावाच्या मनांत द्वेष भरवून देण्यास ही संधि चांगली आहे असें त्याच्या मनानें ठरविलें.

थोरले बाजीराव व दाभाडे घराणें यांच्या दरम्यान डभोयच्या लढाईपासून फार वैमनस्य होते. जंजिरा काबीज करण्याकरितां इ. स. १७३३ मध्यें श्रीशाहू महाराजांनीं थोरल्या बाजीरावास आज्ञा केली त्यावेळीं उमाबाई दाभाडे व दामाजी गायकवाड या उभयतांना शाहू महाराजांनीं आपली फौज घेऊन बाजीरावास मदत करावी असा हुकूम केला होता, परंतु उमाबाई दाभाडे हिनें शाहूची आज्ञा मानली नाहीं यावरून उमाबाई व बाजीराव यांच्यांतील तेढ सहजच दृग्गोचर होते. उमाबाईनें अन्ताजीस मौल्यवान वस्तु देऊन त्याचा गौरव केला या गोष्टीचा फायदा घेऊन वासुदेवराव जोशी यानें बाजीरावास कळविलें कीं, अन्ताजी रघुनाथ कावळे यानें तळेगांवांस उमाबाई दाभाडे हिजकडे

जाऊन पेशव्यांविरुद्ध राजकारण केलें व तिजकडून कांहीं मौल्यवान वस्तु मिळविल्या. पण नंतर त्यानें त्या वस्तु सावकारांकडे गहाण ठेवून त्याजवर सुमारें दीड हजार रुपये कर्जाऊ घेतले. आपण युक्ति-प्रयुक्तीनें त्या जिनसा ताब्यांत घेऊन अन्ताजीच्या बेईमानपणाचा पुरावा म्हणून श्रीमंतांकडे पाठविल्या आहेत. वासुदेवराव जोशी यानें अन्ताजीविरुद्ध हा पुरावा कसा मिळविला याचें कोणासहि नवल वाटेल. याच पत्रांत पुढें वासुदेवराव जोशी कळवितो कीं 'अन्ता-जीच्या बेईमानपणाची खात्री झाल्यावर त्यास पुणे येथें बोलाऊन घेऊन कैद करावें व श्रीमंतांच्या नजरेआड त्याला कोठें जाऊं देऊं नये. श्रीमंतास त्यानें आणखी असें कळविलें आहे कीं, तो पेशव्यांस झुकांडीं देऊन मधल्या मध्यें तळेगांवास उमाबाईकडे जाईल म्हणून दहा पांच स्वार यांचेसमवेत त्यास बोर घाटांतून लोहगडच्या मार्गानें पुणें येथें न्यावें' (परिशिष्ट "ड" पहा)

वासुदेवराव जोश्याचें मन आपलेविषयीं कलुषित आहे व तो आपले कार्यांत नसतीं विघ्नें व अडचणी उत्पन्न करतो याची जाणीव अन्ताजीस पूर्ण होती. आपण केलेल्या योग्य सूचना वासुदेवराव जोशी विकृत करून पेशव्यास कळवितो या गोष्टीमुळें अंगीकृत कार्य करण्यास उत्साह राहत नाहीं, व कार्याचा नाश होतो यास्तव श्रीमंत पेशवे यांनीं वासुदेवराव जोश्याच्या सूचनेचा फार तारतम्यानें विचार करावा असें अन्ताजीनें पेशव्यास वेळोवेळीं कळविलें आहे. पेशवे सरकारास आमच्या निःस्वार्थ देशसेवेबद्दल जोशी याच्या सांगण्यावरून संशय येत असल्यास आम्हांस घरीं स्वस्थ बसण्यास सांगावें असे निर्वाणीचे व निराशेचे उद्गार अन्ताजीनें काढलेले आढळतात. वासुदेवराव जोशी यानें अन्ताजीसंबंधीं पेशव्यांस वर जी सूचना केली आहे, त्याप्रमाणें त्यांनीं अन्ताजीकडून काय खुलासा मागविला व अखेरचा निर्णय काय दिला हें समजण्यास मार्ग नाहीं. परंतु या प्रकरणानंतर अन्ताजी

पुणें येथून रणक्षेत्राच्या जागीं पुन्हां आल्याचें दिसून येत नाहीं. त्यावरून वासुदेवराव जोश्याचें कारस्थान फलद्रूप झालें असावें असें वाटतें. आणि त्यामुळें निःस्वार्थ बुद्धीनें आपलें शिर हातावर घेऊन लढणारा, हिंदु धर्माच्या संरक्षणार्थ सर्वस्वाचा त्याग करणारा पेशवे सरकारचा एकनिष्ट सेवक, शत्रूचें कारस्थान ओळखून त्यास अचूक शह देण्याची बुद्धिमत्ता असणारा अन्ताजीसारखा चाणाक्ष मुत्सद्दी दृष्टीआड झाल्याचें पाहून त्या वेळच्या हिंदु लोकांचें मन निश्चित शोकाकुल झाले असलें पाहिजे.

भीमाशंकर येथील यात्रेकरूंस लुटल्याचा आरोप वासुदेवराव जोशी यानें अन्ताजीवर केला होता, त्याबद्दल अन्ताजीनें खालीं लिहिल्याप्रमाणें खुलासा केलेला आहे. " आमची एक बहीण नूतन क्षौरास भीमाशंकर येथें माघ वद्य ७ मी चे दिवशीं आमचे समवेत गेली असतां तेथें आम्ही यात्रेकरूस लुटलें असा अमाच्यावर आमचा एक द्वेष्टा देवभट फिरंगाणकर व त्याचा भाऊ यांस उभे करून केला आहे. यात्रेस लक्षावधी लोक हजर असतांना व तेथें कमाविसदार व जमिनदार व संभावित लोक यांपैकीं कोणीहि या कामीं आमच्यावर आरोप करण्यास पुढें आणला नाहीं व जोशी यांनें आमचेंविषयीं त्याचें मनांत असलेल्या द्वेषाचे प्रदर्शन केलें आहे. श्रीमंतानीं या बाबतींत बारकाईनें चौकशी करून आमचा अपराध असल्यास आमचा शिरच्छेद करावा. आम्हीं फिरंगाणचे राजकारणांत अतोनात श्रम घेतले व संसाराचा नाश केला त्याचे बक्षिस म्हणजे आमचा दरबारांत अपमान करून आमची अब्रू घेतली " या पत्रांत अन्ताजीनें ज्या शपथा घेतल्या आहेत, त्यावरून जोशी यानें केलेला आरोप साफ खोटा आहे असें कोणासहि दिसून येईल.

पेशवे दप्तर व्हाल्युम १६ पत्रांक नं. १४१० मध्यें अन्ताजी रघुनाथानें केशवजी लिंगाजीबरोबर श्रीमंत बाजीराव पेशवे यांस कळविलें

आहे कीं, मी येथील सैनिकांच्या मदतीनें साष्टी प्रांतांतील वेसावे, वांद्रें, महाले आणि तुरंभे असे चार मोठे किल्ले हस्तगत करून लाखों रुपये सरकारास देववितो. त्या कामीं सैनिकास लागणारा पैसा पाठवावा. ही गोष्ट खोटी आहे असे आमचे द्वेष्टे आपणांस कळवितील; परंतु आपण आपलीं विश्वासु माणसें येथें पाठवून या गोष्टीची खातरजमा करून घ्यावी. ही गोष्ट कल्याणचा सुभेदार ( वासुदेवराव जोशी ) यांस कळवूं देऊं नये. आमचे म्हणणें चौकशीअंतीं खोटें ठरल्यास आमची जिव्हा तोडावी, व आमचा शिरच्छेद करावा. आम्हीं इतके परिश्रम करीत असतां आमच्या हितशत्रूंनीं त्यावर विरजण घालावें. त्यापेक्षां आम्हीं घरीं स्वस्थ बसून रहावें तें बरें. याउपर आम्हास आमचा उपहास व अपमान सहन होत नाहीं. ''

अन्ताजी रघुनाथ कावळे याचेबरोबर कल्याणचे सुभेदार वासुदेवराव जोशी याचे वैमनस्य होते. अन्ताजीनें फिरंग्यांच्या धर्मच्छलाला प्रतिकार करून वसई व साष्टी प्रांतांत हिंदूचें संघटन केलें व फिरंग्यांची सत्ता नष्ट करण्याच्या कामीं लागेल ती मदत पेशव्यांस केली आणि त्यामुळेंच वसई व साष्टी प्रांताचें राजकारण अन्ताजीवर सोंपविलें होतें. परंतु अशा चाणाक्ष मुत्सद्दयाचा उत्कर्ष सहन न झाल्यामुळें वासुदेवराव जोशी यानें त्याच्यासंबंधीं निराधार कारस्थाने रचून बाजीरावाचें मन अन्ताजीविषयीं कलुषित केलें. उमाबाई दाभाडे हीच्याबरोबर अन्ताजी पेशव्यांविरुद्ध कारस्थान करितो, वसईच्या प्रकरणांत तो फिरंग्यांना फितुर आहे अशा प्रकारचें घाणेरडे आरोप करण्यास बासुदेवराव जोशी चुकला नाहीं. चिमणाजी आप्पानीं सर्व मराठी सैन्य वसई येथें आणून फिरंग्यांना वसईच्या किल्ल्यांत रशीद मिळण्याचें बंद केलें व वसईचा किल्ला हस्तगत करण्याकरितां निकराचें युद्ध केलें. पण या रणक्षेत्रावर अन्ताजीच्या नांवाचा उल्लेख केलेला दिसत नाहीं किंवा फिरग्यांबरोबर झालेल्या तहाच्या वेळींहि अन्ताजीचा

उल्लेख आढळून येत नाहीं. यावरून अन्ताजी रघुनाथ वसईच्या अखेरच्या लढाईच्या वेळीं साष्टींत अगर वसई प्रांतांत नसावा असें अनुमान केल्यास तें चुकीचें होणार नाहीं. राष्ट्राच्या उन्नतीपेक्षां अगर बहुजन समाजाच्या कल्याणापेक्षां वैयक्तिक राग-द्वेषाला प्राधान्य दिल्याचीं उदाहरणें फार प्राचीन कालापासून हिंदुस्थानांत पहावयास सांपडतात. पृथ्वीराज व जयचन्द यांनीं आपला वैयक्तिक हट्ट पुरविण्यासाठीं परधर्मी लोकांचा शिरकाव हिंदुस्थानांत झाला. एका हिंदु राजानें दुसऱ्या हिंदु राजाचा पाडाव करण्याकरितां देशाबाहेरील लोकांची मदत घेतल्याचे दाखले इतिहासांत पहावयास सांपडतात. जंजिऱ्याच्या मोहिमेंत थोरले बाजीराव व पंत प्रतिनिधि यांच्या अन्तःस्थ कलहामुळें जंजिरा हस्तगत होण्याच्या ऐनवेळीं कसा बोजवारा उडाला ही गोष्ट सदरील मोहिमेचा इतिहास वाचणारांस माहीत आहेच. कल्याणच्या सुभेदारास वसईच्या राजकारणाचें श्रेय अन्ताजीसारख्या पुढाऱ्यास मिळूं द्यावयाचें नव्हतें तर तो मान स्वतः मिळवावयाचा होता. या व्यक्तिद्वेषामुळें अन्ताजीविषयीं पेशव्यांचें मन कलुषित करून आपल्या मार्गांतील अडचण वासुदेवराव जोशी यानें दूर केली. पेशवे सरकारनेंहि अन्ताजीबद्दल जें मौन स्वीकारलें, त्यावरून वासुदेवराव जोश्याच्या कारस्थानास ते बळी पडले असें दिसतें.

---

## प्रकरण ६

# श्रीब्रह्मेंद्रस्वामी आणि वसईची मोहीम

ईसवी सनाच्या १७ व्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रांत दोन थोर विभूति निर्माण झाल्या. १ ली श्रीसमर्थ रामदास स्वामी व २ री श्रीब्रह्मेंद्रस्वामी. श्रीछत्रपति शिवाजी महाराजांच्या अवतारकार्याच्या वेळीं या दोन विभूति अवतीर्ण व्हाव्या व त्यांचा हिंदुपद पादशाही स्थापन करण्याच्या कामीं उपयोग व्हावा हा योगायोग ईश्वरी संकेतानेंच आला असावा असें कोणासहि वाटल्यावांचून राहणार नाहीं. श्रीसमर्थ रामदास स्वामी यांनीं बहुजन समाजाला सन्मार्गाकडे प्रवृत्त करण्यासाठीं दासबोधासारखे ग्रंथ लिहिले. लोक जागृति करून त्यांच्यांत स्वत्त्वाची जाणीव उत्पन्न केली. यामुळें श्रीछत्रपतींच्या कार्यास एक प्रकारें सहाय्य होऊन देशाला स्वतंत्रता व स्वराज्योपभोग घेतां आला. श्रीब्रह्मेंद्रस्वामी यांनीं श्रीसमर्थस्वामींप्रमाणें ग्रंथरचना केलेली नाहीं. पण देशाला स्वतंत्रता मिळावी असें त्याचें ध्येय होतें व त्या कामीं त्यांनीं श्रीशाहूमहाराज व थोरले बाजीराव पेशवे यांस मराठी राज्याचा विस्तार करण्याच्या कामीं तनु-मन-धनानें मदत केली. वसईच्या मोहिमेची मुहूर्तमेढ रोंवणारे अन्ताजी रघुनाथ कावळे व त्याचे सहकारी गंगाजी नाईक प्रभृति यांचा पेशव्यांबरोबर संबंध येऊन अखेर त्याचा शेवट कशा रीतीनें झाला हें मागील हकीकतीवरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. पेशवे व ब्रह्मेंद्रस्वामी यांचा निकट संबंध होता, तरी पण ब्रह्मेंद्रस्वामींनीं वसई—साष्टी प्रांतांतील फिरंग्यांच्या धर्मच्छलाला प्रतिकार केल्याबद्दल कोठें उल्लेख केलेला आढळत नाहीं. वसईच्या रणसंग्रामाशीं स्वामींचा संबंध साक्षात् आला नव्हता तरी थोरले बाजी-

राव व चिमणाजी आप्पा या बन्धुद्वयांस वसईचें राजकारण यशस्वी होईल असा प्रोत्साहनपर त्यांनीं आशीर्वाद दिला होता. शिवाय मराठी राज्याच्या विस्ताराला त्यांनीं फार मोठी मदत केली, यास्तव त्यांचा परिचय या ठिकाणीं वाचकांस करून देणें अप्रस्तुत होणार नाहीं.

श्रीब्रह्मेंद्रस्वामी यांचा जन्म वऱ्हाड प्रांतामध्यें श्रीगणपतीचे राजुरीनजीक दुधेवाडी येथें झाला. त्यांचे आई–बाप बालपणींच निर्वतले तेव्हांपासून त्यांचे लक्ष अध्यात्म विषयाकडे वेधलें होतें. काशी येथें त्यांचें वास्तव्य असतां श्रीज्ञानेंद्र सरस्वती नांवाच्या महा-तपोनिधींची भेट होऊन त्यांनीं त्यांचा अनुग्रह घेतला व चतुर्थाश्रम स्वीकारून त्यांजकडून आध्यात्मज्ञान संपादन केलें; आणि त्यांस तेव्हां ब्रह्मेंद्रस्वामी हें नांव प्राप्त झालें. स्वामी नंतर तीर्थाटन करीत दक्षिणेंत आले व कोंकणांत चिपळुणाजवळ पेढे गांवीं श्रीपरशुरामाचें देवस्थान आहे तेथें त्यांनीं वास्तव्य केलें. पण कांहीं कालानंतर तेथील वातावरण स्वामीस अनुकूल न वाटल्यामुळें त्यांनीं साताऱ्यांत धावडशी येथें आपली गादी स्थापिली. सात्त्विक स्वभाव, परोपकार करण्याची वृत्ति, स्वराज्यलालसा इत्यादि गुणांमुळें स्मामींची कीर्ति श्रीशाहूमहाराजांच्या कानावर गेली. स्वामींच्या अलौकिक गुणांमुळें शाहू घराण्यांतील सर्वच मंडळी स्वामींच्या भजनीं लागली. थोरले बाजीराव व चिमणाजी आप्पा यांचा स्वामींबरोबर कांहीं दिवसांनीं निकट संबंध आला व स्वामींच्या अलौकिकपणाची पेशवे बन्धूंस खात्री पटून तेहि स्वामींच्या आज्ञेनुसार वागूं लागले. अशा रीतीनें पेशवे घराणें व शाहू घराणें यांचा संबंध जुळून आल्यामुळें स्वामींची कीर्ति सर्व ठिकाणीं पसरली. श्रीशाहूमहाराज व बाजीराव पेशवे स्वामींची सल्ला-मसलत व आशीर्वाद राजकारणांत घेत.मराठी राज्याचा उत्तरोत्तर उत्कर्ष व्हावा अशी ब्रह्मेंद्रस्वामींची इच्छा होती. इ. स. १७२८ पासून १७४५ पर्यंत उत्तर हिंदुस्थानांत जीं राजकारणें घडून आलीं, त्यांत स्वामींचें अप्रत्यक्ष रीतीनें अंग होतें असें उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक माहितीवरून दिसून येतें.

ब्रह्मेंद्रस्वामी उदार स्वभावाचे, निःस्वार्थी व परोपकारी असल्यामुळें त्यांनीं लोकोपयोगी कार्यांत आपल्या संपत्तीचा व्यय केला. "ब्रह्मेंद्र स्वामींची वार्षिक प्राप्ति सुमारें सोळा हजारांची असून शिवाय उत्सवप्रसंगीं पुष्कळ पैसा व सामान जमा होई. देवालयाचा व संस्थानचा थाट त्यावेळीं अपूर्व होता. मंदिरें, विहिरी, तलाव, घाट, पूल व सडका वगैरे बांधण्यांत स्वामींनीं पुष्कळ पैसा खर्च केला. यवतजवळ भुलेश्वराच्या डोंगरावर भुलेश्वर नांवाचें भव्य मंदिर त्यांनीं बांधिलें अशा कामीं स्वामींचा खर्च नऊ-दहा लाख झालेला आहे ( पहा मराठी रियासत पृ. २४४ )" लोकोपयोगी कार्यांत स्वामींनीं हा जसा व्यय केला तदनुरूप आपल्या संपत्तीचा उपयोग श्रीशाहू व थोरले बाजीराव पेशवे यांना कर्जाऊ रकमा देण्याकडेहि त्यांनीं केला होता. उत्तर हिंदुस्थानांत वारंवार स्वाऱ्या करण्याकरितां पैशाची जरूर लागे त्यामुळें पेशव्यांस फार कर्ज होई. कर्ज बेसुमार झाल्यामुळें व ते फेडण्याचें साधन नसल्यामुळें बाजीरावास आत्महत्त्या करून घ्यावी असें वारंवार वाटे व त्याप्रमाणें त्यांनीं आपला मनोदय स्वामींनां कळविला. स्वामींनीं असा अविचार न करण्याबद्दल बाजीरावास हितोपदेश करून त्यांची काळजी दूर करण्यांकरितां बरीच रक्कम कर्जाऊ दिली. पेशव्यांना ब्रह्मेंद्रस्वामींनीं पैशांची मदत जर वेळोवेळीं केली नसती, तर त्यांच्याकडून मोठमोठीं धडाडीचीं राजकारणें झालीं नसतीं असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं.

वसई व साष्टी प्रांतांतील हिंदुप्रजेवर फिरंगी लोकांनीं जें आक्रमण चालविलें होतें त्याचा प्रतिकार करण्यास योग्य तें द्रव्यबल व मनुष्यबल पेशव्यांपाशीं नव्हतें, त्यामुळें चिमणाजीआप्पांस वसईचें राजकारण हातीं घेणें शक्य झालें नाहीं; पण या चालढकलीमुळें फिरंगी मात्र अतिशय प्रबल होऊं लागले; यास्तव त्यांस वसईहून हुसकून लावलेंच पाहिजे असा विचार चिमणाजीआप्पा यांच्या मनांत येऊन त्या कामीं

स्वामींचा सल्ला व आशीर्वाद घेण्याचें त्यांनीं ठरविलें व त्याप्रमाणें स्वामींनीं सर्व हकिकत ऐकून घेतली व किंचित् ध्यानमग्न होऊन 'वसई दिली, दिली, दिली' असें त्रिवार म्हटलें. स्वामींच्या आशीर्वचनानुरूप आपण वसई जिंकणार असा आत्मविश्वास पेशव्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाला, व त्याप्रमाणें त्यांनीं सर्व मराठे सैन्याची जमवाजमव करून वसई लढविली व त्यांत त्यांना यश आलें. अन्ताजी रघुनाथ कावळे व त्याचे सहकारी गंगाजी नाईक यांच्या अविश्रांत श्रमामुळें, पेशव्यांना लावलेल्या तगाद्यामुळें व अखेर स्वामींच्या आशीर्वादामुळें पेशव्यांनीं वसईचें राजकारण जिंकलें.

मराठयांच्या इतिहासांत वसई व जंजिरा हीं दोन प्रकरणें फार महत्त्वाचीं आहेत. अन्ताजी रघुनाथ कावळे व त्याचे सहकारी यांचीं वतनें फिरंग्यांनीं जप्त केलीं व वसई-साष्टी प्रांतांत हिंदूंचा छळ केला त्यामुळें अन्ताजी रघुनाथ व गंगाजी नाईक यांनीं पुढाकार घेऊन फिरंगी सत्ता नष्ट करण्यास पेशव्यांना तगादा लावला. त्याचप्रमाणें जंजिरा येथील हबश्यांचीं सत्ता नष्ट करण्याचें कार्य शाहू व पेशवे यांनीं जें हातीं घेतलें, त्याला ब्रह्मेंद्रस्वामीचें 'हत्ती प्रकरण' निमित्त झालें. त्याचा थोडक्यांत सारांश असा:— 'दामोळ खाडीजवळ अंजनवेल येथील हबशांचा अधिकारी सीदीसात होता, त्यास कर्नाटकांतील सावनूरच्या नबाबाकडून एक हत्ती बक्षिस मिळाला; तो अंजीनवेलीस सुरक्षित आणण्याचें काम फार कठीण होतें ही कामगिरी सीदीसातानें ब्रह्मेंद्रस्वामींवर सोंपविली. त्या वेळीं देशांत निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या चौक्यांतून परवानगीवांचून जनावरें, फौजा-माल सोडण्यांत येत नसे. सीदीसाताचा हत्ती नेण्याबद्दल ब्रह्मेंद्रस्वामींस छत्रपति संभाजी व प्रतिनिधी यांचीं दस्तकें मिळालीं होतीं. त्यामुळें विशाळगडच्या घाटांतून हत्ती सुटला; पण संगमेश्वराच्या पुढें माखजनच्या चौकीवर आंगऱ्यांच्या लोकांनीं हत्तीला अटकाव करून तो जयगडास पाठविला. कान्होजी आंगरे

स्वामींचा शिष्य होता, त्यामुळें आपणांस अटकाव होईल अशी स्वामींस कल्पना नव्हती; त्यामुळें त्यांनीं आंगऱ्यांचें दस्तक घेतलें नव्हतें. आंगऱ्याच्या लोकांनीं आपला हत्ती नेल्याची बातमी सीदीसातास लागतांच तो खवळला व अंजनवेलीहून आपली फौज तेथें रवाना केली, पण या फौजेस आंगऱ्याच्या लोकांनीं हुसकून लाविलें. स्वामीस हा सगळा वृत्तांत समजतांच हत्ती सोडून देण्याबद्दल त्यांनीं आंगऱ्यांस लिहिलें व त्याप्रमाणें तो सोडूनहि देण्यांत आला. पण त्यापूर्वीं आपली फौज परत आलेली पाहून सीदीसातानें अविचारानें ब्रम्हेंद्रस्वामींच्या परशुराम येथील देवालयावर ( ता. ८ फेब्रूवारी १७२० ) हल्ला करून त्या पवित्र स्थानाचा विध्वंस केला. देवालयाची व ब्राह्मणांची संपत्ति लुटून नेली; या प्रकारामुळें ब्रह्मेंद्रस्वामींस फार क्रोध आला व " देव-ब्राह्मणांचा उच्छेद केलास अतःपर तुझाहि उच्छेद होईल " असा त्यांनीं सिदीस शाप दिला; या बाबतींत जंजिऱ्याच्या अधिकाऱ्यांनीं स्वामींची समजूत घालण्याचा फार प्रयत्न केला, दोन गांव इनाम देण्याचें आश्वासन दिलें पण ज्या राज्यांत हिंदुधर्माचा छल होतो, त्या राज्यांत वास्तव्य करण्याची आपली इच्छा नाहीं असा रोकडा जबाब देऊन स्वामीं साताऱ्यानजीक धावडशीस येऊन राहिले. आणि जंजिरा हस्तगत करण्यासाठीं शाहू व पेशवे यांना सारखा तगादा लाविला. " पेशवे हे ब्रह्मेंद्रस्वामींच्या आज्ञेबाहेर नव्हतेच. शाहूहि महाराजांचा भक्त असल्यामुळें त्यांनीं " देव-ब्राह्मणाचा छल होणें ही गोष्ट किती लज्जास्पद आहे " ही गोष्ट त्याच्या मनावर बिंबविली. आणि या सर्व बनावामुळें मराठे व पेशवे यांना जंजीऱ्याचें राजकारण हातीं घेऊन जंजिरा लढवावा लागला; प्रस्तुत मोहिमेचा इतिहास फार बोधप्रद आहे; पण या ठिकाणीं तो इतिहास सांगण्याचें कांहींच कारण नाहीं फक्त जंजिरा व वसई या दोनहि रणसंग्रमांचें कारण एकच व तें हिंदुधर्मच्छल हें होय एवढेंच दाखविण्याचा हेतु आहे.

# प्रकरण ७

# अन्ताजीचा अन्त

वसई व साष्टी प्रांतांत फिरंगी लोकांनीं हिंदुधर्मावर जें आक्रमण चालविलें होतें त्याला प्रतिकार करून त्यांचीं सत्ता नष्ट करण्याचें कार्य अन्ताजी रघुनाथ यानें केलें. त्यामुळें फिरंगी लोकांचीं अवकृपा होऊन त्याचें देशपांडेपणाचें वतन त्यांनीं जप्त केलें. अन्ताजीला आपलें वतन सुरक्षित ठेवावयाचें असतें, तर फिरंगी लोकांनां वश होऊन तें सहज साधलें असतें. पण याज्ञवल्क्यांच्या बाणेदारपणाची शिकवणूक अन्ताजीच्या रोमरोमांत भिनल्यामुळें स्वधर्माकरितां आपल्या सरदेशपांडेपण वतनाची यत्किंचित् पर्वा न करितां त्यानें फिरंग्यांचें उच्चाटन करण्याचा प्रयत्न फार कसोशीनें केला. वसई-साष्टी प्रांतांतील विस्कळीत झालेल्या हिंदु समाजाचें संघटन केलें. वसई व साष्टी प्रांतांत फिरंगी लोकांनीं हिंदुधर्मीयांचा चालविलेला छळ पेशव्यांच्या निदर्शनास आणून देऊन फिरंगी लोकांचें उच्चाटन करण्याचें कार्य हातीं घेण्याबद्दल अन्ताजीनें आग्रह धरिला. सैन्यभरती व इतर साधनसामग्रीची सिद्धता करून वसई प्रांत जिंकून देण्याची हमी अन्ताजीनें घेतली, तरी पण पेशवे इतर राजकारणांत गुंतल्यामुळें इतक्या तांतडीनें वसईवर हल्ला करण्याचें कार्य त्यांनीं हातीं न घेतां तेथील राजकारणाचीं सर्व सूत्रें अन्ताजीच्याच हातीं दिलीं. पण ही गोष्ट त्या वेळीं कल्याणच्या सुभेदारीच्या गादीवर असलेल्या वासुदेवराव जोश्याला न रुचून त्यानें अन्ताजीबरोबर उघड उघड वैर आरंभिलें.

वसई-साष्टी प्रांतांतील हिंदु लोक फिरंग्यांच्या धर्मच्छलास फार कंटाळलेले होते. आपले जीवित व शील सांभाळण्याकरितां आपलीं

घरेंदारें, जमीनजुमला यांचा त्याग करून कित्येक लोक इतर ठिकाणीं जाऊन राहिले होते. हिंदु लोकांवरील या अरिष्टाबद्दल अन्ताजीला फार वाईट वाटत होतें. आपत्तींना तोंड देऊन स्वाभिमानानें जिवंत रहावयाला जो सोशिकपणा लागतो तो वसई-साष्टी प्रांतांतील हिंदु लोकांत होता म्हणूनच सर्व आपत्तींना तोंड देऊन त्यांनीं आपल्या धर्माचें संरक्षण केलें, पण त्यालाहि मर्यादा होतींच. पेशव्यांना फिरंग्यांविरुद्ध वसईचें राजकारण हातीं घेण्यास फुरसद होत नाहीं व त्यामुळें वसई-साष्टी प्रांतांतील हिंदु लोकांचीं फार कुचंबणा होऊं लागली, अशा स्थितींत कांहीं तरी उपाय-योजना करण्याच्या दृष्टींनें अन्ताजी मराठ्यांकडील उमाबाई दाभाडे यांना भेटला. ही गोष्ट वासुदेवराव जोश्याला न आवडून अन्ताजीविरुद्ध त्यानें पेशव्यांस पत्र पाठविलें. वासुदेवराव जोश्यानें अन्ताजीला नामोहरम करण्याकरितां सरळ संभावितपणाचे मार्ग सोडून दुष्ट-अन्यायमूलक मार्ग स्वीकारून अन्ताजीला वसईच्या राजकारणांतून पेशव्यांमार्फत पण स्वतः सुचविलेल्या मार्गानें काढून लाविलें. वासुदेवराव जोश्यानें पेशव्यांना लिहिलेलें पत्र मागें येऊन गेलें आहे. त्यावरून अन्ताजीला पुणें येथें अगर अन्य ठिकाणीं पेशव्यांच्या नजरकैदेंत खितपत पडावें लागलें असावें असें अनुमान करावें लागतें. वसईच्या मोहिमेची पूर्व तयारी करणारांत अन्ताजीबरोबर त्याचें सहकारी गंगाजी नाईक व त्याचें बन्धु होते. या दोनहि देशभक्तांचीं वतनें जप्त झालेलीं होतीं. आणि तीं परत त्यांचेकडे देण्याचीं आश्वासनें पेशव्यांनीं दिलीं होतीं. पण पेशव्यांनीं तीं परत दिलीं नाहींत असें साष्टींची बखर पृ. ५१-५२ यांत म्हटलें आहे. ' मग चिमाजी आप्पानें मुलखाचा बंदोबस्त करून पुणीयास चालले; ते समई गंगाजी नाईकास सांगितलें कीं तुम्हीं पुणीयास चलावें तुम्हास बाजीरायापासून वतनाचे भोगवटयाची पत्रें देवितो हे सांगोन आपासाहेब पुणीयास गेले. मग शंकराजी केशव व गंगाजी नाईक पुणीयास गेले इतकीयांत बाजीराव

मुलूखगीरिस जावयासी निघाले भेटी जाल्या बाजिरावानें बहुत मान करून सांगितलें कीं तुमच्या वतनाच्या सनदा देण्याविशि आपास सांगितले आहे. नंतर आप्पानि गंगाजींस सांगितले कीं तुम्ही आपले मुलुखास चला आम्ही मागून येतो तुमची सर्वांची वतने चालति करितो हे सांगोन रवाना केलें. इतक्यांत तिकडे बाजिरावास देवआज्ञा झाली त्यामागे चिमाजी आपास देवआज्ञा झाली. मग बायाचा पुत्र बाळाजी ( बाजि ) बाजीराव यांशिं शाहूराजाहि प्रधानकी दिल्हि मग गंगाजी नाईक पुणियास गेले भेटी जाल्या च्यार महिने पुणियास राहिले बाळाजी बाजिराव वतनदारांची वतने परत देत नाहीं म्हणो लागले याचे कारण तुमच्या मुलकामुळें आम्हास कोट रुपये खर्च झाला. ''
या वरून गंगाजी नाईकाचें वतन पेशव्यांनीं परत दिलें नाहीं असें दिसतें. गंगाजीसारख्या पेशव्यांच्या मर्जीतल्या माणसाबद्दल जर पेशव्यांनीं असा अनुदारपणा दाखविला असेल, तर पेशव्यांच्या कैदेंत खितपत पडलेल्या अन्ताजी रघुनाथ कावळ्याबद्दल याहूनहि अधिक निर्घृणता त्यांनीं कशावरून दाखविली नसेल? वसईच्या मोहिमेंत पेशव्यांनां जें यश मिळालें, त्याचें खरें श्रेय, अन्ताजी रघुनाथ व गंगाजी नाईक व त्याचें बन्धु यांस दिलें पाहिजे; असा वास्तविक प्रकार असतां पेशवे सरकारनें अन्ताजीस कैदेंत डांबून ठेवावे हा त्याचा दैवदुर्विपाक नव्हे काय?

वसईची मोहीम संपल्यावर अन्ताजी रघुनाथ याचीं मुक्तता पेशव्यांच्या नजरकैदेंतून झाली किंवा नाहीं अगर त्याचा मृत्यु कैदेंत असतांच झाला, याबद्दल पुरावा उपलब्ध नाहीं. चिमणाजी आप्पा यांनीं वसई हस्तगत केल्यावर ब्रह्मेंद्रस्वामीं व थोरले बाजीराव पेशवे यांनां लिहिलेल्या पत्रांत त्याचेबद्दल उल्लेख नाहीं.

## प्रकरण ८

# गोव्यांतील Inquisition कोर्टाची त्रोटक माहिती

जीजस् ख्राइस्ट याच्या उदात्त शिकवणुकीवर उभारलेल्या धर्माचा उदय होऊन सुमारें १६०० वर्षें लोटल्यावर त्या धर्मांत मोठी क्रांति घडून आली. या अवधींत ख्रिस्त भिक्षूंनीं ख्रिस्तोपासकांवर आपलें वर्चस्व कायम रहावें म्हणून ख्रिस्ती धर्मांत त्या धर्माशीं प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष संबंध नसलेलें अनेक अनिष्ट आचार व प्रकार रूढ केले. धर्माविरुद्ध शब्द काढल्यास मोक्षप्राप्तीचें सर्व मार्ग खुंटतील अशी ख्रिस्तीधर्मीयांचीं प्रामाणिक समजूत होतीं. जीजस् ख्राइस्टची मूर्ति करून तिची पूजा करणें, ख्रिस्तीभिक्षूंपुढें स्त्रीपुरुषांनीं एकांतांत आपल्या पापांचा पाढा सांगणें व त्यांजकडून पाप विमोचनांचें अभय मिळविणें वगैरे गोष्टी विचारी पुरुषांस पसंत नव्हत्या. सर्वसाधारण लोकांत ज्ञानाचा प्रसार झाल्यावर ही धार्मिक गुलामगिरी फार दिवस टिकणें शक्य नव्हतें. लुथरसारख्या धीट लोकांनीं या प्रचलित ख्रिस्ती धर्माविरुद्ध बंड पुकारलें, व जीजस ख्राइस्टच्या साध्या व शुद्ध शिकवणीवर धर्मगुरूंच्या कारवाईनें जी बांडगुळें उत्पन्न झालीं तीं उपटून टाकून ख्रिस्तीधर्माला मूळचें उज्ज्वल स्वरूप प्राप्त करून द्यावें असा त्या विरोधकांनीं (Protestant) सर्व युरोप खंडभर प्रचार केला, या विरोधकांच्या प्रचाराला आळा घालण्याकरितां रोमच्या पोपनें (वड्या धर्मगुरुनें) जे अनेक उपाय योजिलें, त्यांत इन्क्विझिशन कोर्टाची स्थापना केली. सदरील न्यायासनापुढें विरोधकांनां आणून त्यांनां जबरशिक्षा देण्यांत येत. धर्माच्या नांवावर चालू असलेल्या जुलूमाला त्रासून हजारों लोकांनीं सहकुटुंब देशत्याग करून अमेरिका खंडाचा आश्रय

केला. सदरील जुलुमाची ज्वाला इंग्लंड देशावर देखील पसरली होती. या विरोधकांनां इन्क्विझिशन कोर्टाकडून ज्या शिक्षा फर्माविण्यांत येत त्यांचा उल्लेख कांहीं ग्रंथांतून केलेला आढळतो. देहांत शासन, नरक-कुंडांत बुडविणें व खास तयार केलेल्या यंत्रांत टाकून त्यांचे हालहाल करणें इत्यादि शिक्षांचा सर्वसाधारणपणें नामनिर्देश केलेला आढळतो. रोमन कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट हे दोन्हीहि जीजस् ख्राइस्टवर व बायबला-वर सारखेच श्रद्धा ठेवणारे होते. उभयपक्षांतील विरोध फक्त धर्माचर-णांत रूढ झालेल्या चालीरीतीसंबंधानें होता. असें असतांहि दया-सागर जीजस् ख्राइस्टच्या अनुयायांनीं आपल्या विरोधकांनां निर्दयतेनें वागवावें ही गोष्ट आश्चर्याची होय.

भरतखंडांत वैदिक धर्माला विरोध करणारे अनेक पंथ व उप-पंथ निर्माण झाले. सांख्य दर्शनाचे उत्पादक कपिल, गौतमबुद्ध,महावीर वगैरे नवदर्शनवाद्यांनीं वेदाचें प्रामाण्य झुगारून दिलें. गौतमबुद्धानें वेगळा धर्म स्थापून त्याचा प्रचार ४५ वर्षे सर्व लोकांत मिळून मिसळून केला. त्याचप्रमाणें महावीरानें देखील जैन मताचा प्रसार केला. परंतु वैदिक धर्मानुयांच्या मतें या पाखंडी असलेल्या विरोधकांचा कोणत्याहि प्रकारें छळ करण्यांत आला नाहीं. उलट त्या वेळेचें कांहीं राजे लोक व विचारवंत गृहस्थ त्यांचे अनुयायी बनले. गौतमबुद्धाचे काळांत व त्याच्या पश्चात् पुष्कळ वैदिक धर्माचे अभिमानी राजे होऊन गेले, परंतु त्या राजे लोकांकडून गौतमबुद्धाला अगर त्याचे भिक्षुसंघाला अगर उपासकांस कांहीं एक त्रास झाला नाहीं. पाश्चात्य संस्कृति व वैदिक संस्कृति यांमधील हा जमीनअस्मानाचा फरक सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

युरोपच्या रोमन कॅथॉलिक ख्रिश्चन लोकांनीं प्रॉटेस्टंट लोकांचा जो छळ केला त्याची हुबेहुब नक्कल पोर्तुगीझ राजकर्त्यांनीं व त्यांचें

ख्रिस्त भिक्षूंनीं आपल्या अंमलाखालीं असलेल्या प्रदेशांत इ. स. १५६७ पासून केली. परंतु या छळाचा प्रसार गोवें प्रांताच्या पलीकडे दिसून येत नव्हता. गोवें प्रांतांत हिंदु लोकांनां जुलमानें भ्रष्ट करण्याचा उपक्रम १७ व्या शतकांत मधून मधून चालू होता. या इन्क्विझिशन कोर्टा-पुढें ख्रिस्ती धर्मास विरोध करणाऱ्या लोकांनां शिक्षा देण्यांत येत असत त्या कोणत्याहि सुधारलेल्या राष्ट्रांस शोभतील अशा नव्हत्या. स्वातंत्र्य-वीर सावरकर यांनीं आपल्या गोमांतक काव्यांत गोव्यांतील इन्क्विझिशन कोर्टाकडून ज्या अमानुष शिक्षा फर्मावण्यांत येत असत, त्याचें हृदय-द्रावक वर्णन केलें आहे. हें काव्य प्रत्येक हिंदुधर्माभिमानी गृहस्थानें वाचावें अशी आमची शिफारस आहे. कोणत्याहि हिंदूनें आपले धार्मिक आचारविचार पाळूं नयेत, मूर्तिपूजा करूं नये, वगैरे सक्तीचे निर्बंध गोवें सरकारांकडून हिंदु लोकांवर घालण्यांत आले होते. कोणीहि या निर्बंधांविरुद्ध वागल्यास त्यास इन्क्विझिशन कोर्टापुढें खेंचण्यांत येई. घरांतील कर्त्यासवरत्या पुरुषांस देहांत शासन केल्यावर त्यांच्या बायका-मुलांस गुलाम म्हणून विकण्यांत येई. विरोधकांस रक्तबंबाळ होईपर्यंत चावडीवर चाबकानें वडविण्यांत येत असे. कित्येकांचे हात तोडून त्यांच्या गळ्याभोंवतीं बांधून त्यांस गांवाबाहेर हांकून देण्यांत येई. वगैरे शिक्षांचे कांहीं प्रकार खुद्द पोर्तुगीझ ग्रंथांतून डेलो यानें आपल्या ग्रंथांत नमूद केलें असून कांहीं ग्रंथांत त्यांचे सचित्र देखावे प्रसिद्ध केले आहेत. पोर्तुगीझ वाङ्मयाचा अभ्यास करणारे आमचे सन्माननीय मित्र श्री. अ. का. प्रियोळकर व श्री. पिसुर्लेकर यांनीं डेलो ह्याच्या लिखाणांत अतिशयोक्तीचा भाग नाहीं व त्यानें इन्क्वि-झिशनच्या निर्दय शिक्षांचें रेखाटलेलें चित्र हुबेहुब आहे असें आपलें मत प्रदर्शित केलें आहे.

गोवें सरकारच्या राजदसरीं आमचें मित्र श्री. पिसुर्लेकर यांनीं आपल्या एका लेखांत या अमानुष शिक्षासंबंधीं साधार पुरावा नमूद

केला आहे. तो वाचकांच्या खात्रीकरितां आम्हीं देत आहों. " मंगेश शंकर शेणवी केंकरे नांवाच्या एका सन्मान्य गृहस्थानें आपले तीन पोरके नातू गोव्याबाहेर पाठविले. म्हणून त्याच्यावर खटला भरण्यांत येऊन १६६२ सालीं त्याला मोझांबिक येथील क्वामा नांवाच्या नदीवर सहा वर्षांची हद्दपारीची शिक्षा झाली. एखादा हिंदु मुलगा आई, बाप, आजा किंवा अन्य वडील माणसाशिवाय असला व सज्ञानावस्थेंत जर तो आला नसला, तर अशा पोरक्या मुलांना बाप्तिस्मा देऊन ख्रिस्ती धर्माचें शिक्षण देण्याकरितां Pae dos Christaos नांवाच्या एका धर्माधिकाऱ्याच्या स्वाधीन करावा, अशी आज्ञा १५५९ सालीं सुटली होती. या आज्ञेचा विपरीत अर्थ करून हिंदु लोकांचीं मुलें बळजबरीनें हिसकावून नेल्याबद्दल किती तरी तक्रारी अर्ज गोव्यें सरकारच्या दप्तरांत सांपडतात. सज्ञानावस्थेंत असलेल्या व ज्याचे आईबाप हयात आहेत अशा मुलांनाहि बळजबरीनें नेण्यांत येऊं लागलें. सदर केंकरे हा त्रोंकू नांवाच्या तुरुंगामध्यें आपल्या शिक्षेची वाट पहात पडला असतां गोव्यें सरकारचें एक राजकीय वकील रामोजी कोठारी यानें व्हाइसरॉय साहेबांकडे त्याच्या सुटकेबद्दल गळ घातली व त्याप्रमाणें इन्क्विझिटरकडे मागणी केली असतां व्हाइसरॉयला त्यानें झिडकारून लावलें. हें प्रकरण इन्क्विझिशनच्या अधिकाराखालीं येत नाहीं, अशा प्रकारचा प्रश्न कौन्सिलमध्यें व अन्यत्र व्हाइसरॉयानें उपस्थित केला. परंतु इन्क्विझिटरच्या कामांत ढवळाढवळ न करतां त्यांच्या धर्मकार्यांत मदत करीत जावें, अशा प्रकारची तंबी राजेसाहेबांकडून व्हाइसरॉयला मिळाली व इन्क्विझिशनचा शत्रु असल्याबद्दल त्याच्यावर आरोप करण्या आला. "

गणेश नाईक या नांवाचा वसई येथें यजुर्वेदी माध्यन्दिन शाखेचा ब्राह्मण रहात होता. त्यास पोर्तुगीझ भाषा चांगली अवगत होती व तो आयुर्वेदांत व आंग्ल वैद्यकांत निष्णात होता. त्यास गोव्यें येथें नेऊन तेथील व्हॉइसरायानें जबरीनें बाटविलें व बाप्तिस्माचे वेळीं त्याचा धर्म-

बाप होऊन त्यास आपले नांव इनासिमु दसांत तेरेज असें ठेविलें. तो उत्तम आर्यवैद्य असल्यामुळें तेथील व्हाइसरॉयानें त्यास आपल्या घरींच ठेऊन घेतलें व त्यास उत्तम रीतीनें वागविलें. परंतु संधि साधून तो तेथून निसटून मराठ्यांच्या अंमलाखालीं असलेल्या एका गांवीं आपलें नांव बदलून राहिला.

पोर्तुगीझ खिस्तभिक्षु हे Auto de Fe या नांवाचा एक धर्मविधि साजरा करीत. त्याची एका युरोपियन संशोधकानें इ. स. १६०० पासून इ. स. १६७३ पर्यंतची हकीकत आपल्या ग्रंथांत दिली आहे. ती पुढें देण्यांत येत आहे. ७३ वर्षांच्या अवधींत ४०४६ लोकांवर खटले भरण्यांत आले. यांपैकीं ५७ लोकांना जिवंत जाळण्यांत आलें. वास्तविक देहांत शासनाची शिक्षा १५१ माणसांना सांगण्यांत आली होती. परंतु त्यापैकीं ६४ तुरुंगातच मेल्यामुळें अगर बेपत्ता झाल्यामुळें त्यांचे हाडांचे पुतळे करून ते जाळण्यांत आले. हाच धर्मविधि गोवें येथें इ. स. १७३६ सालीं करण्यांत आला. त्या प्रसंगीं वसई येथील एक सबंध हिंदु कुटुंब भस्मसात करण्यांत आलें व त्या कुटुंबाचें वसई येथील घरदार जमीनदोस्त करण्यांत येऊन त्या जागीं त्या प्रसंगाची खूण म्हणून एक पाषाण रोवण्यांत आला.

इन्क्विझिशनच्या कक्षेंत कोणतीं कार्यें येत होतीं व त्याचे द्वारा लोकांचें कसे हाल होत होते याची रूपरेषा वरील हकीकतींत आम्हीं दिली आहे. अंताजी रघुनाथ कावळे यांस गोवें येथील इन्क्विझिशन कोर्टापुढें हजर रहाण्याचा हुकुम फर्माविण्यांत आला त्यावेळीं त्याची मनःस्थिति कशी झाली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी.

वरील विवेचनावरून इन्क्विझिशनद्वारें ज्या क्रूर शिक्षा देण्यांत येत होत्या, त्यामुळें सर्व हिंदु त्रस्त झाले व आपलें संघटन करून

पोर्तुगीझ सत्तेचा कायमचा नाटनाट करावा असें त्यांच्या मनानें घेतलें यांत शंका नाहीं.

भागवत्पुराण स्कंध २ मध्यें पापी लोकांनां मरणोत्तर ज्या शिक्षा भोगाव्या लागतात, त्याचे २१ भाग केले आहेत. तसेंच इटालियन कवि डान्टि व इंग्रज कवि मिल्टन यांनीं आपापल्यापरी मरणोत्तर पापी लोकांनां नरकलोकांत ज्या यमयातना भोगाव्या लागतात त्याचीं रसभरीत वर्णनें दिलीं आहेत; परंतु धर्मांतर करण्याचें नाकारल्यावरून हिंदु लोकांनां जिवंतपणींच तीव्रतर शिक्षा भोगण्याचा प्रसंग पोर्तुगीझ अंमलाखालीं येत असे. जंजिऱ्याची मोहीम व वसईची मोहीम वरील प्रकारच्या धर्मच्छलामुळेंच पेशव्यांनां हातीं घ्याव्या लागल्या.

# प्रकरण ९

# शुद्धिकार्य अगर पतितपरावर्तन

इ. स. ८ व्या शतकांत मुसलमान लोकांनीं सिंध देशाच्या बाजूनें प्रथम हिंदुस्थानवर स्वारी केली व हजारों हिंदु लोकांना इस्लामी धर्माची दीक्षा तरवारीच्या जोरावर दिली. सिंधू नदीच्या कांठावर एके दिवशीं महर्षि देवल स्वस्थ बसले असतां त्यांच्या आश्रमांतील शिष्य-वृंदांनीं महर्षींना विनंति केली कीं, यवनांच्या जुलुमामुळें हजारों हिंदु लोकांस आपला धर्म सोडून पतित व्हावें लागलें या गोष्टीला काय उपाय योजावा ? महर्षींनीं हा आपद्धर्म समजून त्यांना प्रायश्चित्तें देऊन हिंदुधर्मांत घेण्यास कांहीं हरकत नाहीं असा आपला अभिप्राय व्यक्त केला, व त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या स्मृतींत पतितपरावर्तनासंबंधीं वचनें लिहिलीं तीं येणेंप्रमाणें:—

"बलाद्दासीकृता ये च म्लेच्छचाण्डालदस्युभिः। अशुभं कारिताः कर्म गवादि प्राणिहिंसनम्। उच्छिष्टमार्जनं चैव तथा तस्यैव भोजनम्। खरोष्ट्रविड्वराहाणामामिषस्य च भक्षणम्। तत्स्त्रीणां च तथा सङ्गं ताभिश्च सह भोजनम्। मासोषिते द्विजातौ तु प्राजापत्यं विशोधनम्। चान्द्रायणं त्वाहिताग्नेः पराकस्त्वथवा भवा भवेत्। चांद्रायणं पराकं च चरेत्संवत्सरोषितः। संवत्सरोषितः शूद्रो मासार्धं यावकं पिबेत्। मासमात्रोषितः शूद्रः कृच्छ्रपादेन शुध्यति। उर्ध्वं संवत्सरात्कल्प्यं प्राय-श्चित्तं द्विजोत्तमैः। संवत्सरैश्चतुर्भिश्च तद्भावमधिगच्छति ॥ --देवल.

स्मृतिकारांनीं आपल्या ग्रंथांत जे आचार लोकांनीं पाळावे म्हणून नमूद केलें आहेत, त्यांत विशिष्ट प्रसंगीं म्हणजे आपत्कालीं प्रायश्चित्तें घेऊन बदल करण्यास हरकत नाहीं असें देवल स्मृतींत स्पष्ट

आहे. वास्तविक पाहतां एखाद्या मनुष्याकडून बलात्कारानें धर्मबाह्य कृत्य करून घेतल्यास त्याची जबाबदारी न्यायाच्या दृष्टीनें त्याजवर पडत नाहीं; म्हणूनच सर्वसाधारण नियमास अपवादात्मक असें जें नियम आहेत त्यांस आपद्धर्म असें म्हणतात.

श्रीमत् दयानंद सरस्वती यांनींहि पतितपरावर्तनांस वेदाची संमति आहे असें आपल्या ग्रंथांत सप्रमाण प्रतिपादन केलें आहे. देवल-स्मृतींत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र धर्मांतरानंतर निरनिराळ्या प्रकारचीं प्रायश्चित्तें देऊन शुद्ध करून घेण्यास हरकत नाहीं असें स्पष्ट लिहिलें आहे.

तथापि " शास्त्राद्रूढिर्बलीयसी " या वाक्यावर भिस्त ठेवून हिंदुलोकांचे धर्मगुरु ब्राह्मण यांनीं वरील स्मृतींत सुचविलेल्या आपद्धर्माचा फायदा घेण्याचें साफ नाकारलें. ब्राह्मण वर्गाच्या या राष्ट्रविघातक अविचारी व अव्यवहारी वर्तनाचा जितका निषेध करावा तितका थोडाच. आपल्या हटवादीपणामुळें असंख्य लोकांस स्वधर्मास पारखे व्हावे लागते याची किंचित्‌हि जाणीव त्यांस नव्हती असें दिसतें.

श्रीशिवाजी महाराज व्यवहारचतुर, धोरणी व मुत्सद्दी असल्यामुळें त्यांनीं ब्राह्मण लोकांच्या या हटवादीपणांस भीक न घालतां जुलमानें मुसलमान झालेल्या दोघां मराठ्यांस पुनः हिंदु धर्मांत घेतलें. नेताजी पालकर हा हिंदुपदपादशाही मिळविण्याचे कामीं महाराजांचा उजवा हात होता. इ. स. १६६६ सालीं महाराज दिल्लीहून युक्तीनें पळून आले, त्यावेळीं नेताजी पालकर मोंगलांच्या हातीं लागला व त्यास त्यांनीं मुसलमानी धर्म स्वीकारण्यास लाविलें. कांहीं वर्षांनीं नेताजी शिवाजी महाराजांस भेटण्यास आला त्यावेळीं त्यानें राष्ट्रोद्धाराच्या कामीं जी कामगिरी केली, तिची जाणीव ठेवून त्यास हिंदुधर्मांत परत घेतलें. त्याचप्रमाणें बजाजी निंबाळकर

हा आपल्या वतनाच्या संरक्षणाकरितां नाखुषीनें मुसलमान झाला होता, त्याच्या मुलानें हिंदुधर्मांत परत येण्याविषयीं महाराजांना विनंति केल्यावरून महाराजांनीं जातगंगा बोलावून, त्यांच्या संमतीनें, त्यांस हिंदुधर्मांत परत घेतलें. केवळ रूढीकडे महाराजांनीं लक्ष दिलें असतें तर त्यांच्याकडूनहि दोन महत्कार्यें झालीं नसतीं. दोन कुटुंबें हिंदु धर्मास कायमचीं पारखीं झालीं असतीं याच धोरणांस मुत्सद्देगिरी व व्यवहारज्ञता म्हणतात.

श्रीशिवाजी महाराजांचें उदाहरण ताजें डोळ्यांपुढें असतां तत्कालीन ब्राह्मण मंडळींनीं फिरंग्यांच्या जुलुमांस कायमचा आळा घालण्याकरितां स्मृतीच्या आधारें शुद्धीकरणाच्या तोडग्याचा उपयोग कां केला नाहीं, याचें आश्चर्य वाटतें. जुलुमानें बाटविलेल्या लोकांना पुनः हिंदु धर्मांत घेण्यांत शास्त्राची आडकाठी नाहीं. अशी फिरंग्यांची एकदा खात्री झाली असती तर त्यांनीं हिंदु धर्माचा उच्छेद करण्याचें सत्र चालू ठेवण्याचा खटाटोप केला नसता. श्रीमत् दयानंदसरस्वती यांनीं शुद्धिकार्याचा मोठ्या प्रमाणावर प्रचार केल्यामुळें मुसलमान लोकांनीं हिंदु लोकांस त्यांच्या इच्छेविरुद्ध इस्लामीधर्माची दीक्षा देण्याचा जो अव्याहत उपक्रम चालविला होता,त्यास मोठ्या प्रमाणांत आळा बसला. पंजाब, रजपुताना, गुजरात वगैरे प्रांतांत आर्यसमाजानें आपलें कार्य मोठ्या उत्साहानें केल्यामुळें हिंदु धर्माचें संरक्षण झालें; याचें सर्व श्रेय श्रीमत् दयानंदसरस्वती यांना आहे. श्रीमत् दयानंदसरस्वती यांनीं महाराष्ट्रांत शुद्धिकार्याचा प्रचार करण्यास सुरुवात केली; परंतु पुणें येथील सनातनी म्हणविणाऱ्या व वेळीं अवेळीं विचारस्वातंत्र्याचा पुकारा करणाऱ्या कांहीं संभावित विद्वान मंडळींनीं त्यांचा निषेध करून शुद्धिकार्य धर्मबाह्य आहे असा लोकांचा समज केला.

थोरले बाजीराव यांनीं आपल्या यवनी राखेपासून झालेल्या मुलाचा व्रतबंध करावा अशाबद्दल ब्राह्मण मंडळींपुढें प्रश्न टाकला होता; परंतु

त्या कामीं त्यांस ब्रह्मवृंदांकडून प्रोत्साहन मिळालें नाहीं. तथापि बाजीरावांनीं श्रीशिवाजी महाराजांसारखी थोडी चिकाटी धरली असती तर त्यांस त्या कामीं यश आलें असतें व मुसलमान झालेल्या लोकांस पुनः हिंदु धर्मांत घेण्यास मार्ग मोकळा झाला असता. तसेंच अन्ताजी रघुनाथ कावळे व इतर ब्राह्मण व क्षत्रिय ज्ञातींतील पुढारी लोक यांस शुद्धिकार्याचें काम हातीं घेण्यांस सुलभ झालें असतें. फिरंग्यांनीं हिंदूंना सर्रहा ख्रिस्ती करण्याचें जें सत्र आरंभिलें होतें, तें समूळ नष्ट झालें असतें. फिरंगी लोकांनीं हजारों कुटुंबांस भ्रष्ट करून आपल्या प्रिय धर्मास पारखें केलें त्याची जबाबदारी त्या वेळच्या ब्राह्मण पुढाऱ्यांवर आहे हें वेगळें सांगावयास नको.

# प्रकरण १०

## पर्यालोचन

---

पोर्तुगीझ सरकारनें कोंकण किन्याऱ्यावरील दमण पासून गोव्यापर्यंत सर्व मोठमोठीं बंदरें आपले ताब्यांत घेतलीं व त्या ठिकाणीं लहान मोठे किल्ले बांधून लष्करी दृष्ट्या तीं ठिकाणें मजबूत केलीं होतीं. पोर्तुगीझ लोक शेंकडों वर्षांपासून आरमारी युद्ध करण्याचें कामीं कसलेले होते. दर्यावर्दी म्हणून त्यांचा लौकिक सर्व जगभर पसरलेला होता. कोलंबसानें समुद्रांत दूरवर प्रवास करून अमेरिका व वास्कोदिगामा यानें हिंदुस्थान शोधून काढिलें; त्यानंतर धाडसी पोर्तुगीझ लोकांनीं गोवें येथें राज्य स्थापन करून उत्तरेस दर्याकिनाऱ्यावरील सर्व महत्त्वाचीं बंदरें काबीज केलीं. हिंदुस्थानाशीं इतर खंडांतील मोठमोठ्या देशांचें दळणवळण या बंदरांतून होत असे. आरमारी युद्धांत पोर्तुगीझांशीं टक्कर देण्यास अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर आंगऱ्याशिवाय इतर कोणाची सत्ता नव्हती. पोर्तुगीझांच्या बलाढ्य आरमारापुढें आपलें आरमार टिकाव धरूं शकेल कीं नाहीं, याबद्दल आंगरे यांसहि खात्री नव्हती. जंजिरा हें लहानसें मुसलमानी राज्य शेंकडों वर्षें समुद्रकिनाऱ्यावर असून त्याचा बींमोड मोंगल व मराठे यांजकडून झाला नाहीं. वसईच्या मोहिमेचें प्रकरण उपस्थित होण्यापूर्वीं आंगरे बन्धूंमध्यें कलह माजला, तेव्हां शाहूमहाराज व पेशवे यांनीं मध्यस्थी करून त्यांचा "सलोखा घडवून आणण्याचा प्रयत्न केला; पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. आरमारी युद्धांत आंगरे फार कुशल होते; पण वसईच्या मोहिमेंत ते तटस्थ राहिले, त्यामुळें आपणांस आरमारी युद्धांत कोणीच प्रतिस्पर्धी नाहीं असें फिरंग्यांस वाटून ते आपलें आरमारी सामर्थ्य एकवटून वसईच्या मोहिमेंत झगडले. पोर्तुगीझांची आरमारी जहाजें, तोफा

व निरनिराळ्या शस्त्रास्त्रांनीं सज्ज ठेवलेलीं असत; त्यामुळें समुद्रांत राहून आपल्या किल्ल्यांचे संरक्षण करणें त्यांस सुलभ पडे. मराठे यांजपाशीं आरमार व त्यावरून मारा करणाऱ्या तोफा नव्हत्या त्यामुळें पोर्तुगीझ लोकांनीं आपले जहाजांतून सोडलेले तोफेचे गोळे मराठे सैन्यांस सहन करावे लागत. समुद्रांतून व किल्ल्यांतून तोफांच्या भडिमाराला तोंड देऊन किल्ला हस्तगत करण्याचें दुष्कर कार्य मराठी सेनेस करावें लागे. त्यामुळें मराठी फौजेचा फार नाश झाला. चिमणाजीआप्पा आपल्या पत्रांत नेहमीं म्हणत कीं, 'फिरंगी तर आगीचा पुतळा, त्याच्यापुढें आपल्या सैन्यास टिकाव धरवत नाहीं.' अशा स्थितींतहि चिमणाजी आप्पानें मोठ्या धैर्यानें वसईच्या किल्ल्याला वेढा देऊन पोर्तुगीझांना बाहेरून येणारी रसीद बंद केली. मुंबईंतील इंग्रज लोक आपल्या जहाजांतून अंतःस्थ रीतीनें पोर्तुगीझांस अन्न सामुग्री पुरवीत अशा प्रकारची माहिती चिमणाजीआप्पास मिळाली होती. इंग्रज बाहेरून मराठ्यांशीं सलोखा दाखवून आंतून पोर्तुगीझांस मदत करितात अशा आशयाचें एक पत्र पेशवे दप्तरांत आहे. पण चिमणाजीआप्पानें मोठ्या शिताफीनें वसईचा किल्ला लढविला. गोवें सरकारकडून फिरंग्यांस मदत येण्याचे रस्ते बंद केले, त्यामुळें फिरंग्यांची किल्ल्यांत फार त्रेधा उडाली. सैन्याची उपासमार होऊं लागली. मराठी सैन्यानें किल्ल्याला सुरुंग लावून भगदाड पाडिलें व त्यांतून मराठे सैन्यानें प्रवेश केला. या धडाडीच्या कामगिरींत मराठ्यांची अपरिमित हानि झाली. मुरारजी नाईक व इतर सैनिक यांनीं फार शौर्य गाजविलें. आणि त्यामुळें वसईची मोहीम जिंकण्याचें श्रेय चिमणाजीआप्पास मिळालें.

पुणें शहरापासून कल्याण—वसई—ठाणें हीं खुष्की व जलमार्गानें १००-१२५ मैलांच्या टापूंत असतांना फिरंग्यांनीं चालविलेलें हिंदुधर्मावरील आक्रमण व धर्मच्छल यांचा बंदोबस्त करून पोर्तुगीझांचें

उच्चाटन करण्यास पेशव्यांस १०-१५ वर्षांचा दीर्घावधी लागला याबद्दल पुष्कळांस गूढ वाटतें. या बाबतींत पेशव्यांचे समर्थनार्थ अनेक कारणें पुढें करण्यांत येतात; पण त्यांतील मुख्य कारण असें आहे कीं, उत्तर हिंदुस्थानांत होणाऱ्या स्वाऱ्यांमुळें पेशव्यांस मराठी राज्याच्या सरंक्षणार्थ आपल्या सैन्याच्या हालचाली कराव्या लागत. अलोट पैसा खर्च करावा लागे यामुळें वसई प्रांतांतील पोर्तुगीझांच्या उच्चाटनाचा प्रश्न लांबणीवर पडला असावा. वसईच्या राजकारणाची जबाबदारी अन्ताजी रघुनाथ कावळे, गंगाजी नाईक प्रभृति लोकांवर पडली, तेंव्हां फिरंग्यांच्या प्रतिकारार्थ सैन्यभरती, युद्धसामुग्री इत्यादि व्यवस्था त्यांस करणें भाग पडे; पण सैन्यांतील लोकांस पगार वेळेवर देण्यास पेशव्यांकडून पैशाची मदत होत नसे त्यामुळें अन्ताजीला आपले नांवावर कर्ज उभारून सैन्याचा पगार द्यावा लागे. अन्ताजी व गंगाजी नाईक यांजवर पेशव्यांनीं वसईचे राजकारणाची जबाबदारी टाकली,त्यामुळें कल्याणचा सुभेदार वासुदेव जोशी याचा द्वेषाग्नि भडकून तो त्यांचेविरुद्ध कारवाई करी. अशा विविध कारणांमुळें वसई येथील फिरंग्यांना शह देण्याचें काम फार रेंगाळत गेलें. पण या राजकारणाचें नेतृत्व चिमणाजीआप्पाकडे आल्यावर त्यांनीं मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे गायकवाड इत्यादिकांना एकत्र करून अजिंक्य वाटणाऱ्या फिरंगी लोकांवर मोठ्या कौशल्यानें हल्ला करून त्यांचें उच्चाटन केलें.

### वसईचा तह

वसईच्या तहाचीं कलमें वाचल्यानंतर मराठ्यांनीं "डोंगर पोखरून उंदिर काढला" या म्हणीची आठवण होते. वसईचा किल्ला खालीं करून देतों, असें कबूल करून ता. ५ मे १७३९ रोजीं पांढरें निशाण घेऊन पोर्तुगीझांचे वकील चिमणाजी आप्पाकडे आले आणि तहाची कलमें ठरून ता. १२ मे रोजीं पोर्तुगीझांनीं किल्ला खालीं केला. या तहाच्या शर्ती बारा आहेत. त्यांचें सूक्ष्मरीतीनें अवलोकन केल्यास

त्या-पोर्तुगीझांनीं केलेल्या अनन्वित धर्मच्छलाच्या दृष्टीनें फारच सौम्य वाटतात. प्रस्तुत मोहिम हातांत घेऊन पोर्तुगीझांचे उच्चाटन करावें म्हणून पेशव्यांस ज्यांनीं प्रवृत्त केलें, त्यांच्या स्वार्थत्यागाची, स्वधर्माभिमानाची व उत्कट देशभक्तीची स्तुति वसईच्या मोहिमेचा पूर्ववृत्तांत वाचणारे निःपक्षपाती वाचक, केल्यावांचून राहणार नाहींत; अन्ताजी रघुनाथ व गंगाजी नाईक प्रभृति लोकांनीं या कामीं जे परिश्रम केलें त्याचा योग्य मोबदला त्यांस पेशव्यांकडून मिळाला नाहीं, याबद्दल कोणासहि उद्वेग झाल्याशिवाय राहणार नाहीं.

गोव्याजवळच्या कांहीं प्रदेशास साष्टी हें नांव आहे. पेशव्यांनीं वसईची मोहीम सुरू केली, तेव्हां गोव्याहून पोर्तुगीझांची मदत येऊं नये म्हणून त्यांनीं व्यंकटराव घोरपडे व सरदार दादाजीराव भावे नरगुंदकर यांना गोव्याचा साष्टी प्रांत काबीज करण्याकरितां रवाना केलें. ता. १२ जानेवारीस १७३९ रोजीं व्यंकटरावानें दिघीच्या घाटानें गोव्यावर उतरून अल्पावकाशांत पोर्तुगीझांना जेरीस आणिलें. व्यंकटरावाजवळ सात हजार स्वार व तितकेंच पायदळ इतकी फौज होती. व्यंकटरावानें मोठ्या चातुर्यानें गोव्याकडील साष्टींप्रांत जिंकला; पण याच सुमारास नादिरशहानें दिल्ली हस्तगत केल्याची बातमी बाजीरावाला आली, त्यामुळें त्यानें व्यंकटरावास गोव्याचे युद्ध थांबवून ताबडतोब परत येण्याबद्दल आज्ञा पाठविली त्यामुळें व्यंकटरावास गोव्याकडील मोहिम अर्धवट सोडून परत जावें लागलें. याचा परिणाम असा झाला कीं, पोर्तुगीझांची सत्ता आमूलाग्र नष्ट न झाल्यामुळें त्यांना आपल्या धर्माचा प्रसार करावयास बराच वाव मिळाला व हिंदूधर्मावरील त्यांचें आक्रमण बव्हंशानें कमीं झालें, तरी तें सर्वस्वी नष्ट करण्याचा मराठे व पेशवे यांचा हेतु फलद्रूप झाला नाहीं, असें म्हणावें लागतें.

व्यंकटराव घोरपडे व दादाजीराव भावे या दोघांच्या मतांत फार फरक असे. दादाजीराव भावे हा फिरंग्यांस सामील होता व त्यांज-

कडून लांच घेऊन त्यांस फितूर झाला होता ही गोष्ट पोर्तुगीझ लोकांच्या दप्तरांतून प्रसिद्ध झालेल्या पत्रावरून स्पष्ट दिसतें. दादाजीराव भावे चिमणाजी आप्पांस एका पत्रांत लिहितो कीं, "फिरंगी म्हणजे पापात्मे त्यांचा नाश होणें हें मोठें अपूर्व नाहीं." तोच दादाजीराव गोव्याचे विजरई लौरिसाल यास लिहितो कीं, " फिरंगी लोक येखलासीस बरें, इमानाचे पुरे, क्रियेचे खरे, येक कडेचे माणसानें वचन दिल्हिलें तुमचे आगा देखील तफावत न पाडतां निभावणारें असे आम्हीं घाटाखालीं आलें समइ बहुतांचें तोंडें आइकून दरम्यानें होऊन नके बोतेने उपराला करून इन्दीचा (गोव्याचा) बचाव केला." त्याचा मुलगा सरदार भास्करराव यानें विठोजी शेणवी व गोवें सरकारचे चिटणीस यांना लिहिलेल्या पत्रांत आपल्या वडिलांचा फिरंगी सरकाराबरोबर कसा निकट स्नेहसंबंध होता याचें वर्णन केलें आहे.

मराठयांनीं गोवें सरकाराबरोबर जो इ.स. १७३९ सालीं तह केला, त्यांतील शर्ती वसईच्या तहाप्रमाणेंच सौम्य असून धर्मच्छलाच्या बाबतींत गोवें सरकारवर मराठयांकडून कांहीं एक निर्बंध घालण्यांत आले नाहींत. याबद्दल श्री. पिसुर्लेकर यांनीं "मराठयांच्या गोव्याकडील स्वाऱ्या" या लिखाणांत जी माहिती दिली आहे ती बरीच उद्बोधक आहे. थोरल्या बाजीरावाचा मेहुणा व्यंकटराव घोरपडे हा अत्यंत स्वामि निष्ठ असून फिरंग्यांची सत्ता हिंदुस्थानांतून समूळ नष्ट व्हावी असा त्याचा हेतु होता व त्याप्रमाणें त्यानें मोठया शौर्यानें खुद्द गोवें बेट सोडून गोवें सरकारचा बहुतेक सर्व प्रांत काबीज केला होता व तहाच्या वेळीं मराठे ज्या शर्ती तहांत घालतील, त्या त्यांनीं निमूटपणें कबूल केल्या असत्या; परंतु त्याच्याच गोटांत त्यास एक प्रच्छन्न शत्रू होता, तो शत्रू म्हणजे त्याच्याशीं सहकार्य करणारा दादाजीराव भावे हा होय. त्याचें वर्तन नेहमी दुटप्पी असे.

फिरंगी लोकांवर व्यंकटरावानें जय मिळविल्यावर तहाच्या वेळीं हिंदु लोकांस स्वधर्माचरणास स्वातंत्र्य असावें, गोवें शहरांत एक हिंदु लोकांचें देऊळ असावें, धर्मसमीक्षण सभा (Inquisition) बंद करण्यांत यावी, हिंदूवरील 'शेंडी' कर काढण्यांत यावा, वगैरे गोमांतकस्थ हिंदुलोकांच्या हितार्थ कांहीं भाषा व्यंकटरावाच्या कारभाऱ्यांकडून बोलण्यांत आली; पण पुढें तहाचें काम दादाजीरावाच्या मध्यस्थीनें चालू झाल्यामुळें या मुद्दयांस महत्त्व देण्यांत आलें नाहीं. तसेंच ईचबर्डच्या मध्यस्थीनें बाजीराव व पोर्तुगीझ यांमध्यें तहाच्या वाटाघाटीस पुनः सुरुवात झाली, त्या वेळीं श्रीमंतांनीं 'साष्टी बारदेशांत महाराष्ट्र धर्म ज्यांचा ते करितील त्यांस फिरंगी यानें चालवावें देखील गोवियांत महाराष्ट्र धर्म ज्यांच्या ते करितील त्यांस फिरंगी यानें चालवावे' असें कलम तहाच्या खर्ड्यांत घातलें होतें. पण हेही कलम पेशव्यानें तहाच्या प्रसंगीं गाळलें !

ता. २ मे रोजीं दादाजीराव भावे यानें गोवें सरकारकडे जो तह केला, त्यांत 'फिरंगीयाच्या मुलकामध्यें फौजा मुकाम जाहल्या आहेत त्या उठोन जाण्याच्या खर्चास फिरंगी यांही सध्यां द्यावे रुपये लाख सात' असा ठराव केला होता.

'मराठ्यांच्या गोव्याकडील स्वाऱ्या' या पुस्तकांत गोव्याचा पोर्तुगीझ अधिकारी विजरइ ओंदि य सांदोमील यानें यासंबंधानें आपल्या पत्रांत पुढें लिहिलेलें उद्गार काढले आहेत, ते फार महत्त्वाचे आहेत. "गोव्यांतील हिंदु लोकांस धर्मस्वातंत्र्य असावें ह्या मुद्यावर मराठे भर देतील असें वाटत नाहीं. गेल्या वर्षीं व्यंकटरावानें इकडे केलेल्या तहनाम्यांत ह्या विषयासंबंधानें कोणतेंच कलम घातलें नाहीं. सांतू सेणवी यांजकडून बाजीरावानें पाठवून दिलेल्या तहाच्या खर्ड्यांतही ह्या बाबतींत एक शब्द देखील लिहिलेला नव्हता. भोसल्यांच्या तहाच्या वेळीं बाजीराव व चिमणाजीअप्पा यांनीं त्या मुद्याची आठवण जरी काढली तरी

त्यांनींच त्याकडे दुर्लक्ष केलें. ह्या सर्व अनुभवसिद्ध गोष्टी लक्षांत आणतां मला वाटत नाहीं, कीं, केवळ धर्मस्वातंत्र्याकरितां मराठ्यांस इतका फायदेशीर असलेल्या ह्या तहास त्यांच्याकडून विरोध होईल.''

बाजीराव व चिमणाजी आप्पा या उभयतांस पोर्तुगीझ सरकारशीं तह करण्याची खास मुखत्यारी नव्हती असें वरील विवेचनावरून दिसून येतें. गोवें सरकारास अनुकूल तह करण्याच्या मुळाशीं त्यास फितूर असलेला दादाजीराव भावे हा असलाच पाहिजे व याखेरीज खुद्द श्रीशाहूमहाराज यांचें दरबारांतील नारोराम मंत्री, रामकृष्ण चिमणाजी प्रभृति गोवें सरकारास गुप्त रीतीनें अनुकूल होते. गोवें व दर कायमचें नष्ट होऊं नये अशी इच्छा श्रीशाहूमहाराज यांनीं प्रदर्शित केली होती. वाडीकर सावंत, भोंसले व खुद्द पोर्तुगीझ अमलाखालीं असलेले विठोजी शेणवी, धुमे, बहुगुण कामत, बाघ, वेंकट कामत, उमी कामत, बाबुलो सेणवी, सुखटणकर, सांतु शेणवी डांगी, बाबुराव देसाई, महाबळ, पै, घांटगे प्रभृति गोवेंकर, हिंदु लोक फिरंग्यांचें हित साधण्याच्या उद्देशानें मराठ्यांकडे राजकारणें लावित असत. यावरून गोव्याच्या अगर वसईच्या तहांत पोर्तुगीज सरकारवर हिंदु लोकांस धर्माच्या बाबतींत स्वातंत्र्य असावें असा निर्बंध घालण्यांत आला नाहीं याचा दोष थोरले बाजिराव अगर चिमणाजी आप्पा यांजकडे बिलकूल येत नाहीं. श्रीशाहू छत्रपति यांचा कल पाहून उभयतां बंधूंस आपलें धोरण ठेवावें लागत असे. वसईचा तह नीरस व निराशाजनक कां झाला अशाबद्दल अलिकडे वाद उपस्थित झाला आहे. त्या कामीं श्रीयुत पिसुर्लेकर यांनीं पोर्तुगीज सरकारच्या दप्तरांतून प्रसिद्ध केलेले कागदपत्र बरेच उद्बोधक होतील असें वाटतें.

वसई व साष्टी प्रांतांतून पोर्तुगीझ सरकारची कायमची हकालपट्टी झाल्यामुळें वसईच्या तहांत त्या प्रांतांत हिंदूंना धर्मस्वातंत्र्य असावें

असा निर्बंध घालण्याचें कांहीं प्रयोजन राहिलें नव्हतें. परंतु गोवें प्रांतांवर मराठ्यांनीं स्वारी केली त्यांत त्यांनीं गोवें सरकारचा बराच भाग काबीज करून त्यांस जेरीस आणलें असतांहि त्यांजबरोबर केलेल्या तहांत महाराष्ट्र धर्म संरक्षणाबद्दल कांहीं एक निर्बंध घातला नाहीं व त्यामुळें गोवें सरकारास हिंदूंच्या धर्मकृत्यांना पुढेंमागें ढवळा-ढवळ करण्यांत सवलत मिळाली हें पाहून वीरोत्तम चिमणाजीआप्पा यांच्या मनाची काय स्थिती झाली असेल याचा वाचकांनीं विचार करावा व हिंदुधर्मावर परधर्मीयांनीं हल्ला केल्यास त्याचा प्रतिकार करण्यास मराठ्यांचें राज्य असमर्थ आहे अशी अखिल हिंदु समाजाची समजूत झाली असल्यास त्याचा दोष श्रीशाहूमहाराज व त्यांच्या दरबारांतील घरभेदे व फितूर लोकांकडे आहे. वसईचा तह करतांना अन्ताजी रघुनाथ कावळे व गंगाजी नाईक यांच्याशीं चिमणाजीआप्पानीं व त्यांच्या सल्लागारांनीं विचारविनिमय केला नव्हता असें दिसतें. नाहीं तर अन्ताजी रघुनाथ कावळे यानें आपल्या नेहमींच्या बाणेदार व निःस्पृह स्वभावाला अनुसरून योग्य ते निर्बंध सुचविले असते.

# परिशिष्ट अ १

## पत्रें १ ते ११

## श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे व चिमणाजी आप्पा यांनीं अंताजी रघुनाथ यास लिहिलेलीं पत्रें

### पत्र नं. १

अंखडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य रा. अन्ताजी रघुनाथ गोंसावी यास—

सेवक बाजीराव बल्लाळ प्रधान नमस्कार सु॥ इहिदे सलासिन मया व अलफ ( शके १६५२ ) तुम्हीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें लिहिले वर्तमान कळलें हशमा लोक कित्येक उठून गेले राहिले तेहि उठून जातात त्यांस लोकांच्य पोटाची बेगमी करावी. अगर आपणांस काय आज्ञा कर्तव्य तें करावी म्हणून लिहिलें ऐशियास तिकडील मामला कृष्णराव महादेव यांस सांगितला आहे. तिकडील बेगमीची व देह बुदीची बन्दोबस्ताची आज्ञा कर्तव्य ते त्यांस केली आहे. ते तिकडे आलियावर जे बेगमी बन्दोबस्ती कर्तव्य तें करितील. तुम्हांजवळ हवे व मगे तिकडील जे असतील ते मशार निल्हेकडे घेऊन जाणें. त्यांस बहुत प्रकारें सांगितलें आहे. तुमचे ठायीं कोणेविशीं अन्तर करणार नाहींत. जाणिजे छ १४ रविलाखर. आज्ञा प्रमाण.

लेखन सीमा

### पत्र नं. २

अंखडित लक्ष्मी अलंकृत रा. रा. अन्ताजी रघुनाथ गोंसावी यांस—

सेवक बाजीराव बल्लाळ प्रधान नमस्कार सु॥ इसने सलासिन मया व अलफ (शके १६५३ ) तुम्हीं विनंति पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. लिहिलें वर्तमान साद्यन्त कळलें, "म"कार ग्रामची चिठ्ठी आली. तेच वजिन्नस तुम्हीं पाठविलीं ते पावोन वर्तमान कळलें. सारांश कोण्हे गोष्टीचा संशय नाहीं. तथापि सावध असणें. फिरंगी यास सल्याचेठीक जाहले नाहीं, व होईल सारखा भरोंसाहि नाहीं; यास्तव हेवा लागें जे आहेत त्यांचा संग्रह केला पाहिजे; व त्यांस ग्राम घाम ठाण द्यावें. म्हणून

लिहिलें होतें. ऐशियास रा॥ कृष्णराव यांस पुनरुक्त दर्शनास यावयाची आज्ञा केली आहे. ते आल्यावर गांवहि करून देऊं. चिन्ता न करणें. आपलें वर्तमान वरचेवर लिहित जाणें जाणिजे छ १ सव्वाल आज्ञा प्रमाण.

लेखन सीमा

## पत्र नं. ३

अखण्डित लक्ष्मी अलङ्कृत राजमान्य राजश्री अन्ताजी रघुनाथ गोंसावी यांस—

सेवक चिमणाजी बल्लाळ सुरुसन इसन्ने सलासिन मया व अलफ (शके १६५३) तुम्हीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें लिहिला अर्थ अवगत जाहला तुमचे विशीं राजश्री कृष्णराव यांस लिहिले आहे. ती॥ राजश्री...............राव सातान्यास गेलें आहेत ते लौकरच येतील आणि तुमची खर्चाची वेगमी व गांवची सनद व हुजऱ्या ऐसे तुम्हांकडे पाठविले जाईल. आपलें समाधान असो देणें तुम्हीं फिरंगी याचें **परमशत्रू** आहां. हे फिरंगी यास फारच असह्य, यास्तव तुम्हीं फिरंगी याचे सरहद्देपासून चहूंपांचा कोसावर राहणें, त्यांच्या जवळ न राहणें. वेलापूरचा मजकूर लिहिलातर तेंही राजकारण राखून ठेवणें. तीर्थरूप आलियावर ये विषयींचा विचार करणें तो केला जाईल जाणिजे आपलें वर्तमान वरचेवर लिहित जाणें छ. १९ जिलकाद आज्ञा प्रमाण.

लेखन सीमा

## पत्र नं ४

अखण्डित लक्ष्मी अलङ्कृत राजमान्य राजश्री अन्ताजी रघुनाथ गोंसावी यांस—

सेवक बाजीराव बल्लाळ प्रधान नमस्कार सुरुसन इसन्ने सलासिन मया व अलफ ( शके १६५३ ) तुम्हीं विनंतिपत्र पाठविलें ते प्रविष्ट जाहलें लोकांचे ( फाटून गेलें ) एक हुजऱ्या पाठवावा व गांव राहावयास देववावा म्हणून लिहिलें तें कळलें, ऐशियास राजश्री कृष्णराव महादेव यांस भेटीस बोलाविलें आहे. तें येतांच तुम्हांस गांव नेमून देऊं ( न ) व लोकांची वेगमी करून देणें तें देऊं आपले समाधान असो देणे. वरकड राजश्री सखोजी आङ्ग्रे सरखेल यांजकडील

व ठ बेगारीचा उपसर्ग लागतो. ते विषयीं मशारनिल्हेस लिहिलें आहे. या उपरी वेठबेगारीचा उपसर्ग देणार नाहींत. आपले वर्तमान वरचेवर लिहित जाणें छ. २४ जिलकाद आज्ञा प्रमाण.

लेखन सीमा

**पत्र नं. ५**

अखण्डित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री अन्ताजी रघुनाथ गोंसावी यांस—

सेवक बाजीराव बल्लाळ प्रधान नमस्कार सु॥ खमस सलासिन मया व अलफ (शके १६५६) तुम्हीं विनंति पत्र पाठविलें तें (?) कित्येक कार्याची सिद्धता केली आहे. हवेव मगे श्रमी होतात. आम्हांपाशीं येतात. तीन ठिकाणें एकच येलगारानें हस्तगत होऊन द्रव्य अमित मिळतें. आणि स्वामी कार्य म्हणोन चित्तावरीं घेत नाहीं तें न कळे. या उपरी यांच्या तुमच्यांत कार्य जाहलें तरी जाहलें उप्रांतिक होत नाहीं त्याचें आरमार येऊन बन्दोबस्ती होईल म्हणोन कित्येक विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐशियास तुम्हीं लिहिलेला अर्थ यथार्थच असे. तुम्ही साहस करितां कनी न केली, मग सिद्ध करणें तें केलेंत, परंतु चारी गोष्टी एकावच्छेंदे करीन म्हटल्या परिणाम कैसा लागेल. विचारें कर्तव्य ते करावें लागतें. तरी तुम्हीं आधीं येथें येणें. सर्व हरिद्र चित्तांत आणून तुमचेच विचारें आज्ञा कर्तव्य ते केली जाईल सारांश तुम्हीं येथें येणें फकरुद्दीन पाटेल व सैयदअली शाबासकर यास कौल पाठवावे म्हणोन लिहिलें, त्याजवरून तुमच्या लिहिल्याप्रमाणें कौल पाठविले असत. जाणिजे छ ७ सफर आज्ञा प्रमाण.

लेखन सीमा

**पत्र नं. ६**

अखण्डित लक्ष्मी अलंकृत रा. राजश्री अन्ताजी रघुनाथ गोंसावी यांस—

सेवक बाजीराव बल्लाळ प्रधान सुरुसन सलासिन मया व अलफ (शके १६५६) तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. ज्याचें तेच होऊन कार्यभाग करावयास सिद्ध आहेत. परंतु द्वितीय दिवशीं स्वामींनीं पदात सैन्याचें साहित्य देऊन पोंहचेसें केलें. यांनीं स्वामीचे ध्वजारोहण होतें. सैन्य पाठविणें तें अगोदर 'र'कार ग्रामी पाठ-

वावे. म्हणजे नेमिल्या नियमा प्रमाणें कार्यभाग सिद्धिस पावेल, म्हणोन कित्येक तपशील लिहिले ते लोक आले ऐशियास तुम्हीं लिहिला, मनसुबा बहुत उत्तम आहे. परंतु याचा विचार बहुत चौकशीनें करणें तो आधीं करून जेथील तेथें ठाकठीक करून रवानगी करावी लागते, तरी तुम्हीं बहुत बहुत जलदीनें हुजुर येणें एक पळाचाही विलम्ब न लावितां येणें, विचार करून टांकोटाक तेच क्षणीं तुमची रवानगी करून एक घडी तुम्हांस ठेवणार नाहीं. तरी बहुत बहुत त्वरेनें येणें. जाणिजे. छ ५ मोहरम. आज्ञा प्रमाण.

लेखन सीमा

## पत्र नं. ७

राजमान्य राजश्री अन्ताजी रघुनाथ गोंसावी यांसी—

सेवक बाजीराव बल्लाळ प्रधान सुरुसन इहिदे सलासिन मया व अलफ ( शके १६५२ ) तुम्हीं विनंति पत्र पाठविलें. लिहिला अभिप्राय अवगत झाला. ऐशियास श्रावण पौर्णिमेची तीथ निघोन गेली. या उपरी अधिकामध्यें तीथ ठीक करणें. आम्हीं राजश्री स्वामीची आज्ञा घेतली आहे. स्वार होऊन पुण्यास येतों. राजश्री पिलाजी जाधवराव यांसी रा॥ श्रीकृष्णराव यांसीं पाठवून देतों. तुमचेंहि उर्जित करूं ( न ) गङ्गाजी नाईक याचेविषयीं लिहिलें त्यांस तिकडे आल्यावर त्याचेंही उर्जित करूं. ( न ) तुम्ही त्यांचें समाधान करणें. जाणिजे छ २ सफर.

लेखन सीमा

## पत्र नं. ८

अखण्डित लक्ष्मी अलङ्कृत राजमान्य राजश्री अन्ताजी रघुनाथ गोंसावी यांसी—

सेवक चिमणाजी बल्लाळ, नमस्कार. सुरुसन सलासिन मया व अलफ ( शके, १६५१ ) तुम्हीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. लेखनार्थ विस्तारें कळला. ऐशियास मुख्य भावार्थ कीं, अवघा प्रसंग सत्य भासून कर्तव्य असेल तें तैशीच आज्ञा करावी. नाहीं तर दुराशेंत गुंतावें सारिखें नाहीं. म्हणून लिहिलें; ऐशियास अवघा प्रसंग तुम्हीं प्रत्ययास आणून दिला आहे. त्यास अनृत कायनिमित्त भासेल. तुम्हीं चित्तांत संशय आणावा असा अर्थ नाहीं. कर्णाजी शिंदे यांजकडून मनुष्य देवविले ते आले

नाहीं म्हणून लिहिलें, त्यांस पहिलें लिहिलें होतें हल्लींहि लिहिलेलें आहे. ते मनुष्य देतील. जाणिजे चंद्र २२ सावान आज्ञा प्रमाण.

लेखन सीमा

## पत्र नं. ९

अखण्डित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री अन्ताजी रघुनाथ गोंसावी यांस—

सेवक बाजीराव बल्लाळ प्रधान नमस्कार सुरुसन सलास सलासिन मया व अलफ ( शके १६५४ ) तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. कार्याचा मजकूर वेसना समुदाय पाहिजे. त्याचा अर्थ विस्तारें लिहिला तो कळला, व कित्येक अर्थ राजश्री केशव लिंगोजी यांणीं विदित केला. ऐशियांस कार्य करावें. हें अत्यावश्यक आहे, जागां जागां जमाव गुंतला आहे. तो मोकळा करून आणावयास पोर्णिमेची सन्धी अनुकूल पडत नाहीं. याजकरितां जमाव जमा करून अमावाश्येस कार्यभाग निश्चयरूप करावाच. जमाव लागभाग फौज तयार करीत असों. तुम्ही वाटीतिटी. हवेलागे, दोरेसोर राजश्री वासुदेव जोशी याचे निदर्शनास आणून देणे. अत:पर कार्य कर्तव्यच. दुसरा विचार नाहीं. जाणिजे. छ ९ रमजान आज्ञा प्रमाण.

लेखन सीमा

## पत्र नं. १०

अखण्डित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री अन्ताजी रघुनाथ गोंसावी यांस—

सेवक चिमणाजी बल्लाळ नमस्कार इहिदे अर्बैन मया व अलफ (शके १६६२) तुम्हीं विनंति पत्र पाठविलें तें पावलें. फिरंगाणचे मनसुबीयाचा मजकूर प्रारंभापासून शेवटपर्यंत लिहिला व आपले अन्नवस्त्राचा अर्थ लिहिला, तो सविस्तर कळला. ऐशियास प्रस्तुत लष्करचे रवानगीचा गवगवा आहे. लष्कर रवाना जाहल्यावर खासा स्वारी कोकण प्रांन्तीं होईल. तुमचा सर्व अर्थ ध्यानांत आणून आज्ञा करणे ती केली जाईल. जाणिजे छ २५ रज्जब आज्ञा प्रमाण.

लेखन सीमा

**पत्र नं. ११**

अखण्डित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री अन्ताजी रघुनाथ गोंसावी यांस—

सेवक बाजीराव बल्लाळ प्रधान नमस्कार सु॥ इसन्ने सलासिन मया व अलफ ( शके १६५३ ) तुम्हीं विनंती पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. सायन्त वर्तमान कळले. कित्येक आपल्या परिवाराचा विचार लिहिला तो विस्तारें निवेदन जाहला; ऐशियास तुम्ही जो मजकूर लिहिला तो यथार्थच, परन्तु यंदा स्वारींतून आलियावरी तमाम लोक आपल्या घरीं गेले आहेत. दुसरी गोष्ट राजकार्यभागानिमित्त राजश्री स्वामींच्या दर्शनास स्वार होऊन गेलों यास्तव तो प्रस्तुत योग घडत नाहीं. सातारियाहून फिरून पुण्यास आलियावरी तुम्हांस भेटीस बोलाऊन कार्य भाग केला जाईल. तूर्त तुम्हीं इकडील तैसेंच असणें. पुढें अहां सुरू कार्य केलें जाईल खातरजमा असो देणें । जाणिजे छ ४ जिल्हेज.

लेखन सीमा

---

# परिशिष्ट अ २

## पत्रें १२ ते १७

## अंताजी रघुनाथ कावळे ह्यानें पेशव्यांस लिहिलेलीं पत्रें

**पत्र नं. १२**

॥ श्री ॥

पुरवणी श्रीमत् राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी.

सेवक अन्ताजी रघुनाथ कृतानेक नमस्कार विनंती विसेष. राजश्री केशव लिंगोजी स्वामीकडे पाठविले आहेत त्यास ते सविस्तर स्वामिपादांबुजी विनंती करतील त्यावरून सर्व अर्थ विदित होईल. फिरंगाणचा वर्तमान तर आरमार आलें होते ते गोव्यास गेले. हाली फिरंग्याची सेना कुल गड कोट किले घोलीत (?) यावतः चेऊल तावतः दवण पावेतो. बारासे आश्रा मायेतो माणसे सिबंदीस आहे.

या वेगले गावकुठार[१] ठाण्यामध्यें मनुशे पचवीस सिवंदीची हमज़ात त्याची आहेत. यावेगले भंडारी कासार पाचकलसे लोक सास्टीस मधी आहेत तितकेहि स्वामी पादांवुजे इछित आहेत. यैसियासी हवेलागे सर्व म्हणतात जर वैशाख वद्यें एकादसीचें दिवसी दोन हजार हशम पनासे ( क ) जजाला जर आम्हास खरवेचे रानीं येतात तरी आम्ही खायनखाये[२] सास्टी घेऊन देतो. आणि च्यार कोट सास्टीमधे आहेत. वेसावे व वानदरे[३] व माहाले व तुरभे या चहू कोटाचे दोरे आणून हातीं ठेविले आहेत. जे घटिकेस ठाणे घेतो ते घटकेस चार कोट फते करून देतात. यास काडीयेक अन्येथा होणार नाहीं. अन्येथा जाली तरी छिरछेद करावा हा दंड. हालीं द्रवे सास्टामध्ये म्हणाल तरी पंचवीस लक्ष रुपये हे नून्येपदार्थे[४] स्वामीचे पदरीं पडतील. एकसे सतावन गांव त्याचे वर्गत[५] जात आहे ती पाहाणें. बंदर आठ हातास येतात. अखिल पद प्राप्त होत यैसे असतां कोन्ही हितंछत्रू[६] स्वामीस कितेक प्रकार झूटा म्हणोन संबोधन करितील, त्यास स्वामीही आपली मनुश पाठऊन हव लाग वाट व सधनता पाहिलीच आहे, यैसे आसता संपूर्ण निशा नसली जाली तरी पुन्हा आपली विस्वासी सभे माणसे पाठऊन हवा लाग वाट खाडीचा उतार व भेदल्या लोकाची बोली चाली व कोटाचे भट ( ? ) मनास आणून सत्ये असेल तरी व द्रव्याची प्राप्ती आम्ही लिहिल्याप्रमाणे सत्ये असले तरी कार्यभागीं[७] चित ठेऊन करा आणि नसले किंवा काहीयेक लटके असले तरी रंकास दंड जो चितास येईल तो करा. आणि उगच झुटादोरा ठेऊन आम्हास श्रमी करिता आणि विनोदवाद लटके म्हणोन तुमचे सर्व कर्ते पुरुष म्हणतात. आणि सर्वे प्रकारे आमचा नाष होतो. व काही देता उपहास्यामधे घालोन आमचे अद्दष्टे ठेविले असे. या उपरी मनुसुबा द्रव्यावेगला होत नाहीं म्हणून कोन्ही विचार करिती त्यास रंकाची विज्ञापना यैसीजे येक आपले दाहा हुजरें आम्हाकडे पाठवून द्यावे. त्यास आमचे हवे लागे म्हणतात कीं च्यार कुले आम्ही लक्षा रुपयाची धरून रात्रसमई सिदगडास आणून देऊन. त्याजवरून लक्ष रुपया विनाश्रमी निघे तो विचार साध्य करून देऊन.

---

१ गांवदाडंगे लोक, गांवांतले गुंड, लढवाई लोक. २ खामखा, निश्चयें. ३ वांदरें, वांद्रे अनुनासिकाबद्दल किंवा अनुस्वाराबद्दल स्वतंत्र न लिहित जसे जाऊन म्ह. जाऊं. करून म्ह. करूं. वानदरे म्ह. वांदरे, वांद्रे वगैरे. ४ किमान पक्ष. ५ ताब्यांत, हातांत ( ? ). ६ वासुदेव जोशी वगैरेंस उद्देशून. ७ मसलतीवर.

हच सतेमिथ्ये पाहाणे असले तरी कोन्हास न कलता दाहा हुजरे ( पाठऊन दिध-लियानें ) येका महिन्यामधे लक्ष रुपया चोरीनें पदरी पाडोन देऊन. हे करणे जाले तरी कल्याणच्या सुभ्यासहि कलून देऊं नय. हेहि गोष्ट चितास नये तरी हवे लागे आणि रंक या आम्हा समस्तास निरोप दणें. ह्याच पत्राच्या प्रतिउतरी निरोप जाल्यानी हेच उर्जित महद्भाग्ये म्हणोन, कोठेहि जाऊन कालक्षय करोन, आम-च्याने उपोशणे व कितीक अपमान हे सोर्चत नाहीं. कृपालोभ असो दीजे हे विनंती. छ २३ माहे रमजान. —पेशवे दप्तर, वसई मोहिम, भा. १६

Antaji Raghunath gives to the Peshwa the news of the Portuguese ships having gone back to goa. The writer asks for a reinforcement of two thousand strong and fifty field-Pieces whith whose help, he says, he will reduce the four forts of salsette. He further assures the Peshwa of a possibility of raising money up to 25 lacs from the province of Salsette.

**पत्र नं. १३**

॥ श्री शकर ॥

श्रीमंत राजश्री दादवा गोंसावि यांच सेवेसी—

पोष्ये अन्ताजी रघुनाथ अनेक आसीरवाद विनंती. येथील कुशळ परिसोन स्वानदवैभवलेखणआज्ञा कली पाहिजे विसेष. कपापत्र पाठविले वाचोन जीवेकला ( जीवनकला ) दुणावली. आम्हास आपल्यावेगला दुसरा आश्रये नाहीं. मनसावाचाकर्मणेकरून सर्वस्वी शरण तेथें आपण अभिमान धरतील हे गोष्टीस अपूर्वच नाहीं. याउपरा आमचा पूर्ववर्तमान साकल्ये गोसावियासी विदितच असे. परंतु पुन्हा सूचनामात्र स्मरणार्थ लिहितो. सन इहिदेमधे राजश्री जाधवराऊ गोसावि याचे सोबतीस श्रमसाहास केले आणि दोनसे बरकंदाज याची सिबंदी पाचा महिन्याची सर्वस्व अपहार करोन दिल्हे. यावर पावणे चवदासे रुपये हशमास रोजमुरा दिल्हा. आणि कारण जर रा॥ जाधव घाटावर वेथस्त आणि रो बालाजीपंत येथ ज्वरेकरोन मग्न आणि हशम

---

८ सासत.

भक्षायवेगळे राहात नाहीं. तेन्हा रुण त्रिहोत्राप्रमाणें रुपये घेऊन दिल्हे. या- उपरी पुढे मनसबा झाला तो सर्व विदितच. हवेलागे माणसे चवतीस ते आपला प्रात टाकोन आमचे वचनास तीन वरसे श्रमी. त्यास भक्षावयासी द्यावे लागते. किती म्हणोन रुणे घ्यावे ? अता तोहि मार्ग राहिला. मृत्य अवस्था येऊन उभी ठाकली. येथें हल्लीं जे कोन्ही आहेत त्यास ह्या मनसब्याचें प्रयोजनच नाहीं. त्यास सुखदुख म्हणोन सांघावे काये ? यैसियासी आम्ही कदीम गोसावियाचे म्हणोन विनंती करितो की येजमानास श्वाफ पुसावे जर हा मनसबा करणे आहे तरी आता उत्तम दिवस आहेत. वैशाख वद्ये येकादसीचे दिवशीं कार्य साधोन देतो. एक रात्रीमधे सासस्टीतील च्यार कोट व येकसे सत्तावन गाव मुलूख येके रात्रीन साधून देतो. यासीं हव लाग वाट उतार कोटाचे दोरे सर्व तयार करोन ठेविले असेत. कदा- चित येजमानास कोन्ही हितछत्रू लटके म्हणोन सागतीं असतील तरी दोन मनुश येजमानाची आप्त विश्वासू पाठवून हे अवघे मनास आणून खरे करावे. याजमधे अनुरेणुमात्र लटके असेल तरी जिन्हा छेदन करावी हाच मुचलका सही. याज उपरी येजमानास कोन्ही सागतील की द्रव्यावेगळे कार्य होत नाहीं त्यास आमचे हवे लागे म्हणतात की जर द्रवे नसले मनसब्यास, तरी येक पचवीस हुजरे आम्हाकडे महिनाभर पाठवून देणें, आम्ही च्यार कुले गुप्तरूपें धरून लाख रुपया- परयेत महिन्यामधें निर्माण करून देऊन, हे ज्या गडी म्हणाल त्या ठिकाणी आणून देऊन. हे गोष्ट अन्येथा होणार नाहीं. हेहि चिती न भरे आणि आमचा उधार न होये यैसे आपले दृष्टीस आले तरी भलतेप्रकार निरोप होये तो पदार्थ करणें हेच महत्: उर्जित समजोन पुढें यात्रासनंमध ( यात्रासंबंध ) विचारला जाईल. अता उपोशणे व अपमान याच्या समुद्रातून काडावयासी आपण समर्थ असेत. कृपा लोभ असो देणें. पत्री साभाल करीत जाणे हे विनंति. कृपा करून ह्या मनुशास येजमान असतील ते स्थल श्रुत करणें हें विनंती.

—पेशवे दप्तर, वसई मोहिम, भा. १६

Antaji Raghunath writes to one Dadba ( Badba ) how he exerted himself in the cause of the state along with Jadhorao and how he had to incur debt for the expenses of his men. Further he complains about the in-difference of those who are in charge of the management

of affairs and finally requests orders from the Peshwa. to conduct the operations against any odds. The writer promises his full support saying that he would within one night bring the whole of salsette province under him and would raise a lakh of rupees as loan in one month.

### पत्र नं. १४

श्रीशकर

श्रीमत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी—

शरणागत सेवापरायण अंताजी रघुनाथ कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल परिसोन स्वकीये स्वानंदवैभवलेखणआज्ञा केली पाहिजे विशेष. रंकास स्वामीपादांबुजावेगळे दुसरे कोन्ही संरक्षण करी ऐसे नाही. स्वामी अवतारीकच आहेत. तेथे स्तुतिस्तोत्र करणे तरी मंदमतीने केवी घडेल? याउपरी सर्व क्षमा करायासी समर्थ आसा. रंक येकनिस्ट अंघ्रिकमळीं, हे सर्व विदितच. का जर मनोमन साक्ष, तेथें द्रष्टांतें दाखवावे यैसा पदार्थ नाहीं. सन इहिदेमधें स्वामी-सनदेवरून राजश्री पिलाजी जाधवराऊ गोसावियासमागमे दोनसे बरकंदाज आणि आपण स्वता पाच मास सेवा केली. रोजमुरा व सिबंदी काही येक घेतले नाहीं. का जर पुढे महत उर्जिताचें भुकेले म्हणोन आपेक्ष्या करीत राहिलो आणि जे श्रम करावे ते केले. अदृष्टें न्यूनता केली ततसंमधी ईश्वरी इच्छा. राजश्री पिलाजी जाधवराऊ वेथस्त होऊन वाघवलीस गेले तेव्हां हशमाचे लोक होते ते रोजमुराकरिता कमरा बाधोन जावयासी लागले. आणि स्वामीचे पत्री आज्ञा आली की सेवकाने व राजश्री बालाजीपंत आठवले याही हशम घेऊन पुढें चालावे मागून स्वामी व पिलाजी जाधवराऊ लवकरच येतो म्हणोन कृपापत्र पावले. त्यास ते हशमाचे लोक रोजमुरा घेतल्याखेरीज राहात नाहीं म्हणोन राजश्री बालाजीपंत व केशव बहिरी हे उभयतां (लो) काजवल येऊन रुपयाचा तलास करविला तेव्हां पावणेचवदाशे रुपये लोकांचें कर्ज काढोन त्रिहोत्र्याप्रमाणें खतें देऊन घेऊन रोज-मुऱ्यास दिल्हे. त्यास राजश्री बाळाजीपंत याच्या चिठ्या गु॥ केशव बहिरी व सरदाराची कबजे घेऊन ठेविली आहे. सेवकाची आस्ता सर्वस्वें उदारत्वेंकरोन स्वामिकार्य साधावे. आणि महत्तर येश स्वामि गैवरवयाचे ( गौरवावयाचे ) पात्र

व्हावे. परंतु जन्मांतरास उपाये कैचा? पुढे जे जाले ते सर्व विदितच आहे. या-उपरी राजश्री पिलाजी जाधवराऊ घाटावर गेले आणि रंकास जमावसहवर्तमान राजश्री कृष्णराऊजी स्वामीचे पदरीं घातले. तेथील क्षिणक्षिणाचे उर्जित सर्व पादांवुजी विदितच असे. तेथें लिहावेच नलगे. त्याउपरी आज्ञाप्रमाण पुण्यामध्ये येऊन मास आठ लोकासहवर्तमान हवेलागे सरदार सर्व घेऊन राहिलो. आणि स्वामीही ज्या ज्या निशा[३] हवीलागेच्या मार्गाच्या करविल्या. बालोजी करला व गोविंद ब्राह्मण हे पाठऊन मार्ग हव खाडीची वांट सर्व पाहाविली तेव्हा रंकाचे चित जालें कीं कार्यसिधी होऊन रुणापासून मुग्त होऊन. कां जर, महतर भाग्याची इच्छा तरी आहेच परंतु रुणापासोन मुग्त झालो आणि येश जाले हाच महतर लाभ. ततसमधी शंतोसी जाहालो आणि स्वामीचे चितामधें कार्यउदेश होताच परंतु आमचे जन्मांतर कितिकांचे मुखीं येऊन मधे विक्षप जाला. याउपर स्वामी या प्रांते आले तेव्हा न व्हावे यैसे न्हवते. परंतु दुष्टग्रहफळश्रुतीनें रंकाचा नास जाला. लोक मेलविले ते श्रमी. श्रमातुरच केले. याउपरी हवेलागे हे फिरगाणचे यासी कौवलेपत्रे आली. आणि ह्या कल्या (?)मधें च्यार पाइली तांदूल रुपयास यैसा दुशकाल. त्यास त्यांस भक्षावयास न द्यावे तर ते जातात आणि कृपानिधीनी गाव देऊन म्हणोन वचन दिल्हे होते आणि त्यास काये प्रतिउतर द्यावें ती आज्ञा करायासी समर्थ असा. याउपर वसईच्या कोटाचा भेद केला आणि स्वामीस पत्र लिहिले त्यास आज्ञा आली कीं येथार्थच आहे. परंतु स्वारी जालियावरी निर्वाह होईल. तर स्वामी हे राजकारण हजारा माणसान हातास येते. मधील लोक भेदले आहे. आणि मार्ग हव नीट आहे. आणि तेवढ्यानें सर्व स्थले पदरी पडतात. कां जर मूलछेद जाल्यान मग शाकाचे प्रयोजन नाही. यैसे असता स्वामीस सत्ये भासावे आणि सरजाम करावा येदर्थी कोन्ही सभे पाठऊन गोष्ट चितांत आणून करावे. कां जर आजचा दीवस उद्या येणार नाही. पंधरा दिवसी नित्ये राजकारण नवे म्हणोन पुढा रंकास बोल ठेवाल. यासी जर जेष्ट वद्य अम-वाशापावेतों कार्य होत असले तरी निश्चयात्मक लिहिणे. नाहींतरी वुगेच होरा ठेऊन आम्हास सर्वसीं अपकीर्तीस पात्र करावे येसा पदार्थ उत्तम नाहीं. तरी आम्ही केवल श्रमी असो. ज्या प्रकार उचित असेल त्या प्रकारे करायासी समर्थ असा. कृपा लोभ असो दीजे हे विनती. —पेशवे दप्तर, वसई मोहिम, भा. १६

१ चासकर, कल्याणचा सुभा. २ वाटाडे, माहितगार, भेद्ये. ३ खात्री.

Antaji Raghunath Kavle to the Peshwa, giving him news from the Konkan that Pilaji Jadhao was ill and had proceeded to his village at Vagholi, that he therefore had to work under Krishnarao, that he had to face tremendous difficulties in retaining his men owing to want of money. The only request of the writer to the Peshwa is that he should be freed from the debts in which he had to become involved on account of his army.

**पत्र नं. १५**

पौ॥ छ २ मोहरम ॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री आपास्वामीचे सेवेसी—

सेवक अंताजी रघुनाथ कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल वैशाख शुध चेतुर्थीस भृगवासर प्रहर दिवसपर्येंत कुशल जाणून स्वकीये स्वानंदवैभव लेखण आज्ञा केली पाहिजे विशेष आज्ञेप्रमाणें सेभर वोझे गवत झावळ्या घेऊन वानरेयास आलो रा॥ सूर्याजी नाईक नाखते व आमची दोन माणसें देऊन नेमल्या जाग्यास पाठविले; तंव तेथें वुधवारी रात्रऊं ताडाचा मेढा[1] घातला दरव्याज्यापुढें वीस हात व पाच हात आश्रेने दरवाज्यापुढें जागा रिता आहे. त्यामध्यें वरकंदाज से दोनसे आश्राने आहेत. तेथें दारूची वुधली पुरली आहेत. म्हणोन वातमा आहे. त्यास आम्ही वोझी नेऊन टाकावीं ती मेढ्या बाहेर पडतात. अग्न लाविली तर लाकडाचा मेढा असता तरी जलता, वोल्या ताडांचा मेढा जलणार नाहीं डोंब होऊन टाकणारास पळता मुस्कील होईल याउपर याही सुलतानढवा करावा म्हणून विचार केला आहे. परंतु स्वामीचेच पूणेकरून सर्व होऊं सकेल परंतु सेवकाचे वेड्या विचारे दिसते जर त्याणें भवता मेढा घातला आणि पचेमेच्या दरव्याज्यापुढें तोफा दोन भुंईवर मांडिल्या आहेत. वरत्या सा तोफा थोरल्या दो वुरजा—

( पुढील पान गहाळ )

—पेशवे दप्तर, वसई मोहिम, भा. १६

Antaji Raghunath Kavle informs Chimaji Appa that the orders given by him were duly carried out.

---

१ तात्पुरता आसऱ्यासाठीं किंवा बचावासाठीं. झाडांचा किंवा लाकडांचा किंवा डांभांचा तट घालतात तो.

**पत्र नं. १६**

छ २६ मोहरम

॥ श्री ॥

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा साहेब स्वामीचे सेवेसी–

सेवेसी विज्ञापना. प्रजेनकालचे मुकाम त्या मुलकांत जाहालें यैसे दिसोन येते. त्यास वसई व वानरे यासी मोर्चे तो लागलेच आहेत. स्वामीचे पुनेकरून इतक्यामधे हस्तगत जाहाले तरी बरेंच जाहाले, त्यास गोवेयाहूनहि त्यास कुमक आली आहे. उनाला आहे तो फिरंगी चलवल करील. प्रजनेकालीं आगीचा मार त्याचा चालता दिसत नाही तेव्हा आपला माना पडेल यैसे वाटतें. सेवकास सुचली गोष्ट सेवेसी निवेदन केली आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

Chimaji Appa is informed of the siege of Bassein and Bandra. The Firangis have sent Reinforcements thither from goa. The Firangis will be only active in summer.

**पत्र नं. १७**

×× नाचण्या वरया हरी ××× घेऊन ते लोक पोसिले ह्या पदार्थी चतुर्मास काढिला. रंक तर पादांबुजी जावोन राहिला असतां समर्थ, आज कार्ये होते उद्या होते ह्या आस्तेने च्यार मास तेथे क्रमिले. पुढ स्वामी येतात म्हणोन निश्चये होऊन रंक पुढे आला. तव मागोन राजश्री वासुदेव जोसी आले. तेथील कितीक लिहावे तरी अदृष्ट म्हणोन उगेच राहिलो. येथे दोन पक्ष सेवकास द्वेशटे- येक फिरंग्याचा पक्ष आणि दुसरा तोहि स्वामीस विदितच आहेत. त्यास जो येथें आला तो सत्रुस मोही (?) तदनरूपच होतो का जर श्रवण मनन निजध्यास मग होतो. श्वयंप्रकाश हा अर्थ येथे आहे. जरी कार्य होईल यैसे आसले तरी •आम्ही व हव्यालाग्याही व जे आमचे सोबती आहेत स्वामी कार्याचे क्षुधित त्याही राहावे. नाहींतर राहिल्याने उत्तर नाहीं. या उपर काल माघ वद्य सप्तमीचे दिवसी मुंबये वसेहून यात्रेकरू भीमाशंकरास जावयासी आले ××× आमची येक बहीण नूतनक्षोरास जावयासी ××× जावे लागले तेथे काही ××× कोन्हाचे कांहीं न घेता येक आमचा द्वेष्टा उभा करोन यात्रा लुटिली म्हणोन आम्हावर तुफान केले. त्यास आम्ही मोहोरीपासून कपर्दिकापावेतों कोन्हाकडोन काही घेतले असेल

तर कोटिशहा ब्रह्महत्या पंचमाहापातके त्याच क्षेत्री आचरलीशीं होतील आणि कदाचित कोन्ही मुदई उभा राहिला येक देव भट आणि त्याचा बंधु हे टाकोन दुसरा लक्षयात्रेंतून कोन्ही सांगितले तरी सर्व अस्मादिकाचा अपहार करून छीर-छेद करावा. हाच मुचलका तेथे कमावीसदार गुरव व तेथील जोसी व जमीनदार व कुलयात्रा आणि हे न सांगतां राजश्री देवभ (ट) फिरंगाणकर यासच विदित जाले आणि राजश्री जोशी याही आम्हास दरबारास नेऊन इजत घेतली, तेव्हा आम्ही येकटे यात्रेस गेलो होतो आणि हा पराक्रम की येकटा असता लक्षावधी यात्रा लुटावी हा पदार्थ अपूर्व जोश्याचे दृष्टीस पडिला असे. असो. सर्व सत्ये करावयासी स्वामीच समर्थ असत.

स्वामीही कृपापत्री लिहिले की त्या प्रांती स्वारी आहे तरी ××× ठेवावी. त्यास साष्टीचे ××× आहेत. मार्ग जावयाचा अद्यापि शुद्ध आहे. कुंठित जाल नाहीं, जे पूर्णिमेस स्वामी चितीं धरितील ते दिवशी अनेथा होणार नाहीं. आजपरयेत हे राजकारण राखोन ठेवलें आसे. का जर नित्ये पंधरा पंधरा दिवसी राजकारण पहावे लागते. स्वामी हा खबर (?) कधी चिती धरितील हे कलत नाहीं म्हणोन च्यातक न्याये अपेक्षा करावी लागते या उपरी बेलापुराविसी जो स्वामी जवळ होता तो आदिपि राजकारणामधे वाट पाहित आहे. त्यास त्यांचे स्वजातीचे लोक मनुशपनास आहे आणि आपले भेदाचे दीडसे आहेत, त्यास त्या स्थलाचे पूर्वकडे येक उजाड किला आहे त्याचे नांव पांडवगड. तेथे आपले दोनसें माणूस पावताच तो म्हणतो की मी येथील धंदा उरकोन तुमचे पदरी स्थल घालितो याउपरी ×× सग्राम द्यावा आणि कितीक उर्जित करावे म्हणून ××× लिच आसे. त्यास तो नित्य म्हणतो.

--पेशवे दप्तर, वसई मोहिम, भा. ३४

Antaji Raghunath Kavle writes to the Peshwa about a false charge brought against him by Vasudev Joshi. He also gives news about his plans for capturing Belapur.

# परिशिष्ट अ ३

## पत्रें १८ ते २४.

## अंताजी रघुनाथासंबंधानें पेशव्यांस इतर लोकांनीं लिहिलेलीं पत्रें

### पत्र नं. १८

पो छ ८ रजमान ॥ श्री ॥

पुरवणी राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी–

विनंती उपरी तीर्थस्वरूप राजश्री नारायण जोशी याचें पत्र चेवलाहून. आजी आलें. त्याची नकल पाठविली आहे त्यावरून विदित होईल. फिरंगी याची बोली-चाली होत आहे परंतु मसीद सोडावी ऐसे फिरंगी याचे मानस दिसत नाहीं. त्यास आमचे विचारें प्रस्तुत कार्य करणें, तेव्हां सला करूं नये. बोलीचालीवर घालावें आणि इकडे भोंक पाडावे. याप्रमाणें आपले विचारास येईल तरी चेवलास लेहून लांबणीवर घालावे. बहुत काय लिहिणें हे विनंती. अणजूरकरास कर्जदार उपद्रव करिता ( त ), त्यास ताकीद करणे म्हणोन लिहिले तरी त्यास कोणी गोष्टीचा उपद्रव लागणार नाहीं व स्वामींनी लिहिले कीं राजश्री अन्ताजी रघुनाथ याचे लोक जमा करवणे, त्यासही सांगितले आहे व अणजूरकरासही सांगितलें आहे· त्यासी समाधानाच्या गोष्टी बोलावयाच्या त्या बोलतच आहों. थोडेबहुत खर्चास देऊन आज्ञेप्रमाणें उमेदवार राखलेच आहेत. कळले पाहिजे हे विनंती.

लेखक–वासुदेव जोशी, पे. द. भा. १६

It has been reported to Bajirao Ballal that the negotiations are opened but the Portuguese are not willing to make over the port Masjid. Efforts are being made to persuade Antaji Raghunath and Gangaji Naik to collect army to meet the threatening situation.

### पत्र नं. १९

पो॥ छ १ सवाल श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी–

पौष्य वासुदेव जोशी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ता॥ छ २७ सवाल जाणून स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. फिरगाण प्रांतीचे कार्य-

भागाचे वर्तमान पूर्वी स्वामीस लिहिले होते त्यावरून कळलेच असेल. अलीकडे वसईचें राजकारण रा।। अन्ताजी रघुनाथ व गंगाजी अणजोरकर यांजकडे आलें आहे. त्याचे चौकसीस माणसें पाठऊन तेथील शोध मनास आणून चैत्र शुद्ध पोर्णिमे सिद्धी करावी येसा निश्चय केला आहे. आपणास कळावें याकरितां लिहिले असे. मार्गाचे वर्तमान मनास आणितां मार्ग ठीक आहेत. ठाणियात गेलियावरी द्रव्यलाभहि होईलसा दिसतो. वरकड होणे ते प्राक्तनानुरूप व ईश्वर इच्छेनें होईल. पुढे ठाणियाचा कोट जाहलियावरी कार्य साध्य होणार नाहीं आणि येदा फौज घरीं राहिली आहे व हशमहि आहे. हजार बाराशें माणूस मात्र जाजती ठेवावे लागेल. सिबंदी देणें लागतच आहे. याकरितां काम करावे येसे राजश्री रायाचे विचारे आहे. आपणास कळावे याकरितां लिहिले असे. याचे उत्तर पाठवावे. त्याप्रमाणें वर्तूणूक करून. कळले पाहिजे. बहुत काय लिहिणे लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

Vasudeo Joshi writes to Chimaji Appa that Antaji Raghunath and Gangaji Anjurkar are entrusted with the political affairs in connection with Bassein preparations for an attack are being made and prospect of getting a valuable return after the capture of the fort are very high.

## पत्र नं. २०

पो।। छ २५ जिलकाद ।। श्री ।।

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी–

पोष्य वासुदेव जोशी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ता।। छ २१ जिलकाद मुकाम कुलगांव जाणून स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी आज्ञा केली कीं कल्याणास जाऊन राजकारण ठीक करून रा।। अन्ताजीपंत व गंगाजी नाईक व भिकाजी नाईक या त्रिवर्गास पाठवावे. त्यास आम्ही स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जाहालों ते राजमाचीस आलों. राजमाचीहून छ १९ जिलकादी स्वार जाहलो ते मौजे दहीवली ता।। नीड पो।। नसरापूर येथें आलों. तेथें भिकाजी नाईक भेटले. त्यास त्रिवर्गाचा विचार मनास आणून पाठवावे यास्तव भिकाजी नाईक यास समागमे घेतले. त्यास मार्गी नेरळाजवळी रा।। अंताजीपंत

भेटले त्यासही घेऊन मौजे कुलगावास आलों. गंगाजी नाईक कल्याणास होते. त्यास रातोरात बोलाऊन आणून बोली मनास आणून अंताजीपंत व भिकाजी नाईक यास स्वामीकडे पाठविले आहे. हे सविस्तर सांगता कळेल. गंगाजी नाईक यास कल्याणास नेले. यासहि मागाहून दो चौ दिवसा पाठवितो. कळावे याकरितां लिहिले असे. मागाहोन सविस्तर लिहोन पाठऊं. बहुत काय लिहिणें. लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती. —पेशवे दप्तर, वसई मोहिम, भा. १६

Wasudeo Joshi writes to the Peshwa that as per his instructions he managed to meet Antajipant, Gangaji Naik and Bhikaji Naik and consulted them in connection with the political situation in Konkan.

### पत्र नं. २१

इ. स. १७३३ च्या एप्रिल महिन्यांत पोर्तुगीज सरकारनें लिस्बनहून काउंट डी सँडोमिल ह्यांस गोवें येथें व्हाइसरॉयच्या जागेवर नेमणूक करून पाठविलें, त्या वेळीं पोर्तुगिजांचे अमलाखालीं असलेलें वसई व साष्टी प्रांत ह्याजवर मराठयांचा हल्ला होण्याची फार दहशत होती. सदरील व्हाइसरॉयानें गोवें येथें आल्यावर पोर्तुगाल राजास पत्र लिहिलें त्याचा सारांश येणेंप्रमाणें:—

पोर्तुगीज अमलाखालीं असलेल्या उत्तर कोंकणांतील प्रांतांत साष्टी हें बेट सर्व बाजूंनीं महत्त्वाचें आहे. तें हस्तगत करण्याचा मराठयांचा उद्देश फार वर्षांपासून आहे. येथील ब्रिटिश सरकारनें जर आपणांस मदत केली नसती तर तें बेट मराठयांनीं केव्हांच काबीज केलें असतें, सदरील साष्टी बेटावर मराठयांचे भयंकर हल्ले वारंवार होत असत म्हणून त्या बेटांतील सर्व ठिकाणें मजबूत करण्याबद्दल जनरल डॉन लुइस बाटेलो यांस इ. स. १७३४ साली हुकूम देण्यांत आला. ठाणें येथील किल्ला इंजिनियर जोझे लोयेझ डिसा यांच्या देखरेखीखालीं बांधण्यास सुरुवात केली.

मराठयांना पोर्तुगीज अंमलाखालीं असलेल्या प्रांतांतील किल्ल्यांची तटबंदी केलेली आवडत नसे. तसेंच मराठे हे सांप्रत जंजिऱ्याचा सिद्दि व संभाजी आंग्रे ह्याजबरोबर लढाई करण्यांत गुंतले असल्यामुळें त्यांस एकसमयावच्छेदेंकरून पोर्तुगीजाबरोबर लढाई सुरू करणें पसंत नाहीं; व ह्या परिस्थितीमुळें पोर्तुगीजांचे

प्रांतांना आजपर्यंत त्यांजकडून उपसर्ग झाला नाहीं. तसेंच व्हाइसरॉयानें त्यांजबरोबर गोडीगुलाबीनें व सलोख्यानें आपली वागणूक ठेविल्यामुळें मराठ्याबरोबर लढाई करण्याचा प्रसंग टळला. × × × × × × ×

ता. २६ व २७ फेब्रुवारी १७३५ रोजीं जनरल वासुदेवराव जोशी ह्यांनीं लिहिलेल्या पत्रावरून असें दिसतें कीं, बाजीराव पेशव्यानें त्यांस अलिबाग येथें साष्टी काबीज करण्याकरितां काय काय योजना कराव्या याची वाटाघाट करण्याकरितां बोलाविलें होतें. व ह्या योजना यशस्वी करण्याकरितां सदरील काम अंताजी रघुनाथ कावळे, गंगाजी नाईक व वासुदेवराव जोशी ह्यांजकडे सोंपविलें होतें. ×

**पत्र नं. २२**

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी— १३।१०।१७३३

विनीत सेवक कृष्णाजी रा॥ सां॥ नमकार विनंती यैसी जे, येथील कुशल ता॥ छ १५ जमादिलोवल मु॥ मुंबै स्वामीचे कृपेकरून येथास्थित आसे विशेष, स्वामीचे आज्ञापत्र सादर जाहालें तेथें आज्ञा कीं, पत्रार्थ आजम जनराल यास सांगून खोलंबोन ( न ? ) घेत तें करणें. तुम्ही तेथील वर्तमान मनास आणून हुजूर येणें. यैशास आज्ञेप्रमाणें जनराल मारनिलेस सांगितलें. त्याचे उतर खोलंबा तर होवत नाहीं परंतु परस्परें आंजनवेलीस रवाना होये तो इलाज करावयास सहसा अंतर करणार नाहीं. तूर्त आपलें आरमार रवाना करीत होतों ते सिदी मसूद दहावे तेरखेस सुरतेहून निघणार, येथें आलियावर आमचें त्याचें दर्शनानंतर संभाषण होईल तेव्हां भावनर्थ कलेल; त्यासारखें उतर देईन व तुम्हास हुजूर बोलाविलें, त्यास आपण येक वेल तुम्हाविसी पत्र लिहिले होतें त्याचें प्रत्योत्तर न आलें; यास्तव आपण लिहीत नाहीं. तुम्हास बरे दिसेल ते करा. राहाल तर आमचेहि आरमार रवाना होईल त्यामधी रवाना करून, बोलिले सेवेसी श्रुत होये. ओषधा विसीं मोदीस ताकीद केली आहे कीं, जी ओषधें पाहिजेत ती तलास करून सवंग बरी पाहून विकत मिळतील तितुकी घेऊन देणें. इस्पडतालच्या डाकतरास हुकूम केला कीं, यादी प्रो॥ जी ओषधें मोदी मागेल आसतील ती

---

× पोर्तुगीज व मराठा यांचेमध्यें वसईचा झगडा झाला त्याबद्दल गोवें सरकारनें पोर्तुगीज भाषेंत प्रसिद्ध केलेल्या पुस्तकाच्या आधारें.

देणें, अनमान न करणें, म्हणून इंगरेजी वैद्य सरकारचा त्यासहि सांगितले आहे. स्वामीस लिहवले आहे कीं, औषधें कोणी सांगितली आहेत, परंतु अंबर दोन सेर सांगितलें, यावरून कौतुक दिसलें व तेथें अंताजी रघुनाथ सरदेसाई व देशपांडे प्रांत फिरंगाण म्हणून फिरंगी पत्रीं लेख आहे गणेश नाईक वैद्य येथें आम्हापासीं होता, येथून गोमांतकास जाऊन किरीस्ताव जाहला, बाटला तो फिरून तुमचें प्रांतीं नांव बदलून दुसरें नांव सांगतो. तो वैद्य असेल तर तुम्हीं बहुतांचे पाळणार आहां ? सहसा त्याचें औषध न घेणें. ये विसी आपण लिहितों व तुम्हीं लिहा ऐसे बोलिले. सेवेसी श्रुत होये. स्वामीचे आज्ञेप्रो कांहीं औषधे गु॥ नारो पिलाजी ( ते ) घेतली ते याद आलाहिदा आहे. माहनिले सेवेस मुखवचनी व औषधाची याद सादर करितील व कितेक इकडील आर्थ सांगितला आहे तोही सेवेसी श्रुत होईल. कानजी कुंवरजी वारसी हे बोलतात, आपण पुष्टतेचें औषध तयार करून देतों ते हर कोणास देऊन आणवा (व) येईल म्हणजे आपणास हूकूम करितील तर येईन. तूर्त अठरा दिवस दिवाली पारशांची आहे याकरितां राहीला आहे. औषधाचा हुकूम येईल तर देईन म्हणतो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

## पत्र नं. २३

मुंबई बेटाचे गव्हर्नर व मुख्य सेनापति व ईस्ट इंडिया कंपनीचे प्रेसिडेंट मि. जे. हॉर्न ह्यांनीं थोरले बाजीराव पेशवे, यांच्या पत्रास जबाब दिला आहे त्याचा सारांश:—

मुंबई येथील किल्ला,
६ मार्च १७३४

“आपण आपला नोकर अन्ताजी रघुनाथ ह्यांचे पुर्व हिंदुस्थानचें प्राचीन काळच्या बादशहानीं करून दिलेल्या इनामासंबंधीं ता. ३ मार्च १७३४ चें पत्र लिहिलेंत. व सदरील इनामासंबंधीं त्याजपाशीं कागदपत्र असून त्या आधारावर पोर्चुगीज सरकारनें त्याचें इनाम कायम केलें आहेत असें कळविले परंतु सदरील अन्ताजी रघुनाथ याजवर इन्क्विझिशन कोर्टापुढें आरोपाचा जाब देण्याबद्दल पोर्चुगीज सरकारकडून हुकूम झाला आहे. तरी अन्ताजी रघुनाथ ह्याची विनंति

कीं, आपल्या (ब्रिटिश सरकारच्या) न्यायाच्या कोर्टांत त्याची छाननी करावी. व त्याचे खरेपणाबद्दल कोर्टाची खात्री झाल्यास पोर्तुगीज सरकारकडे त्याबद्दल कळवावें. व त्यांना योग्य दिसेल व त्याप्रमाणें करावें अशी शिफारस आम्ही करावीं अशा आशयाचें आपलकडून आलेल्या पत्रास जबाब देण्यांत येतो कीं, आपणांस माहीतच आहे कीं, ज्या सरकारनें अशा तऱ्हेच्या इनामी हक्काबद्दल सनदा अगर कागदपत्र करून दिले असतील त्यांनाच ह्या हक्काबद्दल निर्णय करण्याचा अधिकार पोचतो. इतर सरकारास तो हक्क प्राप्त होत नाहीं. ज्या अर्थी अन्ताजी रघुनाथ ह्यांजवर ज्या सरकारनें तोहमत ठेविली आहे व ज्यावर आमच्या सरकारचा ताबा नाहीं त्या अर्थी आमच्या सरकारनें त्याच्या इनामी हक्काबद्दल आमच्या (ब्रिटिश) न्यायकोर्टाकडे त्यानें दाद मागण्याची अपेक्षा करणें हें चुकीचें आहे. आपणांस माझी विनंती कीं, ह्या कामांत आम्हांस कांहीं करतां येत नाहीं; परंतु ज्या एकाद्या कामांत माझा उपयोग करून घेतां येईल असें माझें काम मला सांगावें म्हणजे मी तें खुषीनें करीन.

(सहि) **जे. हॉर्न**

**पत्र नं. २४**

श्रीमंत राजश्री पन्त प्रधान स्वामींचे सेवेसीं—

× आज्ञाधारक खण्डोजी माणकर चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग दण्डवत. विज्ञापना तागाइत छ २ रबिलाखर पावेतों स्वामींच्या कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे विशेष-रा॥ अन्ताजी रघुनाथ यांहीं पूर्वीपासोन सेवा चाकरी केली फिरङ्गणच्या मनसुब्यामुळें हैरान (ण) फैरोशानं जाहले. ठाणें घ्यावें म्हणोन सेवकास रवाना केलें. तेव्हां अन्ताजी रघुनाथ व अणजूरकर व उतेकर बरोबर दिल्हे त्यांत तिघांनीं आव म्हणावा तैसा धरिला. सेवकानें तिघांस हातीं धरून, यद्यपि एकाचे हातून जाहलें तर एकाचे हातून कार्य सिद्धता करावी. त्याचप्रों। तिघांनीं आव धरून कार्य सिद्धता स्वामींचे पुण्यप्रतापेंकरून जाहली. त्यास अन्ताजीपन्ताची वाजवी गोष्ट कोणी न ऐकतां, यास्तव आपले जागां श्रमी होऊन घरीं बसले आहेत. साम्प्रत स्वामी पुण्यास आले म्हणोन दर्शनास आले

---

× वसईच्या मोहीमेंत शौर्य गाजविल्याबद्दल पेशव्यांनीं खंडोजी मानकर यांस लाबा जिल्ह्यांतील गांव इनाम करून दिला आहे.

आहेत. यांचें तोण्ड अफाट मुळें दरबारांत यांचे पदरीं खटाई पडली. गांवसींव मुतलख प्राप्त व्हावा तो न जाहला. आजपावेतों श्रीमन्त राजश्री आपास्वामींनीं कृपा करून चालविलें. या उमेद रक्षून यांचे हातून कामकाद घ्यावें. हें इतकेंच इच्छितात कीं, धण्याचें पुण्यप्रतापें फिरङ्गण सुटावें, म्हणजे आपलें वतन सुटेल. हा हेत स्वामीचे प्रतापें सिद्धीस पावेल. सन्देह नाहीं. परन्तु यांचा अन्हेर न होई, तो अर्थ करणार स्वामी धणी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय, हे विज्ञापना.

---

# परिशिष्ट ब

## पत्रें २५ ते २६

### पत्र नं. २५

छ ७ जिल्हेज ॥ श्री ॥

सेवेसी विनंती. स्वामीनी छ ४ जिल्हेजची पत्रे पाठविली. आजीच छ ६ जिल्हेजी प्रात:कालचे साहा घटका दिवसास पावली. जंजिरे आरनालियाचे काम इमारतीचे पके करीन म्हटल्यास दिवसगती लागेल याकरितां कोरे काम करावे येसे आमचे विचारे आहे त्यास तुमचे विचारे काय ते लेहून पाठवणें म्हणून लिहिले. त्यास स्वामीनीं लिहिले हे यथार्थच आहे. त्यास आम्ही येका दो दिवसांनीं जंजिरे आरनालियास जातो. त्यास बुरजाचे काम तो पकेच केले पाहिजे व करीतहि असो. वरकड फाजीचे काम तरी सर्वाचे विचारे मनास आणून चुन्याकरितां काम तटेसे असिले तरी कोरे कामास प्रारंभ करितो. बाहेरून थोर दगड व आंतून लहान दगड या प्रकारें लावून काम करवितो आणि स्वामीस लेहून पाठवितो. कलावे याकरितां लिहिले असे चुना नपुरे म्हणोन लोक पुढे ठेवितो येसे नाहीं. दोन मास वावदलास सुटावयास लागतील तोपर्यंत जागा राखतोच राखतो. स्वामीनीं त्या जागियाची चिंता न करावी. पावसकाम सा महिने कोरेच काम चालऊन पुढे मागती टोपीकर सराईस (?) फौज पुर्तकालेची घेऊन येईल तों कोरे पक्के होईल ते करीतच आहों; सारांश माणूस रिकामे राहून काम कोरे न करून हे सहसा होणार नाहीं. जितकी इमारत ताबडतोड उठेल ती कार्याचीच आहे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

—पेशवे दप्तर, वसई मोहिम, भा. १६

Shankarji Keshav gives his opinion as to how the work of the fort at Arnala should be effected. He visists on having the whole edipice built on a strong and permanant basis. The bastions that have to bear the brunt of the enemy's fire cannot afford to be ereated out of bad material.

**पत्र नं. २६**

श्रीमत राजश्री आप्पा स्वामीचे सेवेसी--

आज्ञाधारक खंडोजी माणकर मो।। वानरें सां।। दंडवत विज्ञापना. ता।। छ १५ जिल्हेज मंगलवारपावेतो येथील वर्तमान स्वामीचे कृपावलोकनेकरोन वर्तमान यथास्थित असे विशेष. येथील सर्व वर्तमान निवेदन करावयासी राजश्री सखोपंत व रा। बापूजी कृष्ण सेवेसी पाठविले (ते) निवेदन करितां विदित होईल. त्याचा सरंजाम करणार स्वाम समर्थ आहेत. आजपावेतो भांड्याचे गोले मोर्च्यावर टाकीत होता. हालीं गरनाला व फटकडीचे गोले टाकितो, याकरितां लादन्या मोर्च्यास कराव्या लागल्या सेवेसी कलावे. रोजमरियास्तव लोक हैराण आहेत तरी रोजमरा पाठविला पाहिजे. सारांश लोकांचे उर्जित केले म्हणजे स्वामीचे प्रतापे कार्य व्हावयासी विलंब नाहीं. स्वामी उर्जित करितील हे तो खरंच आहे. परंतु शिपाई लोकांचा धीर पुरत नाहीं यास्तव क्षिणक्षिणा ल्याहावे लागतें. हाली मशार निलेस पाठविले आहेत. हृद्गत मनास आणोन आज्ञा करतव्य ते केली पाहिजे. राजश्री होनाजी बलकवडे हे आपले जागां बहुत अजुर्दा आहेत; निमित्य कीं प्रताप मागे केला मोडावले यास्तव राहिले (?) आलीकडे वेसांव्यांस माणूस दुखऊन येश न आलें याकरितां दिलगीर आहेत. त्यांस संतोषाचें पत्र पाठविलें पाहिजे. सेवेसी श्रुत होये. रा।। बापूजी कृष्ण यांही पहिल्यापासोन सेवा केली आहे तरी यांचा व लोकांचा सरंजाम केला पाहिजे. हे विज्ञाप्ति.

* Khandoji Mankar to Chimaji Appa, asking for more funds to pay off the men in the army. He further requests Chimaji Appa to console Honaji Balhavade who is disheartened by the set back which he received at Vesova at the cost of several casualties.

# परिशिष्ट क

## पत्रें २७ ते २८

## पेशव्यानीं अंताजी रघुनाथचें वतन चालविण्याबद्दल त्यास दिलेला कौल

**पत्र नं. २७**

हिजरी ११४४ ( शके १६५३ इ. स. १७३१ )

शिक्का काजी महंमद कासम याचा हि. ११४४

सर्वानुमतें सर्वांच्या साक्षीनें मोहर केली आहे.

श्रीमन्त राजश्री अन्ताजी रघुनाथ व रामचंद्र रघुनाथ व जगजीवन रघुनाथ सरदेसाई व सरदेशपांडे.

मोकदमान्, ह्मातारीयांन्, व मढवीयांन्, वरेयांन्, मुजारीयांन्, व समस्त जमीदारांन् प्रा। १४ बी।। का। वसई बाहदरपूर कि।। सोपारा प्रगणे मालाड व प्रा। मरोळ व माहीम मुंबई, उरण, भोरै व प्रा। शहावान, खैरणे, प्रा। पञ्चनद व प्रा। आठगांव, अणजोर व प्रा। काह्मणखांच, सायेबान व प्रा। मनोरा व किल्ले प्रा। असेरी व प्रा। माहब प्रा। केळवें माहीम, व प्रा। तारापूर व प्रा। ओवळी व प्रा। कामण सदरहू प्रमाणें प्रा। शिरगांवासुद्धां इसने सलासिन मया व अलफ ( शके १६५३ ) मजहर लिहून दिल्हा ऐसाजे, तुमची देशमुखी व देशपाण्डेगिरीचा हक्क, लवाजिमा वगैरे पट्टी, पासोडी, पञ्चोत्रा माण्ड व टक्का, घटिका, पाट, अन्त्रपट, विडा, टिळा, पद, प्रायश्चित, साटबाट व दरबिघा कुडव ( १ ) एक साली ( शाली—भात ) व कुळवाव, कुळकानू. याप्रमाणें व शिलोत्रे दरगांवास होत १, जमीन बिघे २ याप्रमाणें पूर्वापार बादशहा सुलतान अल्लाउद्दीन गाजी शहर बेदर खास मोहर सनद सन ८२४ भोगवटा चालत आला, त्याजपुढें बादशहा सुलतान बहादर निजामशाही सन ९२४ त्याजपुढें मुलकांत फिरङ्गी यांचा अम्मल जाहला. त्यास पूर्वापारप्रमाणें तुमचा हक्क लवाजिमा, बासतांवरें बोस बस्तियांव पुर्तुगाल त्याजपूर्वापार सनद व मुजीब सनद

खास करून दिली. फिरङ्गी सन १५८० पन्धराशें ऐशींमध्यें करून दिली ते समयीं गोव्यांमध्यें विजुरे मतीस अलबूकेर्क त्यानें अम्मल सुरळीत दिला. त्याउपर सन १६११ मध्यें बादशहा फिलीप याची सनद जाहली. कुळबाब, कुळकानू, भोगवटा, लुईलारेस दतावर विजुरे गोव्यांमध्यें होता त्याणें चालविला. यावर रेंबोजांव बादशहा याणें सन १७१४ मध्यें पुन्हा सनद पाठविली. वतन कुळबाव, कुळकानू वासकु ऐनोद सिनोर देमिनेंज विजुरेनें अम्मल सुरळीत दिला. त्यामध्ये ज्यांव् सालवान् दि गामा विजुरे बन्दर गोवा, त्यानें सनद करून दिली, व सर्व मोकासदारांच्या हातचीं लिहिलीं घेऊन दिल्हीं कीं, एक लवाजिमा, कुळबाव, कुळकानू चालवावयास मुजाहीम होईल, त्यास दण्ड होत (५००) पांचशें; ऐसे धाण्डोरे महद् मुम्बई तहद यवण पिटिले. त्यास सर्व जनास महशूर असे. ऐसें सुरळीत चालत असतां, अकस्मात् श्रीमंत राजश्री कृष्णरावजी सुभे कल्याण स्वामी यांचा यांचा व फिरङ्गी यांचा विघाड जाहला. सुरसन इहिद्दे सलासिन मया व अलफ मध्यें (शके १६५२) जाहला. त्यास घांटावरून राजश्री पिलाजी जाधवराव आले. त्यांनीं छ १७ जिलकादी काम्ब्याचा कोट फत्ते केला. मूलूख १२ प्रगणा काबीज केला. त्यास जेव्हां मुलकास कौल सादर करूं लागले, मग आपुली अड घातली कीं, देशमुखाशिवाय आपला कौल न घेऊं, तेव्हां तुम्हांखेरीज कौल आपुला न घेतला. मग तुम्हांस आणून तुमचे हातीं कौल घेतला. त्यास तुम्हांस सनद श्रीमन्त राजश्री मुख्य पन्त प्रधान स्वामींहीं पाठविली. सन इहिद्दे सलासिन मया व अलफ (शके १६५२) छ ६ मोहरमीं सादर केली. त्याप्रमाणें पूर्वापारप्रमाणें तुम्हीं उपभोग केला. त्यास हल्लीं सु॥ इसन्नेमध्यें (शके १६५३) मुलुख उजाड पडला. तेव्हां सन मजकुरीं माहे सवालमध्यें सल्ला जाहली. मग आम्हीं विनन्ति करून श्रीमन्त राजश्रीपन्त मुख्य प्रधान स्वामींचा कौल आणविला, कां जर बेहशक् वसाहत करावी; त्यास छ ९ सव्वाली कौल सादर जाहला. त्यावरून आम्हीं वसाहत केली. तर हल्लीं तुमचा हक्क व लवाजिमा बिलकूल कुळबाव कुळकानू बिलाहुजूर देऊन पूर्वापार चालत आला त्याप्रमाणें देत जाऊं. व त्यास नोदिगत नाहीं.×

---

× थोरले बाजीरावानें अन्ताजी रघुनाथ ह्यास साष्टी प्रान्तांतील मालाड परगण्याच्या सरदेसाई व सरदेशपाण्डेपणाच्या वतनाबद्दल कौल करून दिला. इ. स. १७३१ सालीं साष्टी प्रान्तावर पेशव्यांचा अम्मल नव्हता. सबब ह्या कौलाची अम्मलबजावणी करणें अशक्य होतें. तथापि अन्ताजी रघुनाथ ह्यानें फिरङ्ग्यांची

पत्र नं. २८

## बाजीराव पेशव्यांनीं अन्ताजी रघुनाथचें वतन चालू ठेवल्याबद्दल काढलेला हुकूम.

[1]आज्ञापत्र समस्त राजकार्यणधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री बाजीराव पंडित प्रधान ता। अलिखान पाटील मौजे आटदे व महाद पाटील मौजे हेदुटणे व समस्त मुकादम प्रान्त पञ्चनद वसई बहादरपूर प्रान्त फिरङ्गान सुरुसन सलासैन मया व अलफ. (शके १६५१) अन्ताजी रघुनाथ सरदेसाई व सरदेशपांडे प्रान्त मजकूर यांचा सुदाभत हक्क लवजिमा, व भोगभोगवटा चालत आला आहे. त्याप्रमाणें हल्लीं सुरळीत चालवित जाणे. याचा हक्क पुरातन चालत आला आहे. त्यास खलेल केलियास मुलाहिजा होणार नाहीं. ताकीद असे. जाणिजे छ ४ रविलावल आज्ञाप्रमाण.

अखण्डित लक्ष्मी अलङ्कृत रा।। राजर्श्री रामचंद्र रघुनाथ सरदेसाई व सरदेशपाण्डे वसई वगैरे प्रा। फिरङ्गन गोंसावी यांस—

सेवक बाजीराव बल्लाळ प्रधान नमस्कार सुरुसन सलासिन मया व अलफ (शके १६५१) तुह्मीं जिवाजी गोविंद यासमागमें पत्र पाठविलें तें पावलें. सविस्तर वर्तमान कळलें. त्यास आमचे ही चित्तीं हाच हेत आहे कीं, कार्य करावें. अशा निमित्त राजश्री अन्ताजीपंतास जे सांगणें तें सांगितलें आहे. तुम्हीं आपली खातरनिशा चित्तांत करून कार्य साधणें. तुमचे मनोदयानुरूप उर्जित करून येथून रा। बाबुजी मेघःशाम व दत्ताजी तुर्क पाठविले आहेत. त्यांची निशा सर्व गोष्टींची करणें रा।। छ १९ रज्जब बहुत काय लिहिणें

लेखन सीमा

---

सत्ता नष्ट झाल्यावर आपलें वतन परत मिळेल ह्या आशेवर पेशव्यांस मदत करावी ह्या हेतूनें बाजीरावानें पुढील धोरण ठेऊन सदरील कौल दिला असावा. वसई हस्तगत झाल्यावर नानासाहेब पेशवे ह्यांनीं ह्या कौलाची अम्मलबजावणी केली किंवा नाहीं ह्याबद्दल माहिती उपलब्ध नाहीं.

१ हें अस्सल पत्र मोडींत असून तें वे. रा. रा. चिंतामण बाळम्भट पळशीकर हल्लीं वस्ती दादर (मुंबई माहीम) ह्यांजवळ आहे.

# परिशिष्ट ड

## पत्रें २९ ते ३२

## वासुदेवराव जोशी ह्यानें अंताजी रघुनाथ विरुद्ध रचलेल्या कारस्थानाबद्दलचीं पत्रें

पत्र नं. २९

श्री

पु॥ श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी—

पोष्य वासुदेव जोशी साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जेष्ट शुध चतुर्दशी शुक्रवारपर्यंत यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री अंताजी रघुनाथ[1] यास पाठऊन देणे म्हणोन आज्ञा, त्यावरून रवानगी केली आहे. परंतु त्याचें वृत यैक जेतें कीं आपली आज्ञा घेऊन कल्याणास येतां तलेगावास जाऊन मातुश्री उमाबाईसीं राजकारण करून सर्वश्वे त्याचे पदरी पडावें, फिरंगणचा मनसबा त्यांजकडून सिधीस न्यावा यैसे करून कांहीं कापड व नख्ताचे यैवजी मोत्याचा तुरा व पदक यैसें घेऊन येथें आले. वस्ता गहाण ठेऊन पैका करीत असतां आम्हांपर्यंत वस्ता आल्या ते समई तर्कहि आम्ही केला आणि वर्तमानहि कळों आलें त्यावरून मुदा हाताखालीं घालावें याकरितां तुरा गहाण ठेऊन दीड हजार रुपये सिंपी कारभारी पुढें करून आणिला होता त्यास दिल्हे; आणि आपणांकडे हे वृत्त लेहून पाठवावे तों जागजागा बोलला कीं ह्या वस्ता राजश्री रायानी आपणांस दिल्या आहेत. निमित्य कीं राजश्री आपास कळावयास कार्यास नये. त्यावरून संदेह प्राप्त जाला होता. इतकियांत आपलेंहि पत्र घेऊन पोह्चलें कीं त्यास समाधान युक्त सांगोन बरावर माणसें त्याची नसली तरी आपली दाहा पांच माणसें देऊन पाठविणे म्हणून. त्यावरून आपणांसहि हें वृत्त विदित जाहालें यैसे चित्तांत आलें. रुजू माझ्या पाहातां तथ्य याणी त्यांजकडे राजकारण लाविलें यैसें आहे. त्यास आपले आज्ञेप्रमाणें याची रवानगी केली. परंतु हे परम चालक आहे. आपण दाभाडियाकडे राजकारण केलें हें स्वामीस व आम्हांस दखल जालें यैसें त्याचे ध्यानांत आलें आहे. कदाचित तलेगावास माणूस पाठऊन

१ कावळे, मालाडचा.

दाहावीस स्वार आणून मार्गीतून परस्परें तळेगावास जाईल. आपले राज्याची कैद कळलीच आहे. याकरितां आर्धी तों येक दोन रोज यास रवानगीस लावितों. तथापि याणी आग्रह केला तरी बरावर दाहा स्वार देऊन वोरघाटे लोहगड डावा घालून पाठवितों. आपण दाहा वीस स्वार पुढें खंडलिया पावतों पाठऊन घेऊन गेलें पाहिजे. आपण सर्वथें चालवीत असतां वेमानी करून तिकडे अनुसंधान लाविलें अशा मनुष्यास कैद करून ठेवावें यैसें ध्यानास जालें होतें. परंतु स्वामी शब्द लावितील यास्तव पाठऊन देतों. यास निर्बंध ठेविलियानें पुण्यामध्यें सुधां राहावयाचा नाहीं. येकादे स्थलीं ठेवावा नाहीं तर कार्याचा नाश करील. आम्ही येथेंच कैद करून पर्वतारोहण करीत होतों, परंतु आपली आज्ञा नाहीं यास्तव लिहिलें असे. तरी प्रत्योत्तर सत्वर पाठविलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ केला पाहिजे हे विनंती.

( This letter refer to some intrigue of Antaji Raghunath Kawale with the Dabhades regarding the Bassein Compaign. )

**पत्र नं. ३०**

॥ श्री ॥

पु॥ श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी—

विनंती उपरी. स्वामींनी लिहिले की अंताजी रघुनाथ यांस पाठऊन देणे आणि राजकारण केले असे आपणास कलले, असे किमपि त्यास कलो न देणें, त्यास आपण तो कांहीं दर्शविले नाही, परंतु गांवभर त्याणेच केले. नाव तो स्वामीचेच वस्तुहि स्वामीनीच दिल्ही असे सर्वांस दर्शविले आहे. जात्ये समई आमची आण क्रिया घेतली. आम्ही मृदुभाषणेच करून रवाणा केले, परंतु मागाहोन सेलव्याचे राऊत ८ व वेंकाजीपंत पाठविले, कीं अकारपूर्वक सावल्याचे घाटे तलेगावास जाईल तेथे बसेल, याकरितां बोरघाटे नेऊन पुण्यास आपणाकडे नेणे असे सांगोन पाठविले असत. कदाचित तो आपणाजवळ सांगेल याकरितां आपणास कलावे. म्हणून लिहिले असे. विचार पाहोन वर्तणूक करावी लागली, याकरितां दिल्हे असेत. पूर्वी लिहिले आहे त्यावरून सविस्तर कलेल त्याची बुद्धि क्षणिक आहे. तकारग्रामास जाईल याकरिता स्वार दिल्हे असत. बहुत काये लिहिणें लोभ करीत गेलें पाहिजे हे विनंती. —पेशवे दप्तर, वसई मोहिम, भा. ३४

Letter form Vasudev Joshi to Bajirao Informing that Antaji Raghunath Kawale is sent to Poona with an escort to explain his conduct. Vasudeo Joshi maintains grave doubts about his honesty.

**पत्र नं. ३१**

॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी—

पोष्य वासुदेव जोशी साष्टांग नमस्कार विनंती. राजश्री अंताजी रघुनाथ यांचा सविस्तर अर्थ तीर्थस्वरूप राजश्री रायास लिहिला आहे त्यावरून कळेल. यांचे बोलणेंचालणें कांहीं लिहितां पुर्वत नाहीं. आम्ही आज तागाईत कोणाचीहि खुशामत केली नहोती ते यांची करावी ? हा सर्व अर्थ राजश्री वेंकाजीपंत सांगतां कळो येईल यांच्यानें होणें तों कांहीं नाहीं, परंतु नाश मात्र करील. स्वामी सूज्ञ आहेत. बहुत काय लिहिणें लोभ केला पाहिजे हे विनंती.

—पेशवे दप्तर, वसई मोहिम, भा. १६

Vasudeo Joshi writes to Chimaji Appa that Antaji Raghunath is very vacillating and a frientship with him will be ruinous in the long run.

**पत्र नं. ३२**

छ १३ मोहरम श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी—

विनंती उपरी. रा. अन्ताजी रघुनाथ येथें आल्यावर स्वामीची पत्रे वरात दिली त्याप्रमाणें आम्ही कबूल केलें, त्यावर बोलिला कीं तुम्ही पत्र वरात न माना तरी राजश्री रायानी पदक व तुरा मोत्याचा दिल्हा आहे. त्याचा विनियोग करून कबिला घेऊन पुण्याम येणें येसी यजमानाची आज्ञा आहे तुरा व पदक द्यावयास कारण कीं राजश्री आप्पास श्रुत होईल यास्तव सनगे दिलीं. त्यावरूनच चितात गोष्ट आली, कीं आपणास श्रीने काय न्यून्य केले आहे, आपण हर कोण्हास शब्द घालतील कोण अमान्य करीसा आहे ? राजश्री आपासी काय पडदा आहे ? येसे असोन कल्पना करून भाषण केले. त्यावरून शोधास लागलों. तो याणी अनुसंधान केले हे सत्य

कळो आले. आम्हावर स्वामीनी वरात दिली ती अमान्य करू यास्तव सनगे दिली हे अपूर्वच गोष्ट. आम्ही सेवक लोक खावंदाने देविले असतां आम्ही न देऊं हे कोण गोष्ट, हे अवघे अर्थ चितात आणून तुरा मोत्याचा गहाण म्हणोन ह्याताखाली घालून मुद्दा ठेविला आहे. विदित जाले पाहिजे. परंतु[१] स्वामी वडील आहेत. याचा विश्वास धरावा असे नाहीं. बहुत काये लिहिणें लोभ केला पाहिजे हे विनंती.

—पेशवे दप्तर, वसई मोहिम, भा. ३४

Vasudev Joshi communicates to The Peshwa his suspicions about Antaji Raghunath.

---

# परिशिष्ट ई

## पत्रें ३३ ते ३४

## वीरोत्तंस चिमणाजी आप्पा ह्यानें श्रीब्रह्मेंद्रस्वामी व बाजीराव ह्यांना वसईच्या विजयानंतर लिहिलेलीं पत्रें

**पत्र नं. ३३**

॥ श्री ॥

श्रीमंत् महाराज श्री. परमहंस बावा स्वामींचें सेवेसी—

अपत्यें चिमाजीनें कृतानेक सा. नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता।० वैशाख बहुल प्रतिपदापर्यंत मुकाम वसई स्वामींचे आशीर्वादे करून सुखरूप असों विशेष स्वामींचे अभयावरून वसईस मोर्चे माघ शुद्ध दशमीस लाविले. त्यादाशम्य मोर्चेसच लाविले व धमधमे चार पांच बांधले. सुरुंग चालविलें जे जे उपाय स्थळ हस्तगत करावयाचे ते केले. फिरंगी याणीं निराकरणाचे मंत्र पूर्वी युद्ध प्रसंगीं मोठ्या मोठ्या सुरांनीं केलें. तद्न्यायें फिरंगी यांणी सुरुंगावर व धमधम्यावर गरनाळा टाकिल्या. सुरुंग विच्छिन्न केले. पनाळे लावून पाणी सोडिलें. आगीचे

---

१ अक्षर वासुदेव जोशी.

चौंडे जळके टाकून त्यांवर तेल, दारू, राळ टाकून चार चार रोज डोंब राहीसारखा करी. बरकंदाजी व तोफजी फिरंगी याची निःसीम म्हणावी तैसी तथापि स्वामींचा आशीर्वाद उदंड हें सबल शस्त्र आम्हांजवळ, त्याचे प्रतापें इकडून तोफा लागू करून फिरंगी याच्या तोफा मना केल्या. सफेल सोडून लेश केली. वसई जागा वाका बुलंद, सुरुंगाचा उपाय नाहीं. परंतु स्वामीच्या कृपाकटाक्षें सुरुंग चालवून दोन्हीं बाजूंनीं खांबावरती तख्तपोसी, त्यावर दोन अडीच हात रेती टाकून दहा सुरुंग नेऊन पोहोंचवून दोनशे पाथरवट लावून मोठमोठे चिरे फोडून सुरुंगाचे बुधलियास जागा करून, वैशाख शुद्ध पंचमीस सकलसिद्धता करून, लोकांस बाजू वाटून देऊन, नगारियाची इशारत करून, सुरुंग उडतांच सर्वांनीं येलगारास उठावें, बुरुजावर चढावें, शिड्या ठेवून चढावें, ऐसा करार करून वैशाख शुद्ध षष्ठी बुधवारीं दोन घटिका दिवसास प्रातःकालचा समय येतांच सुरुंगास बत्त्या दिल्या डावे बाजूचे सुरुंग कांहीं उडोन कांहीं उडणें होतो तोंच लोकांनीं उतावळी करून कोटावर चालोन घेतलें. तों दुसरे सुरुंग तेंच बाजूनें उडाले. त्यांनीं लोक दडपले व जायां व ठार जाहले. तसेंच उजवे बाजूचे सुरुंग उडाले.

एकदोन उडतांच बुरुजास वाट जाहलीसी देखून लोक वरते चढले. तों दुसरे सुरुंग उडालें. त्यांणीं वरते लोक चढले होते ते उडून गेले. लोक कसकरले. हिरमोड होऊन काम थंड पडलें. फिरंगी यांणीं सांभाळून हाके [ ? ] व गरनाळा व रेजगिरीचा मार न भूतो न भविष्यति केला. त्याणें लष्करचे लोकांत व हशमांत अवसान राहिले नव्हतें. उजवे बाजूचा मातबर सुरुंग राजश्री मल्हारजी होळकर यांजकडील उडणें होता. त्याचा शोध करून पुन्हां त्यांत बुधले घालून रंजक दुरुस्त करून लोकांची निवड केली. आणि सुरुंग उडतांच खामखां निशाणें चढवावीं असा करार करून वैशाख शुद्ध सप्तमी गुरुवारीं उजवे बाजूचा सुरुंग उडविला तेंच समयीं लोक जाऊन बुरुज अर्धा उडाला त्याजवरी चढले. फिरंगी यांणीं सफेलीच्या आंतून मेढा घालून, पोतीं भरून, तोफा जोडून तयार होतांच तेथे फिरंगी बोलावून हाके गरनाळाच्या दारूच्या फत्त्यास आग लावून मार केला, व रेजगिरीचा मार सीमेपरता केला.

लोकांवरी अग्नीचा पर्जन्य करून भाजून काढिलें. तथापि स्वामींचें अभय आशीर्वादाचें वज्रकवच लोकांचे अंगीं होतें, तेणेंकरून अग्नीची तमा न धरितां

लोकांनीं हत्यार बरे वजेनें केलें. फिरंगी यांणीं मर्दुमी शिपाईगिरी म्हणावी तशी केली त्याचप्रमाणें इकडील लोकांनीं भारती युद्धाप्रमाणें युद्ध केलें, [illegible] युद्धें बहुत जाहलीं; परंतु ह्या लढाईस जोडाच नाहीं. सर्व स्वामींचा आशीर्वाद. लोक बुरूज सोडीनातसे जाहले, तेव्हां स्वामीच्या दंडप्रहारें करून फिरंगी धर्मद्वेष्टे वेहिंमत होऊन अष्टमीस प्रहर दिवसास कौलास आले. कौल घेतला. आठा दिवसांत कविला सुद्धां झाडून जातोसें करार केलें. त्याजवरून मार महकूब केला. फिरंगी यांणीं कबिले वस्तभाव गलबतांत भरली. काल वैशाख शुद्ध पौर्णिमेस फिरंगी झाडून गेला. स्वामींचे पुण्येंकरून जागा फत्ते जाहली. लष्करचे व हशमाचे लोक सुरुंगांनीं उडाले व जायां ठार अजमासे पांच हजार किंवहुना विशेष होतील तसेंच फिरंगी-याचे सात आठसें माणूस ठार व यानिराळे जखमी जाहले. भारती युद्धाप्रमाणें [ युद्ध ] जाहलें. वसई बाका जागा. पश्चिमेकडून दक्षिणेकडे खाडी. पूर्वेकडे खाजण चिखल तिहींकडून किमपि इलाज नाहीं. एके उत्तरेकडून उपाय तिकडेही रेती, घर नाहीं. स्वामी साक्षात् ईश्वराचा अंश. स्वामींनीं वसई "दिल्ही, दिल्ही, दिल्ही" त्रिवार लिहिलें तें शब्द अन्यथा कसे होतील. वरकड वसईची गोष्ट मानवी लोकांनीं म्हणावी ऐसे नाहीं. वसई स्वामींचे आर्शीवाद फत्ते जाहली. श्रींचें सुदर्शन धर्म-द्वेष्टे यांचे मस्तकीं वज्रपहार होऊन टोपीकर म्लानत्व पावले. अन्यथा वसई सही न होती. फिरंगी आगीचा पुतळा होता. स्वामींचें कर्तृत्वास पार नाहीं. स्वामींची महिमा स्वामी जाणत. आम्हा मानवी लोकांस काय कळे? वसई फत्ते होतांच सवासें पुतळ्या पाठवून देणें व श्री. भुलेश्वरास सवासें रुपयांचा मुगुट घातला म्हणून आज्ञा केली, याजवरून स्वामींचे आज्ञेप्रमाणें वसई फत्ते होतांच श्रीनिवास केदार याजबरोबर पुतळ्या सवासें व श्री भुलोबास मुगुट सवासें रुपयांचा घातला. ते रुपये १२५ सवासें स्वामींचे सेवेसी पाठविले आहेत. प्रविष्ट होतील. आम्हीं लेंकरें स्वामींची असों. सर्व प्रकारें कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. स्वामींचे चरणा व्यतिरिक्त दुसरे दैवत आम्हांस काय आहे? ( खास दस्तुर ) " सारांश स्वामींच्या आशीर्वादें व दंडाच्या प्रतापें कार्य सिद्धितें पावलें असे. स्वामींचा महिमा आम्ही वर्णावयास सामर्थ्य धरीत नाहीं. श्रीनिवास केदार पुतळ्या व रुपये देऊन रवाना केले आहेत. लौकरच पावतील. वर्तमान त्वरेनें विदित व्हावें यास्तव हें पत्र पुढें रवाना केलें असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

**पत्र नं. ३४**

तीर्थरूप राजश्री राऊ स्वामींचे सेवेसी--

अपत्यें चिमाजीनें कृतानेक सा. नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ता। छ २४ सवाल बुधवार प्रातःकाळचा सवा प्रहर दिवस मु॥ तारापूर यथास्थित असे विशेष. रात्रीं चार पाच सुरुंग मल्हरबाकडून तयार जाहले तैसेच हुजरातच्या सुरुंगाचे तीन फाटे एकाचे करून कुसाखालीं नेले. तसेंच यशवंतराव पवार या कडीलही एक तयार जाहला. राणवाकडील तयार जाला नाहीं. तयार जाहला त्यास आज दोन घटका दिवसास बत्ती दिल्ही. सारे लष्करचे लहान थोर माणूस रात्रीचेच खाडींतून उतरोन मोर्च्यांचे पाठीमागे जमा करून बसविले होते. सुरुंग एकामागे एक अंतर करून उडाले. सरकारच्या सुरुंगाचें खिंडार मोठे पडले. तैसेच मल्हारबाचा खासा सुरुंग बुरुजाखालीं होता तेथेंही खिंडार मोठें पडलें. त्याच्या उजव्या हाताकडे दुसरे सुरुंग होते. तेथेंही थोडी बहुत खिंडारें पडली त्याच्या उजवीकडे हशमाच्या लोकांनीं कोटासच मर्दामर्दी (नें) शिडी टेंकून वरते चढले पुढे धारकरी होता. तो वर चढल्यावर, वरी गोळी लागून वरून खालीं भुईवरी पडला. त्याचे पाठीमागें दुसरा चढला. तोही वरून पडला. तेव्हां क्षणभर शिडी रिकामी होती. फिरोन लोकांनीं लगट करून वर चढले वरी लोकांनीं मारामारीची शर्थ केली. हुजरातचे निशाणाजवळ राजश्री बाजी भिवराज व रामचंद्र हरी होते. व सारे नामांकित लोक तितके होते. वरे वजेने चालोन गेले. तैसेच हमशापैकींही तीनेकसें माणूस सरकारच्या निशाणाजवळ होते. गुतेकर व बाळोजी चंद्रराव होते. हुजरातच्या निशाणाच्या उजवेकडे मल्हारबाचीं निशाणें सारीं होतीं तैसींच राणोजी भोसले याची होती. त्यांणीही शर्थ करावयाची तैसी केली. कुसा अलीकडे सात आठ हात खंदक खोल होता. आठ हात रुंद होता. तो खंदक उतरोन जावें त्या उपरी कोटावरी चढावयासी बहुता प्रकारची अडचण होती. वरले लोकांनीं आंत मेढा कोटा शेजारीं तयार केला होता. त्यामुळें कोटावरीही चढल्यावरी दोन घटका तेथें तुंब पडला. तसेंच जागा जागा. शेवट पावेतों फिरंगी यांणीं हिंमत सोडली नाहीं. हुकयाचा (?) व तोफांचा मार व बरकंदाजाचा मार सिमेपरतां. खाडीचे मध्यें माडी आहे तेथें आम्ही होतों. मल्हारबाचे पायास करट जाहलें आहे, त्यामुळें तेही एकटे आम्हांजवळ होते. सारे झुंज नजरेस पडलें. आमच्या लोकांमध्यें

व मल्हारबाच्या लोकांमध्यें आंग्रे यांचेही लोक होते. राणोजी भोसले यांणीं बरे वजेनें बाकोन घातले. राजश्री बाजी भिमराव यांणींही बरेच वजेनें सीमेपरतें निशाण चालविलें. त्याचें मर्दुमीची सीमा लिहावी ऐसें नाहीं. हुजरातच्या मोर्च्यांच्या डावे हातें. गोविंद हरी होते. तेंही बरे वजेने पोंचले राणबांनीं शिड्या तयार केल्या होत्या; तिकडे सुरुंग तयार नव्हता. ते जबरदस्तीनें खंदक उतरून शिड्या लावून चढलेच असतील. गोविंद हरीचे डावे हातीं बांडे होते. त्याचे पलीकडे यशवंतराव होते. त्याचे पलीकडे तुकोजी पवार शेवटीं राणबा. तिकडील तपशीलावर वृत्त मागाहून लिहून पाठवूं. सारांश माणूसही सीमेपरते जायां झाले. नांवनिशी मागाहून तहकीक करून लिहून पाठवूं. सुभेदारही हशिमाचे लोक होते. त्यांत शिरले होते. सारांश स्वामींचा पुण्यप्रताप थोर तेणें करून जागा फत्ते जाहली असे. अद्याप लोक सारे गांवांतच आहेत. फिरंगी यांचीं सारीं माणसें धरावीं ऐसी ताकीद केली आहे. जमा जाहलियावरि तह कीक करून जसें करणें तसें केलें जाईल. तूर्त जागा फत्ते जाहल्याचें संतोष वृत्त तांतडीनें लिहिले असे जासूद चोहों दिवशीं शनवारीं तेथें पावतील त्यास चित्तास येईल ते इनाम पोंचतें दिल्हें पाहिजे. कृपा केली पाहिजे हे विनंति.

---

## परिशिष्ट 'फ'

### वसईच्या मोहिमेंत ज्या किल्ल्याचें प्रामुख्यानें वर्णन केलेलें आढळतें, ते येणेंप्रमाणें:—

अशेरी; अर्नाळा, ठाणें, वांद्रें, वसई, केळवें, माहीम, शिरगांव, तारापूर वगैरे. पैकीं अशेरी किल्ला हा सर्वांत जुना आहे. अर्नाळा किल्ला वसईची मोहीम चालू असतां वसईच्या किल्ल्यांस शह देण्याकरितां मराठ्यांनीं बांधिला. बाकीचे सर्व किल्ले पोर्तुगीझ सरकारनें कोंकणच्या किनाऱ्यावरील आपल्या ताब्यांत असलेल्या सर्व प्रांताचें रक्षण करण्याकरितां बांधिले होते. त्यांत वसईचा किल्ला सर्वांत मोठा असून फार मजबूत बांधिला होता, व लष्करी दृष्ट्या पोर्तुगीझ लोकांना त्याचें फार महत्त्व वाटत होतें.

# अशेरी

अशेरी किल्ल्यांत पोर्तुगीझ लोकांचें मजबूत ठाणें होतें. बरेच दिवस किल्ल्यांतील लोकांनीं मराठ्यांच्या लष्करास दाद दिली नाहीं. मराठ्यांनीं सदरील किल्ला मोठ्या शौर्यानें लढून काबीज केला. प्रस्तुत लेखकास ठाणें येथील डिस्ट्रिक्ट कोर्टाच्या आवारांत फारसी लिपींत लिहिलेले दोन शिलालेख इ. स. १९०६ सालीं सांपडले. त्यांचे दर्शनी भाग जमिनीला चिकटून होते व त्यांच्या पृष्ठभागावर कोर्टाच्या माळ्यानें फुलझाडांच्या कुंड्या ठेविल्या होत्या. दगडांच्या आकारावरून ते कांहीं विशिष्ट प्रकारचे असावे असा तर्क प्रस्तुत लेखकानें केला. व त्याचे दर्शनी भाग पाहिल्याबरोबर ते शिलालेख असून साधारण दगड नव्हते अशी खात्री पटली. त्यावेळचे ठाणें येथील रहिवासी मुनशी फझली अल्ली फारसी व अरबी भाषांतले तज्ज्ञ —ह्यांजकडून सदरील दगडावर असलेल्या लेखांचें इंग्रजींत भाषांतर करून घेतलें. त्यांचा आशय येणेंप्रमाणें......शहाजहानानें आपला बाप मोगल बादशहा जहांगिर ह्यांजविरुद्ध बंड केलें होतें. जहांगिर बादशहानें शहाजहानाचें बंड मोडलें. तथापि भोपाळदास गोर हा पराक्रमी सरदार असें समजून त्यांस ठाणें जिल्ह्यांतील शहापूर तालुक्यांत असलेले माहुली, पळसगड, भंडारगड, वगैरे गडांचे किल्लेदार नेमिलें. तसेंच पालघरपासून २० मैलांवर असलेला अशेरीगडहि त्याच्या ताब्यांत दिला.

सदरील गोपाळदासगोर ह्यांस राजा मानधाता हा किताब शहाजहानानें दिला होता तोहि जहांगिर बादशहानें कायम ठेविला. त्याचा मुलगा मनोहरदास गोर ह्यांनींही आपले बापाचे पश्चात मोगल बादशहांची इमानें इतबारें नोकरी केली. इ. स. १६६६ सालीं औरंगजेबानें श्रीशिवाजीबरोबर तह करण्याकरितां सरदार जयसिंग व दिल्लीरखान ह्यांस पाठविलें होतें. त्या वेळीं पुरंदर येथें झालेल्या तहांत ठाणे जिल्ह्यांतील वर नमूद केलेले डोंगरी किल्ले औरंगजेबाच्या ताब्यांत देण्यांत आले. सदरील किल्ला श्रीशिवाजीमहाराजांच्या ताब्यांत पुन्हा आल्यावर त्यांनीं त्याची चांगली डागडुजी केली असें आढळून येतें. सदरील शिलालेखामध्यें अशेरगड असा शब्द वापरला असल्यामुळें सकृद्दर्शनी ह्याचा संबंध उत्तर हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध अशीरगडाशीं असावा असें वाटतें. परंतु शहाजहानाची त्र्यंबकेश्वराहून (नाशिक) लिहिलेलीं पत्रें अलिकडे प्रसिद्ध झालीं आहेत त्यावरून व शिलालेखांत

ठाणें जिल्ह्यांतील माहुली, पळसगड वगैरे डोंगरी किल्ल्यांचीं नांवें असल्यामुळें व त्र्यंबकेश्वराहून मोखाडा व जव्हार ह्या वाटेनें अशेरी किल्ला नजीक असल्यामुळें शिलालेखांत उल्लेखिलेल्या अशेरीगड पोर्तुगीझ लोकांच्या ताब्यांत असलेला अशेरी किल्ला असें अनुमान निघतें. इ. स.- १९२७ सालीं श्रीशिवाजीमहाराजांच्या जन्मास ३०० वर्षे पुरीं झालीं होतीं त्या वेळीं मुंबई येथें श्रीशिवाजी त्रिशत-सांवत्सरिक उत्सव मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. त्या वेळीं रा. ब. गो. स. सरदेसाई ह्यांनीं श्रीशिवाजी स्मारक ग्रंथ प्रसिद्ध केला, त्यांत ६८ पृष्ठावर सद-रील अशेरी किल्ल्यासंबंधानें जो उल्लेख केला आहे तो खालीं उधृत केला आहे. ह्याशिवाय सदरील शिलालेखासंबंधानें ज्यांना सविस्तर माहिती वाचावयाची इच्छा असेल त्यांनीं सर जीवनजी जमशेटजी मोदी यांनी प्रसिद्ध केलेल्या Asiatic papers Part II Page 149 वाचून पहावें. सदरील दोन्ही शिलालेख मुंबई येथील प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्यें ठेविले आहेत.

सदरील शिलालेख गीर्वाण भाषाभिज्ञ ख्रिस्तवासी A. M. T. Jackson. M.A. यांजकडे प्रस्तुत लेखकांनीं संशोधनाकरितां पाठविले होते. ते त्यांनीं रॉयल एशियाटिक सोसायटीच्या ताब्यांत दिले. अशेरी–"डों. ठाणें, माहीमच्या ई. २० स. १६५८त " अशेरी किल्ला शिवाजीनें वसविला. " (जे. क. पृ. ४२) शहाजहान बापा-विरुद्ध बंड करून उठला, तेव्हां राजा गोपाळदास गोर यास अशीरचे किल्ल्यांत ठेऊन त्याच्या ताब्यांत सर्व मत्ता व नोकर देऊन, स्वतः बंधू बरोबर लढ-ण्यास गेला, (स. १६२३) गोपाळदासनें दोन वर्षेपावेतों या किल्ल्यांतून पर्वी-झशीं टक्कर दिली. या कामगिरीबद्दल त्यास पंचहजारी मनसब व 'मानधाता' असा किताब शहाजहाजनें दिला. सन १६५२ त गोपाळदासाचा मुलगा मनोहर-ह्यास किल्लेदारी मिळाली. हाच पुढें स. १६५५ त माहुलीचा किल्लेदार झाला. शहाजहान व औरंगजेब यांची या घराण्यावर बहाल मर्जी होती.

मनोहरदासानें माहुली येथें कोरलेला ता. ८-२-१६६८ चा एक फारसी शिला-लेख सांपडला आहे. या लेखाचा दगड कांहीं वर्षांपूर्वी रा. के. आ. पाध्ये हायकोर्ट वकील यांना ठाणें येथील जज्ज कोर्टाच्या इमारतींत सांपडला. त्याचें वर्णन डॉ. जी. ज. मोदी यांनीं केलें आहे. (J. R. A. S. 1915).

# अर्नाळा किल्ला बांधल्याचें वर्ष

वरील किल्ल्याच्या दिल्ली दरवाज्यावर दोन फुट जागेमध्यें मराठींत कोरलेला खालील लेख आहे.

" बाजीरावपंत अमात्य सुमती आज्ञापिलें शंकरा ॥
पाश्चात्यांसि वधूनि सिंधु उदरीं बांधा त्वरें जंजिरा ॥
अर्नाळा जलदुर्ग चिंतुनि मनीं बाजी तुळाजी सुता ॥
शिल्पज्ञें दृढ शौर्य जाणुनि तमा दुर्गासि संस्थापिता ॥ १ ॥
अंकबाण रस चंद्रशकातें, ज्येष्ट पिंगळ सितेंदु दिनातें ॥
रोहिणी ध्रुव सुपुष्य हि जेव्हां येशवंत बुरुजाकृति तेव्हां ॥ २ ॥

दुसऱ्या श्लोकावरून हा किल्ला शके १६५९ सालीं बांधलेला आहे. म्हणजे जवळ जवळ २०५ वर्षें होत आलीं. चिमणाजीआप्पानें वसई इ. स. १७३९ सालीं कावीज करण्यापूर्वींच हा किल्ला बांधलेला असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं.

# परिशिष्ट ग

## अंताजी रघुनाथ कावळे याची वंशावळ

अंताजी रघुनाथ कावळे याचा मूळ पुरुष रघुनाथपंत, गोत्र भारद्वाज, त्रिप्रवर, ( भारद्वाज , अङ्गिरस, बर्हिस्पत्य ) कुलस्वामिनी यमाई, माता पुरनिवासिनी, कुलाचार खण्डोबा—पैठण येथें दुर्गाडींत वाडा. शुक्ल यजुर्वेदीय ब्राह्मण, माध्यन्दिन शाखा.

- रघुनाथ ( मूळपुरुष )
  - श्रीधर
    - पुरुषोत्तम
      - नायकराव
        - त्रिंबक
          - आबाजी
            - रघुनाथ
              - अंताजी
                - क्ष
                  - ज्ञ
                    - भाऊराव
                      - बाबा कावळे
                        - o
                      - सखाराम
                        - भास्कर
                          - पुरुषोत्तम ( विद्यमान ) ×
                      - गोपीनाथ
              - रामचंद्र
              - गणेश ऊर्फ जीवनराव
    - विश्वनाथ

( मालाडचें सरदेसाईपण व सरदेशपांडेपण संपादन करणारा ) [नायकराव याच्याशेजारी]

[ टीप—मागें पहा ]

× सदरील वंशावळ वे. शा. सं. ह. भ. विनायकराव नारायणराव आचार्य, पेन्शनर, हल्लीं वस्ती जबलपूर, यांनीं त्यांचे श्वशूर ब्रह्मीभूत बाबा कावळे, अंताजीचे प्रपौत्र ह्यांच्या संग्रहीं होती ती आमच्याकडे प्रसिद्धीकरितां पाठविली आहे; त्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत.

मालाड येथें प्रस्तुत लेखकानें स्वतः जाऊन जी माहिती मिळविली, ती येणेंप्रमाणें:—मालाड पाडा चिंचवली येथें अंताजी रघुनाथ कावळे ह्याचे वंशजाचे ताब्यांत एक जुनें घर आहे. व थोड्या अंतरावर एक विस्तृत घरटणाची जागा असून त्यांत एक मोठी विहीर आहे. अंताजीचे वंशजाचा गणपती दरसाल भाद्रपदमासीं सदरील विहिरींत शेळविला जातो. त्याशिवाय अंताजीच्या वंशजाकडे बरीच शेतजमीन आहे, व ज्योतिष उपाध्येपणाची वृत्ति अद्याप चालू आहे.

REFBK-0006383